
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १४ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



समाज आपला जसा आहे तसाच स्वीकारला पाहिजे. गुणांबरोबरच दोषही न रागवता सौम्यपणानेच घ्यावे लागतील. विचारांची उग्रता व व्यवहार सौम्य अशी सांगड हवी.
**- मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकांना स्थगिती नाही

**● सर्वोच्च न्यायालयाचा आदेश ● निकालाची वैधता ठरेल अंतिम आदेशावर**

**◆ नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दिला आहे. ज्या नगरपंचायती आणि नगर परिषदांमधील आरक्षण ५० टक्क्यांच्या वर गेले आहे अशा ठिकाणचे निकाल जानेवारी महिन्यात होणाऱ्या सुनावणीतील निर्णयावर अवलंबून राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. निवडणुकांना स्थगिती न दिल्याने उमेदवारांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे.

निवडणुकांना स्थगिती न दिल्याने २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहेत. एकीकडे राज्यात निवडणूक प्रचाराचा धुराळा सुरू असताना दुसरीकडे आरक्षणाची ५० टक्के असलेली मर्यादा ओलांडल्याचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. आरक्षणाच्या मुद्यावर शुक्रवारी सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जोयमाला बागची यांच्या न्यायासनासमोर सुनावणी



झाली. राज्य सरकारने काही ठिकाणी ओबीसी व इतर घटकांना जास्त प्रमाणात आरक्षण देत घटनात्मक चौकट ओलांडल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रद्द करण्यात याव्यात यासाठी विकास गवळी यांनी याचिका दाखल केली आहे. तर बांठीया आयोगाच्या अहवालानुसार कायद्याच्या चौकटीत राहून आरक्षण निश्चित केल्याचा दावा राज्य सरकारने केला. दोन्ही बाजूंचे मुद्दे ऐकून घेतल्यानंतर न्यायासनाने अंतरिम आदेश जारी करीत सध्या प्रक्रिया सुरू असलेल्या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुका ठरल्याप्रमाणे होतील, असे सांगितले.

या प्रकरणावर येणाऱ्या २१ जानेवारीला तीन सदस्यीय न्यायासनासमोर सुनावणी होणार असल्याचे न्यायासनाने स्पष्ट केले. तथापि, ज्या ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे तेथील निकाल जानेवारी महिन्यात होणाऱ्या निर्णयावर अवलंबून राहणार असल्याचे स्पष्ट केले. सोबतच सर्वच निवडणुकांची वैधताही तपासली जाणार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे सर्वच निवडणुकांचे निकाल हे कोर्टाच्या अंतिम आदेशावर अवलंबून राहणार आहे.

नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी २ डिसेंबरला मतदान होणार असून ३ डिसेंबरला मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. *(वृत्तसंस्था)*

### आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याची कबुली

४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याची कबुली राज्य सरकारने दिली आहे. त्यामुळे संतुलित आरक्षण रचनेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारच्या सुनावणीत एकीकडे राज्य सरकारला दिलासा देत दुसरीकडे आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणचे निकाल जानेवारीत होणाऱ्या अंतिम निकालाच्या अधीन असतील, असे स्पष्ट केले.

### पं. स., जि. प., मनपा निवडणुकांत ५० टक्के मर्यादेचे पालन करा

नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका संपल्यानंतर पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे पालन करा, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

### नव्याने आरक्षण सोडत काढावी लागणार

१७ जिल्हा परिषद आणि २ महानगरपालिकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश पाहता या ठिकाणी नव्याने आरक्षण सोडत काढावी लागणार आहे.

### आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या संस्था

| नगरपरिषद | नगरपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद | महानगरपालिका |
|---|---|---|---|---|
| ४० | १७ | ८४ | १७ | २ |



भगवान श्रीराम यांच्या जगातील सर्वांत उंच मूर्तीचे अनावरण शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. दक्षिण गोवा जिल्ह्यातील श्री संस्थान गोकर्ण जीवोत्तम मुत्त येथे प्रभू रामाची भव्य मूर्ती उभारण्यात आली आहे. कास्य धातूने तयार केलेली ही मूर्ती ७७ फूट उंच आहे.

## महत्त्वाचे

### अनिश्चिततेच्या कारभारात निर्देशांक सपाट



**मुंबई** : देशाचा जाहीर झालेला आर्थिक विकास दर आणि उत्पादन विकास दरामुळे शेअर बाजारात अनिश्चिततेचे वातावरण पसरले त्यातूनच निर्देशांक आणि निफ्टी सपाट बंद झाले. ३० शेअर्सवर आधारित मुंबई बाजारातील निर्देशांक अवघ्या १४ अंकांनी खाली आला तर निफ्टीत १३ अंकांची घसरण झाली. ज्या कंपन्यांचे शेअर्स घसरले त्यात पॉवर ग्रीड, इटर्नल, भारती एअरटेल, ॲक्सिस बँक आणि इन्फोसिस यांचा समावेश होता. या स्थितीतही महिंद्रा, सन फार्मा, कोटक महिंद्रा आणि एसबीआयचे शेअर्स किंचित वधारले होते.

# भारताच्या अर्थव्यवस्थेची ताकद वाढली

**◆ नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

भारताच्या अर्थव्यवस्थेने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर ८.२ टक्क्यांच्या वेगाने वाढला. हा दर गेल्या सहा तिमाहींमधील सर्वाधिक आहे. ही वाढ देशांतर्गत मागणी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सरकारी खर्चाची ताकद स्पष्ट करणारी ठरली आहे.

मागील तिमाहीत ७.८ टक्के असलेला आर्थिक विकासदर दुसऱ्या तिमाहीत ८.२ टक्क्यांपर्यंत वाढला. अर्थशास्त्रज्ञांनी ७.३ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला होता, तर आरबीआयने तो ७ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला होता. सरकारने जीएसटीमध्ये कपात, सणांपूर्वी वाढलेला साठा आणि ग्रामीण भागात मागणीत वाढ ही या वाढीमागील प्रमुख कारणे होती.

२२ सप्टेंबर रोजी जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्यात आले. यामुळे घरगुती वस्तू आणि किराणा माल यासारख्या एफएमसीजी उत्पादनांच्या विक्रीत वाढ झाली.

**दुसऱ्या तिमाहीत विकासदर ८.२ टक्के**



जीएसटी सवलतीमुळे अंदाजे २ लाख कोटी रुपयांची अतिरिक्त बचत होईल, यामुळे खर्च वाढेल आणि अर्थव्यवस्थेला ऊर्जा मिळेल, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सांगितले होते. भारताच्या मजबूत जीडीपी वाढीचे श्रेय ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सुधारणा, सरकारी भांडवली खर्च आणि वाढलेली निर्यात या तीन प्रमुख घटकांना दिले जात आहे.

**शेतीत सुधारणा, खाणकामात घट**

कृषी आणि खाणकाम यांचा समावेश असलेल्या प्राथमिक क्षेत्रात वार्षिक वाढ ३.१ टक्के होती. कृषी क्षेत्राची वाढ ३.५ टक्के होती, जी गेल्या वर्षीच्या तुलनेत थोडी कमी होती. खाणकाम क्षेत्र तुलनेने स्थिर राहिले, फक्त ०.०४ टक्क्यांनी घटले. दरम्यान, ग्रामीण अर्थव्यवस्थेत सुधारणा आणि चांगल्या पावसाळ्यामुळे कृषी उपक्रमांना चालना मिळाली. *(वृत्तसंस्था)*

### विकास दराचे आकडे उत्साहवर्धक : पंतप्रधान

देशाच्या आर्थिक विकास दराचे जाहीर झालेले आकडे उत्साहवर्धक असल्याची प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. आर्थिक विकासामध्ये सुधारणांसाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरल्याचे हे प्रतीक आहे. लोकांच्या कठोर परिश्रमाने हे साध्य झाले आहे. यापुढेही सरकार सुधारणांवर कार्य करतच राहील, असेही पंतप्रधानांनी म्हटले आहे.

## राजेश अग्रवाल राज्याचे मुख्य सचिव

**◆ मुंबई, २८ नोव्हेंबर**

राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मीना ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार असल्याने, त्यांच्या जागी सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत असलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी राजेश अग्रवाल यांची राज्याचे मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

३० जून २०२५ ला ज्येष्ठ सनदी अधिकारी राजेशकुमार मीना यांची राज्याचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. १९८८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी असलेले राजेशकुमार मीना हे ऑगस्ट २०२५ मध्ये सेवानिवृत्त होणार होते. त्यामुळे मुख्य सचिव पदासाठी त्यांच्याकडे जुलै आणि ऑगस्ट या जेमतेम दोन महिन्यांचाच कालावधी होता. आता राजेश कुमार मीना हे ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

## मिर्झा एक्सप्रेस थांबली

### सुप्रसिद्ध कवी डॉ. मिर्झा बेग यांचे निधन

**अमरावती** : सुप्रसिद्ध कवी, हास्यसम्राट 'मिर्झा एक्सप्रेस' फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे शुक्रवार, २८ नोव्हेंबरला सकाळी ६.३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते. यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील धनज-माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव आहे. सध्या अमरावती येथील वलगाव रोडवरील नवसारी परिसरात 'मिर्झा एक्सप्रेस' या घरात त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी फातेमा मिर्झा, अभियंता मुलगा रमीज, महाजबी व हुमा या दोन कन्या आहेत. त्यांच्यावर अमरावती येथील ईदगा कब्रस्तानात दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. खासदार अनिल बोंडे व साहित्यासह विविध क्षेत्रातील मंडळींनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले.



# कुलगुरूने मृत हिंदूंच्या जमिनी हडपल्या

**◆ नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

अल फलाह विद्यापीठाचा कुलगुरू जावेद अहमद सिद्दीकीने मृत हिंदूंच्या मालकीची जमीन हस्तांतरित करण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचे पुढे आले आहे. या नव्या आरोपामुळे अल फलाहचे पाय आणखी खोलात जाणार आहेत. ईडी आता जमिनीच्या व्यवहारांशी संबंधित नवीन आरोपांची चौकशी करत आहे.

ईडीच्या मते, मदनपूर खादरमधील खसरा क्रमांक ७९२ असलेली जमीन तारबिया एज्युकेशन फाउंडेशनला हस्तांतरित करण्यात आली होती, जी सिद्दीकीशी संबंधित





असल्याचे म्हटले जाते. एजन्सीने असे म्हटले आहे की सादर केलेला जीपीए २००४ चा आहे, तर कागदपत्रात सूचीबद्ध बहुतेक मालक १९७२ ते १९९८ दरम्यान मरण पावले. तपास एजन्सींचे म्हणणे आहे की संपूर्ण जमीन हस्तांतरण प्रक्रिया या बनावट कागदपत्रांवर अवलंबून होती. हे बनावट कागदपत्रे मृत हिंदूंच्या नावे तयार करण्यात आली होती आणि हे कागदपत्रे केवळ बेकायदेशीर नव्हती तर जमिनीची पुनर्नोंदणी करण्यासाठी वारंवार वापरली जात होती. सिद्दीकीला १८ नोव्हेंबर रोजी मनी लाँड्रिंगच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती.

एजन्सीचे म्हणणे आहे की तपासा दरम्यान मिळालेल्या कागदपत्रांवरून आणि डिजिटल पुराव्यांवरून जमीन व्यवहारात अनियमितता झाल्याचे सिद्ध होते. सध्या त्याची कसून चौकशी सुरू आहे. *(वृत्तसंस्था)*

### विद्यापीठ अनुदानास अपात्र

**ईडीने विद्यापीठ आणि त्याच्या संलग्न कार्यालयांवर व्यापक छापे टाकले. तपासात असे दिसून आले की विद्यापीठाने त्याच्या मान्यताबाबत दिशाभूल करणारे दावे केले होते. यूजीसीने स्पष्ट केले की ही संस्था फक्त राज्य खाजगी विद्यापीठाच्या श्रेणीत येते आणि कोणत्याही अनुदान किंवा विशेष मान्यतासाठी पात्र नाही. एजन्सी आता त्याच पत्त्यावरून कार्यरत असलेल्या नऊ शेल कंपन्यांची देखील चौकशी करत आहे.**

## आधार कार्डाच्या आधारे दिलेले
# जन्म-मृत्यूचे दाखले रद्द करा
### महसूल मंत्री बावनकुळे यांचा आदेश

**◆ मुंबई, २८ नोव्हेंबर**

केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करा, तसेच याप्रकरणी पोलिस तक्रारी दाखल करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनाला दिले आहेत. यासंदर्भातील परिपत्रक महसूल विभागाने जारी केले आहे.

अमरावती, सिल्लोड, अकोला, छत्रपती संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अर्धापूर आणि परळी या ठिकाणी या मोहिमेवर अधिक भर दिला जाणार आहे.

१६ मुद्यांच्या आधारे या दाखल्यांची तपासणी केली जाईल. यासाठी विशेष मेळाव्यांचं आयोजन करुन प्रकरणे निकाली काढली जातील. ज्या प्रकरणांमध्ये केवळ



आधार कार्डला पुरावा मानून जन्म मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. अर्जातली माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळली तर संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल केला जाईल.

जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी बनवून त्यांना 'फरार' घोषित करा आणि एफआयआर दाखल करा असेही या परिपत्रकात म्हटले आहे. ११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरीत केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

### बिहारच्या उपमुख्यमंत्र्यांच्या स्वागत रॅलीत गोळीबार

**लखीसराय** : बिहारचे उपमुख्यमंत्री विजय सिन्हा लखीसराय विधानसभा मतदारसंघातून सलग पाचव्या विजयानंतर शुक्रवारी बरहिया येथे पोहोचले. त्यांच्या स्वागतासाठी समर्थकांनी बंदुकीतून गोळीबार करून स्वागत केले. यावेळी आजूबाजूने जाणारे लोक काही काळ घाबरले. यावेळी विजय सिन्हा गाडीतून माईक घेऊन बोलताना दिसले- आमचे सरकार स्थापन केल्याबद्दल लखीसरायच्या जनतेचे आभार. त्यांच्या या आवाजादरम्यान समर्थक गोळीबार करत राहिले.

### तिरुमलासारखे भव्य वेंकटेश्वर मंदिर उभारणार

**अमरावती** : आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी अमरावतीतील वेंकटपालेम येथील वेंकटेश्वर स्वामी मंदिराच्या विस्ताराची पायाभरणी केली. तिरुमला मंदिराच्या धर्तीवर २६० कोटी रुपये खर्चून मंदिराचा विस्तार केला जाईल. हे मंदिर अवघ्या अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी अमरावतीमधील वेंकटपालेम वेंकटेश्वर स्वामी मंदिराच्या मोठ्या विस्ताराची पायाभरणी केली. तिरुमलाच्या धर्तीवर हे मंदिर साकारले जाणार आहे. पहिल्या टप्प्याला १४० कोटी रुपये आणि दुसऱ्या टप्प्याला १२० कोटी रुपये खर्च येईल. यामध्ये सात मजली राजगोपुरम, पुष्करणी, अन्नदानम संकुल, विश्रामगृह आणि एक मोठे पार्किंग लॉट असेल.

# नगरपालिका आजतागायत जिल्ह्यातून २० सदस्य अन् १ नगराध्यक्ष बिनविरोध

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगर परिषदेसाठी अध्यक्ष पदासाठी ६६ उमेदवार तर सदस्य पदासाठी ८९३ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी १५२ प्रभागातील २ लाख २२ हजार २४७ महिला, २ लाख २१ हजार १४३ पुरूष आणि इतर मतदार ९४ असे ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. अनगर ही नगरपालिका अविरोध झाली असून, इतर ३ तालुक्यातही ३ सदस्य बिनविरोध निघाल्याने जिल्ह्यात २० सदस्य आणि १ नगराध्यक्षपदाची बिनविरोध निवड झाल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सहआयुक्त योगेश डोके यांनी दिली.

जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगरपरिषदेसाठी २ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून मतदान प्रकिया पार पडणार आहे. जिल्ह्यात या निवडणुकीसाठी ४९९ मतदान केंद्र असून, १३२२ बॅलेट युनिट व ६११ कंट्रोल युनिटच्या माध्यमातून मतदान होणार आहे, मतदान प्रकिया शांततेत व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी बूथ निहाय व केंद्र निहाय तीन पोलीस तैनात करण्यात आले आहेत. जवळपास एक हजार पोलिसांचा फौजफाटा आहे. २७०० हुन अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचारी निवडणूक प्रकियेत सहभागी आहेत. सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीखाली दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजले पासून मतमोजणी प्रकिया ज्या-त्या ठिकाणच्या गोडाऊन येथे पार पडणार असल्याची माहिती दिली.

**खालील ठिकाणचे उमेदवार बिनविरोध**

मंगळवेढा येथील बीजेपीचे प्रभाग क्र. ३ मधील सोमनाथ विष्णुपंत आवताडे आणि बार्शी येथील प्रभाग क्र. ७ च्या शिवसेनेच्या उमेदवार मीरा शीतल नाळे हे दोघेजण विरोधी पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने बिनविरोध झाले आहेत. तर पंढरपूर येथील प्रभाग क्र. ५ च्या कुसुम जगन्नाथ प्रचंडे या भाजपच्या उमेदवारही बिनविरोध झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक कार्यालयातून मिळाली. तर अनगर नगरपालिकेचे एक नगराध्यक्ष आणि १७ सदस्य यापूर्वीच बिनविरोध निघाल्याने बिनविरोध सदस्यांची संख्या २० आणि १ नगराध्यक्ष अशा २१ जणांचा समावेश आहे.

**राज्यातील निवडणूक आयोगाचीही यंत्रणा सज्ज**

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या मतदानासाठी निवडणूक आयोगाची यंत्रणा सज्ज झाली आहे.



नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी ईव्हीएम मशीनचा व्यवस्था करण्यात आली असून, त्यात १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची उपलब्धता करण्यात आली आहे.राज्यातील २४६ नगरपरिषदा तर ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदान होणार आहे. तर मतमोजणी ३ डिसेंबरला सकाळी १० वाजेपासून सुरु होणार आहे.

**मंगळवेढ्याबाबत आयोगाच्या सुधारित आदेशाची प्रतिक्षाच!**

ज्या जागांसाठी जिल्हा न्यायालयात अपील दाखल असून, सुनावणी प्रलंबित आहे किंवा सुनावणी झालेली आहे, परंतु आदेश अप्राप्त आहेत. त्यांची निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. मात्र या आदेशावर तीव्र पडसाद मंगळवेढ्यात उमटत आहेत. यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवले असून सुधारित आदेशाची प्रतीक्षा लागून राहिली. ती आज पूर्ण होण्याची शक्यता होती मात्र रात्री उशिरापर्यंत सुधारित आदेशाची प्रत मिळालेली नाही. मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रागिनी कांबळे, सुप्रिया जगताप, सुनंदा अवताडे या तिघी विरोधात पंढरपूर येथील न्यायालयात तीन अपील होते. त्या अपिलाचा निकाल काल झाला; त्यामध्ये निवडून निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी दिलेला निकाल कायम ठेवण्यात आला होता.

## महत्त्वाचे...



### वडकबाळ येथील गोशाळेत ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

वडकबाळ येथील श्री कट्टेव्वादेवी गोशाळेत श्री राम जन्मभूमी अयोध्या येथील राम मंदिर शिखरावर भगवा सनातन धर्मध्वजारोहण निमित्त ध्वजारोहण कार्यक्रम करण्यात आले. प्रथम गोमातेचे पूजन व आरती त्यानंतर श्रीराम प्रभू प्रतिमेचे पूजन व आरती करून भगवा सनातन धर्मध्वजारोहण करण्यात आले. सर्वांना गोड प्रसाद वाटप करून गोमय उत्पादन भेट देण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्ष उमा बिराजदार, सहाय्यक कृषी अधिकारी कस्तुरे मॅडम व मंडळ कृषीअधिकारी अश्विनी शिंत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत व वडकबाळ येथील महिला बचत गटाच्या महिला सदस्य, गोसेवक रुद्रप्पा बिराजदार, सिद्धप्पा बिराजदार, महादेव बिराजदार, पिरप्पा बिराजदार, मल्लिनाथ बिराजदार आदी गोभक्त उपस्थित होते.



### सुदृढ बालक, सशक्त भारत अंतर्गत १०० बाल रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सोलापूर आणि लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय बाल शल्यचिकित्सा विभाग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बालरुग्ण शस्त्रक्रिया शिबिर मोठ्या उत्साहात सुरू झाले. पहिल्या दिवशी १०० बाल रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. यामध्ये जीभ टाय, फिमोसिस, हर्निया, अवांतरित अंडकोष, नाभी हर्निया आणि सिस्ट यांसारख्या शस्त्रक्रिया नियोजित आहेत.

शिबिराचे उद्घाटन डॉ. वर्षा डोईफोडे जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ. पारस कोठारी प्रमुख, बालशल्यचिकित्सा विभाग, लोकमान्य टिळक रुग्णालय, मुंबई, वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेरकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. जयश्री ढवळे, डॉ. आशा घोडके, रोटरी जिल्हा ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातुरे, २०२६-२७चे प्रांतपाल जयेश पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुंबईच्या लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम विशेषतः या शिबिरासाठी सोलापूरला दाखल झाली असून, जिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टर आणि स्टाफ यांच्या सहकार्याने पुढील दोन दिवस शस्त्रक्रिया पार पडणार आहेत.

कार्यक्रमास सहाय्यक प्रांतपाल जयश्री चव्हाण, डॉ. ज्योती चिडगूपकर, सौ. शांता येळंबकर, सौ. पारुल पटेल, सुहास लाहोटी, मितेश पंचमीया, संतोष कणेकर, शिवाजी उपरे, पराग कुलकर्णी , प्रशांत सिंगी, बी.एस. मुंदडा, राज मिनियार , कालिदास जाजू , विलास कोल्हे, आनंद गुंड्याल, डॉ. सोनाली वळसंगकर आदी मान्यवर उपस्थित होते.



# रेशीम कोष वाहतुकीतून रेल्वेला मिळाला नवीन महसूल स्त्रोत

- पहिल्याच दिवशी १,५०० किलो वजनाचे रेशीम कोष बुक
- शेतकऱ्यांना प्रति किलो ५ रुपयांपेक्षा कमी किंमतीत वाहतूक पर्याय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

रेशीम कोष वाहतुकीच्या माध्यमातून रेल्वेला नवीन महसलू स्त्रोत मिळाला आहे. पहिल्याच दिवशी पंढरपूर विभागातील एका शेतकऱ्याने १ हजार ५०० किलो वजनाचे ३८ पोते रेशीम बुक झाले आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांना प्रति किलो ५ रुपयांपेक्षा कमी किंमतीत वाहतूक पर्याय उपलब्ध झाला असल्याचे सांगण्यात आले.

शेतकऱ्यांना किफायतशीर, थेट बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनानुसार, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २७ नोव्हेंबर २०२५ रोजी पंढरपूरहुन आशियातील सर्वात मोठी रेशीम कोष बाजारपेठ असणाऱ्या कर्नाटकातील रामनगरम येथे, थेट रेशीम कोष वाहतूक करुन एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

कर्नाटकातील बेंगळुरू जवळील रामनगरम हे आशियातील सर्वात मोठे रेशीम कोष व्यापार केंद्र आहे. पंढरपूर, सोलापूर आणि कलबुर्गी ते रामनगरम पर्यंत रेशीम कोषची परवडणारी, एंड-टू-एंड वाहतूक शक्य होईल, यामुळे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होईल, लॉजिस्टिक्स खर्चातही घट होईल, असे सांगण्यात आले.

सोलापूर विभाग आधीच रामनगरम ला ट्रेन क्रमांक १६५३६ पंढरपूर-म्हैसूर गोलगुंबज एक्स्प्रेस आणि १७३०८ बागलकोट-म्हैसूर बसवा एक्सप्रेसने जोडलेला असला तरी, रामनगर येथे पाच मिनिटापेक्षा कमी वेळेचा थांबा असल्यामुळे सिल्क कोकन्स लवकर बुक करता आले नाहीत.

### स्वस्त, वेगवान, सुरक्षित वाहतूक

रेल्वे आधारित वाहतूक ३० टक्क्यांपेक्षा जास्त स्वस्त तसेच रस्ते किंवा इतर वाहतुकीपेक्षा खूप वेगवान व सुरक्षित अशी आहे.

### सोलापूर विभागातून धावणाऱ्या रेल्वेगाड्या

१६५३६ गोलगुंबज एक्स्प्रेस ही पंढरपूरहून दुपारी २:०० वाजता आणि सोलापूरहून दुपारी ३:३० वाजता रामनगरमकडे निघणारी दररोजची रेल्वेसेवा.

१७३०८ बसवा एक्स्प्रेस ही सोलापूरहून १९:३० वाजता आणि कलबुर्गीहून २१:१५ वाजता राम नगरमकडे जाणारी दैनिक रेल्वेसेवा.

या समस्येचे निराकरण करण्यासाठी व शेतकऱ्यांना लॉजिस्टिक सहाय्य प्रदान करण्यासाठी मध्य रेल्वे आणि दक्षिण पश्चिम रेल्वे यांनी संयुक्तपणे प्रयत्न केले, असेही सांगण्यात आले.

## श्री ईश्वरस्वरुप सत्यदर्शनम् पुस्तकाचे प्रकाशन



**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर पेन्शनर्स असोसिएशनच्या कार्यालयात गुरूवारी एका उत्साही प्रकाशन सोहळ्यात श्री ईश्वरस्वरूप सत्यदर्शनम आणि श्री विठ्ठल प्रार्थना या दोन महत्त्वाच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. घालदेव जाधव यांनी संपादित केलेल्या श्री ईश्वरस्वरूप सत्यदर्शनम् या पुस्तकातून ईश्वराचे स्वरूप, त्याची कारणे आणि ईश्वर आश्वासन या संकल्पना सामान्य लोकांना सहजपणे समजून घेता येणार आहेत.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेले महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात या दोन्ही ग्रंथांचे महत्त्व अधोरेखित केले. "साम ान्य वाचकांना क्लिष्ट वाटणाऱ्या अध्यात्मिक विषयांची माहिती या ग्रंथातून सोप्या भाषेत मिळाली आहे," असे त्यांनी सांगितले. श्री ईश्वरस्वरूप सत्यदर्शनम या ग्रंथातून ईश्वर काय आहे? कोण? केव्हा? का येतो? कसा येतो? यासारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे मिळतील, तसेच ईश्वर आश्वासन काय आहे? कोठे देतात? कोणाला देतात? केव्हा देतात? या प्रश्नांचा उलगडा सामान्य वाचकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

गीता ज्ञानेश्वरी मंदिर, लिमयेवाडी येथील अच्युत मोफरे महाराज यांनी प्रकाशित केलेल्या या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सदाशिव उंब्रजकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, जिल्हा कोषागार अधिकारी वैभव राऊत, अपर कोषागार अधिकारी रामकृष्ण डंके यांच्या हस्ते पार पडला. यावेळी भालचंद्र धुमाळ, सुभाष रंगदाळ, अरुण डांगे, प्रा. विलास मोरे, श्याम कांबळे, गौरीशंकर कोनापुरे, विजय अभ्यंकर, इंडे प्रिंटर्सचे श्रीशैल इंडे यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी आणि मान्यवर उपस्थित होते.

### मतदान व मतमोजणी कालावधीत मद्य विक्री बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२७ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, अकलुज, बार्शी, दुधनी, मैंदर्गी, करमाळा, कुडुवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला नगरपरिषद सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान व मतमोजणी कालावधीत मद्य विक्री बंद ठेवण्यात यावे, असा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढले आहेत.

संबंधित नगरपरिषदा/नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रामध्ये सार्वजनिक शांतता व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी नगरपरिषदा/नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रातील सर्व देशी/विदेशी किरकोळ मद्य विक्री व ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-२. एफएल-३, एफएल-४ (क्लब अनुज्ञप्ती), एफएल/बीआर-२, सीएल-२, सीएल-३., सीएल/एफएल/टिओडी-३, टिडी-१ इ.) इत्यादी) खालील प्रमाणे बंद ठेवण्याचे आदेश देत आहे. त्यात कसूर झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही यात म्हटले आहे.

## मसिहा संस्थेच्या रक्तदान शिबिरात ३१० रक्तपिशव्यांचे संकलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

संविधान व शहीद दिनानिमित्त येथील मसिहा सामाजिक बहुद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात ३१० रक्तपिशव्यांचे संकलन झाले. याकामी सोलापूर ब्लड बँकेने सहकार्य केले, असे संस्थेचे संस्थापक अमित मंचले यांनी सांगितले.



माजी आमदार नरसय्या आडम यांच्या हस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्रीदेवी फुलारे, वैष्णवी करगुळे, श्रीकांत डांगे, ॲड.अनिल वासम, मारेप्पा कंपली यांची प्रमुख उपस्थिती होती, असेही त्यांनी सांगितले.

## थकबाकी वसुलीसाठी झेडपी घेणार विधी सेवा प्राधिकरणाची मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियानांतर्गत राज्य सरकारने ग्राम पंचायत घरपट्टी (मालमत्ता कर), पाणीपट्टी आदी करांच्या थकबाकीवर ५० टक्के सवलत जाहीर केली आहे. थकबाकीची १०० टक्के वसूल करण्यासाठी झेडपी अर्थात जिल्हा परिषदेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची मदत घेतली जाणार आहे. यासंदर्भात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने १३ डिसेंबर २०२५ रोजी लोक अदालत घेण्यात येणार आहे, असे सीईओ कुलदीप जंगम यांनी सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने नुकतीच जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील गटविकास अधिकाऱ्यांची बैठक घेतली. घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून ग्रामस्तरावर विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. पहिल्या मोहिमेत कोट्यवधी रुपयांचा कर जमा झाला. चांगले काम करणाऱ्या ग्रामपंचायतीचा व ग्रामसेवकांचा सन्मान देखील करण्यात आला. ५० टक्के कर सवलत घेण्यापूर्वी ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. त्या ग्रामसभेत ५० टक्के कर सवलतीसंदर्भातील ठराव करणे बंधनकारक आहे, असेही त्यांनी सांगितले.

## ...अन्यथा स्मार्ट मीटर फोडू : संभाजी ब्रिगेड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

अदानी समूह कंपनी मार्फत वीज ग्राहकांना नवीन टीओडी मीटर म्हणजेच स्मार्ट मीटर बसवण्याचे काम संपूर्ण महाराष्ट्रात दिले आहे. हे मीटर बसवण्यासाठी कंपनीच्या लोकांकडून सक्ती केली जात आहे. स्मार्ट मीटर बसवणे बंद करून ज्यांना लावले असतील ते मीटर काढण्यात यावे अन्यथा स्मार्ट मीटर फोडण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडच्यावतीने देण्यात आला.



ग्राहक घरी नसताना त्यांचे बाहेरील भिंतीवरचे मीटर परस्पर त्यांच्या परवानगी शिवाय बदलले जात आहेत. इथून पुढे तुमच्या घरी मीटर रीडिंगसाठी लाईट ऑफिसचे कर्मचारी येणार नाहीत व हे स्मार्ट मीटर कंपल्सरी बसवणे बंधनकारक आहे. असे सांगून ग्राहकांचा फसवणूक करत आहेत. हे मीटर बसवल्यानंतर ग्राहकांना दुप्पट ते तिपटीने बिल वाढवून येत आहे.

या मीटरच्या वाढीव बिला संदर्भात नागरिक लाईट ऑफिसला गेले असता तिथल्या अधिकारी त्यांची दखल घेत नाहीत, असे सांगण्यात आले.

स्मार्ट मीटरच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. जिल्हाधिकारी कुम ार आशीर्वाद आणि विद्युत विभाग अभियंता यांच्याकडे निवेदनही देण्यात आले. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महानगर प्रमुख जगदाळे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखा मीनल दास, गणेश कदम, मनीषा कोळी, सुनीता घंटे, राजेंद्र माने, शेखर भोसले, सिद्धाराम सावळे, सतीश वावरे, जरयाब आबादिराजे, साहिल बागवान, अस्लम शेख, मुरतुज शेख, इस्माईल शेख, गऊस शेख, शफिक मकाशे आदी उपस्थित होते.

## पंडीत भीमण्णा जाधव, व्यंकटेशकुमार जाधव यांना आकाशवाणी संगीत संमेलनात सुंद्रीवादनकरिता निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

आकाशवाणी सगीत संमेलन निमंत्रण भारत सरकार कडून आकाशवाणी पुणे केंद्र व आकाशवाणी धारवाड केंद्राच्या माध्यमातून पंडीत भीमण्णा जाधव, व्यंकटेशकुमार यांना सुंद्रीवाद्य वादनकरिता निमंत्रण आलेल्याची माहिती जागतिक कीर्तीचे सुंद्रीवादक पंडीत भीमण्णा जाधव यांनी माहिती दिली.

आकाशवाणी संगीत संमेलन प्रसार भारती सांस्कृतीक मत्रालंय भारत सरकारच्या माध्यम ातून ७३ वे वर्ष निम्मित भारत देश्यातील ए व टॉप ग्रेड च्या निवडक कलावंताना निमंत्रीत करण्यात आले आहे. हा आकाशवाणी सगीत संमेलन होणार आहे.त्यामध्ये सोलापूरचे पिता पुत्र पंडीत भिमण्णा जाधव मास्टर व्येकटेशकुम ार (सुंद्रीवाद्य वादन) पंडीत रविकिरण नाकोड (तबला) मल्लमल्लेश देसाई कल्लूर (दुक्कडं) वाद्य साथ करणार आहेत.





पंडीत भिमण्णा जाधव हे सुंद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे नातू तर वडील पंडित चिदानंद जाधव यांचे चिरंजीव होय. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी युवावाणी ऑल इंडिया रेडिओसाठी प्रसारक म्हणून सार्वजनिक पदार्पण केले सोलापूर सुंदरी हे दुर्मिळ आणि अद्वितीय वाद्य आहे. ज्यांचे पालनपोषण शोधण्याचा आणि सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केवळ जाधव कुटुंबापुरता मर्यादित नाही पंडित भीमण्णा यांनी या वाद्याचा भारताच्या सीमेपलीकडे गौरव केला आहे, त्यांनी फ्रान्स आणि बेल्जियममध्ये आपली कला सादर करून आपल्या कुटुंबाची स्वप्ने साकार केली आहेत. इंडियन कौन्सिल ऑफ कल्चरल रिलेशन्स आणि भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने सुंद्री या दुर्मिळ वाद्याचा प्रचार आणि संकलन करण्याकरिता पंडीत भिमण्णा जाधव यांचे नांव स्वतंत्रपणे समाविष्ट केले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने गुरु शिष्य परंपरा योजना दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर आणि संगीत नाटक अकादमी ऑफ म्युझिक डान्स अँड ड्रामा यांच्या माध्यमातून अनेक शिष्यांना प्रशिक्षण दिले आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या ऑल इंडिया रेडिओला सर्वोच्च श्रेणीतील टॉप कलाकार म्हणून पंडीत भिमण्णा जाधव यांना मान्यता मिळाली आकाशवाणी संगीत संमेलनांतर्गत आणि परदेशात आयोजित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत राष्ट्रपती भवन, २० शिखर संमेलन, यशोभूमी उदघाटन, रामलल्ला प्रतिष्ठान अयोध्या येथे सुंद्री वादन, प्रजासत्ताक दिन कर्त्यव्य पथाची सुंद्री वादनाने सुरुवात अश्या अनेक प्रतिष्ठित संगीत मैफलीत सुंद्री वाद्य वादन सादर.

आकाशवाणी प्रतीयोगिता स्पर्धा पुरस्कार पश्चिम बंगाल जदुभट्ट पुरस्कार समाजभूषण पुरस्कार गुजरात रत्न पुरस्कार, केंद्रीय संगीत नाटक अकादमी उस्ताद बिस्मिल्ला खा पुरस्कार २००७, उस्ताद अल्लाउद्दीन खा संगीत आणि कला प्रदेश अकादमी सांस्कृतिक परिषद भोपाळ उस्ताद लतीफ खान सन्मान २०१९, कु.मास्टर व्येकटेंशकुमार भिमण्णा जाधव गुरुवर्य वडील पंडित भिमण्णा जाधव यांच्याकडून सुंद्री वाद्य वादनाचे प्रशिक्षण घेत आहेत.

सुद्रीसम्राट पंडित सिद्राम जाधव यांचे परंतन्डु पंडित चिदानंद जाधव यांचे नातू जाधव घराण्याची ५वी पिढीतील कलाकार सुंद्रीसारख्या दुर्मिळ वाद्याचा प्रसार करताना कु.मास्टर व्येकटेंशकुमार आकाशवाणीने दूरदर्शन, राष्ट्रपती भवन, प्रजासत्ताक दिन कर्त्यव्य पथाची सुंद्री वादन,भीमपलासी धारवाड, ८५ अखिल भारतीय कन्नड साहित्य संमेलन गुलबर्गा, सुरसिगार संस्था मुंबई, बाल गंधर्व संगीत महोत्सव सोलापूर, संगीत संजे बिजापूर,कलबुर्गी, कल्याण कर्नाटक फेस्टिव्हल, सगीत नाटक अकादेमी आयोजित वर्ल्ड म्युझिक डे फेस्टिव्हल दुर्मिळ समारोह नवी दिल्ली, सुंदरी सम्राट संगीत महोत्सव सोलापूर सगीतभूषण पंडीत राम मराठे सगीत महोत्सव ठाणे, रामकृष्ण आश्रम स्वामी विवेकानंद फेस्टिवल कोलकत्ता, आणि भारतातील विविध राज्ये अनेक म्युझिक वर्कशॉप्स म्युझिक फेस्टिव्हलमध्ये भाग घेतला आहे, भारत सरकारचा मिनिस्ट्री ऑफ कल्चरल माध्यमातून संस्कृतीक स्तोत्र एवं प्रशिक्षण केंद्रचा दुर्मिळ वाद्या करिता भारतातून प्रथम स्कॉलरशिप अवॉर्ड, पदमविभूषण हरिप्रसाद चौरसिया राष्ट्रीय फेलोशिप सन्मान प्राप्त सद्या तो सोलापूर येथे दमाणी विद्या मंदिर सोलापूर येथे इ. ९ वी वर्गात सीमा मोहळकर मैडम व मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती अधीन शालेय शिक्षण पूर्ण करत आहे.

## सोलापूर विद्यापीठातील संकुलांचे शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यांकन जाहीर

### रसायनशास्त्र, सामाजिकशास्त्रे, संगणकशास्त्र पदार्थविज्ञान, संकुलांची उत्कृष्ट कामगिरी

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २८ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामार्फत २०२२-२५ या कालावधीतील बाह्य शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यांकनाचा अहवाल जाहीर करण्यात आला. विद्यापीठ कॅम्पस मधील एकूण ११ संकुलांचे मूल्यम ापन करण्यात आले.



यात रसायनशास्त्र, सामाजिकशास्त्रे, पदार्थविज्ञान आणि संगणकशास्त्र संकुलाने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर आणि मुंबई येथील विद्यापीठ विभाग फ्रेमवर्क रँकिंगचे मूल्यांकन डॉ.एम.एस. कुऱ्हाडे यांच्या समितीने सदर मुल्यांकन केले.

रसायनशास्त्र आणि सामाजिकशास्त्रे संकुलानी प्रत्येकी ८४ गुण, संगणकशास्त्र संकुलाने ७९ गुण, पदार्थ विज्ञान संकुलाने ७६ गुण, भूशास्त्र संकुलाने ७५ गुण तर भाषा आणि साहित्य संकुलाने ६९ गुण मिळविले. आरोग्य विज्ञान संकुल, कला व ललितकला संकुल, जीवशास्त्र संकुल, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र संकुल आणि स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी या संकुलांनीही समाधानकारक कामगिरी केली आहे.

प्रशासकीय विभागांचेही मूल्यमापन करण्यात आले. यात सामान्य प्रशासन (कुलसचिव कार्यालय), शैक्षणिक व संशोधन विकास, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा विभाग, ज्ञानस्त्रोत केंद्र, नवोन्मेष व इन्क्युबेशन, कौशल्य विकास, क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि वैज्ञानिक उपकरण केंद्र या विभागांचा समावेश होता.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर यांच्या हस्ते संकुल आणि विभागांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ.गौतम कांबळे यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव अनिल जाधव यांनी आभार मानले.

# श्रीलंकेत चक्रीवादळाचे थैमान

**● ७६ नागरिकांचा बळी, ६०० घरे भुईसपाट ● उद्या धडकणार भारताच्या किनारपट्टीवर**





चक्रीवादळामुळे अनेक घरांचे नुकसान झाले असून पुरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी बचाव पथके सरसावली आहेत

◆ **कोलंबो, २८ नोव्हेंबर**

बंगालच्या उपसागरात तयार झालेले दितवाह चक्रीवादळ गुरुवारी मध्यरात्रीनंतर श्रीलंकेच्या किनारपट्टीवर धडकले. मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे राजधानी कोलंबोसह इतर शहरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. चक्रीवादळाच्या धुमाकुळामुळे आतापर्यंत ७६ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ५० पेक्षा अधिक बेपत्ता आहे. ६०० पेक्षा अधिक घरांचे नुकसान झाले, तर हजारो नागरिकांना स्थलांतरित व्हावे लागले.

श्रीलंकेतील विध्वंसानंतर चक्रीवादळ भारताच्या दिशेने सरकत असून, रविवारी उत्तर तामिळनाडूच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज आहे. चक्रीवादळाचा धोका प्रामुख्याने तामिळनाडू, पुद्दुचेरी, दक्षिण आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि केरळच्या किनारपट्टीलगच्या भागांना बसणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे. श्रीलंकेच्या आपत्ती व व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मुसळधार पावसाने प्रचंड नुकसान केले, अनेक भागात घरे, रस्ते आणि शेती पाण्यात बुडाली. याशिवाय अनेक भागात भूस्खलन झाले असून आतापर्यंत ७६ नागरिकांच्या मृत्यूची आकडेवारी मिळाली आहे. सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसामुळे सहाशेपेक्षा अधिक घरे जमीनदोस्त झाली, तर ५० हून अधिक नागरिक बेपत्ता आहे. बचाव पथकाने हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचविले आहे. बिकट परिस्थिती लक्षात घेता, सरकारने शुक्रवारी सर्व सरकारी कार्यालये आणि शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. (वृत्तसंस्था)



“ श्रीलंकेतील चक्रीवादळात ज्यांनी आपले नातेवाईक गमावले त्यांच्याबद्दल माझ्या मनापासून संवेदना, मी बाधित नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना करतो. सागर बंधू मोहिमेंतर्गत भारताकडून मदत साहित्य, मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण मदत पाठवण्यात आली. संकटाच्या काळाच भारत श्रीलंकेसोबत उभा आहे. आवश्यकता भासल्यास आणखी मदत पाठवली जाईल.

**- नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### चहा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

सरकारच्या म्हणण्यानुसार, बादुल्ला आणि नुवारा एलिया या डोंगराळ चहा उत्पादक भागात सर्वात जास्त नुकसान झाले. या भागात २५ जणांचा मृत्यू झाला. आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या म्हणण्यानुसार, या दोन्ही भागात २१ जण बेपत्ता आहेत, तर १४ जण जखमी झाले. भूस्खलनामुळे अनेक महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाल्याने मदत कार्यासाठी बाधा येत आहे. ढिगाऱ्यात अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवली जात आहे.

### बचावकार्यासाठी लष्कराची मदत

श्रीलंकेत गेल्या २४ तासांत ३०० मिमी पेक्षा जास्त मुसळधार पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या, पुराच्या घटना घडल्या, आतापर्यंत ४३,९९१ लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. सरकारने शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालयांना सुटी जाहीर केली. रेल्वे सेवा थांबवण्यात आली आहे, तर कोलंबो स्टॉक एक्स्चेंजमधील व्यवहारही थांबवावे लागले. नागरिकांच्या बचावासाठी लष्कर आणि वायुदलाची मदत घेतली जात आहे.

# शक्तिशाली देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानावर

**● अमेरिका, चीनला देतोय् टक्कर ● पाकिस्तान पहिल्या १५ मध्येही नाही**

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियाच्या प्रतिष्ठित लोवी इन्स्टिट्यूटने त्यांचा वार्षिक आशिया पॉवर इंडेक्स २०२५ जाहीर केला आहे, जो २७ आशियाई देशांच्या लष्करी, आर्थिक, राजनैतिक आणि सांस्कृतिक प्रभावाचे तपशीलवार मूल्यांकन प्रदान करतो. अहवालात प्रादेशिक सत्तेतील मोठे बदल अधोरेखित केले आहेत, ज्यामध्ये चीन आशियातील प्रमुख शक्ती म्हणून उदयास येत आहे. भारत सतत वाढत आहे आणि अमेरिकेचा प्रभाव मागील वर्षांच्या तुलनेत कमी झाला आहे.

अहवालात आठ क्षेत्रांवर आधारित देशांची क्रमवारी लावण्यात आली आहे (लष्करी क्षमता, संरक्षण नेटवर्क, आर्थिक ताकद, राजनैतिक प्रभाव, सांस्कृतिक पोहोच, लवचिकता आणि भविष्यातील संसाधन क्षमता). जगातील दहा सर्वात शक्तिशाली देशांमध्ये अमेरिका, चीन, भारत, जपान,रशिया, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, सिंगापूर, इंडोनेशिया, मलेशिया यांचा समावेश आहे. पाकिस्तान पहिल्या १० च्या बाहेर असून १६ व्या क्रमांकावर आहे.

**भारताची वाढती शक्ती**

अहवालात आशियातील भारताच्या वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकण्यात आला आहे. भारत २०२५ मध्ये ४०.० गुणांसह प्रमुख शक्ती दर्जाचा उंबरठा ओलांडेल. अहवालानुसार, भारताची वाढ त्याच्या मजबूत आर्थिक वाढीमुळे आणि वाढत्या लष्करी क्षमतांमुळे झाली आहे. जरी भारताची लष्करी आणि संसाधनांची वाढ लक्षणीय असली तरी, त्याचा राजनैतिक आणि आर्थिक प्रभाव अद्याप त्याच्या क्षमतांच्या वाढीशी पूर्णपणे जुळलेला नाही, जो पुढील विस्तारासाठी प्रचंड क्षमता दर्शवितो.

महासत्ता श्रेणीत फक्तअमेरिका आणि चीन यांचा समावेश आहे. अमेरिका अव्वल स्थानावर आहे, परंतु २०१८ मध्ये आशिया पॉवर इंडेक्स सुरू झाल्यापासून ते सर्वात कमी प्रभाव स्कोअर दाखवत आहे. विश्लेषक याचे कारण ट्रम्प प्रशासनाच्या काळात घेतलेल्या धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगतात, जे आशियातील अमेरिकेच्या प्रभावासाठी निव्वळ नकारात्मक म्हणून वर्णन केले गेले आहेत. चीन अमेरिकेसोबतचे अंतर हळूहळू कमी करत आहे, ज्यामुळे फरकाची मर्यादा २०२० नंतरच्या सर्वात कमी बिंदूवर आली आहे. (वृत्तसंस्था)

### रशियाची स्थिती मजबूत

२०१९ नंतर पहिल्यांदाच रशियाने आशियामध्ये आपले स्थान मजबूत केले आहे. युक्रेन युद्धानंतर लादलेल्या निर्बंधांमुळे त्याने गमावलेला प्रभाव परत मिळवला आहे. मॉस्कोची वाढती प्रादेशिक उपस्थिती मुख्यत्वे चीन आणि उत्तर कोरियासोबतच्या त्याच्या धोरणात्मक संरक्षण आणि आर्थिक भागीदारीमुळे आहे. २०२४ मध्ये ऑस्ट्रेलियाकडून गमावलेले रशियाने पाचवे स्थान परत मिळवले. इतर मध्यम शक्तींच्या तुलनेत जपानचा प्रभाव वाढला आहे. दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलियासारखे देश मध्यम शक्ती म्हणून वाढत्या प्रमाणात महत्त्वाच्या भूमिका बजावत आहेत.

# इम्रान खान जिवंत आहेत की नाही!

### पुत्र कासिमने मागितला पुरावा

◆ **इस्लामाबाद, २८ नोव्हेंबर**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांचे पुत्र कासिम खान यांनी तुरुंगात असलेल्या आपल्या वडिलांच्या जिवंत असल्याचा पुरावा मागितला आहे. इम्रान जिवंत आहेत की नाहीत हे कोणालाही माहीत नसल्याचे कासिम म्हणाला.

कासिमने एक्सवर लिहिले की, त्यांच्या वडिलांना ८४५ दिवसांपूर्वी अटक करण्यात आली होती. गेल्या सहा आठवड्यांपासून त्यांना एकाकी डेथ सेलमध्ये ठेवण्यात आले आहे. कोणालाही त्यांना भेटू दिले नाही, तसेच कोणताही फोन कॉल किंवा मेसेज दिला नाही.

कासिमने सांगितले की, त्यांच्या आत्यांनाही त्यांच्या भावाला भेटू दिले जात नाही. हे सर्व कोणत्याही सुरक्षा नियमामुळे नाही, तर जाणूनबुजून केलेली कारवाई आहे. सरकार त्यांच्या वडिलांची खरी स्थिती लपवत आहे.

दुसरीकडे, इम्रान खान यांना पाठिंबा देण्यासाठी रावळपिंडीच्या अडियाला तुरुंगात पोहोचलेले खैबर-पख्तूनख्वा राज्याचे मुख्यमंत्री सोहेल आफ्रिदी यांना पोलिसांनी गुरुवारी रस्त्यावर मारहाण केली. आफ्रिदी यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांच्यावर टीका करत म्हटले की देशातील बिघडलेल्या परिस्थितीसाठी तेच जबाबदार आहेत. इम्रान खान यांच्यापर्यंत पोहोचण्यास प्रतिबंध करणे आणि त्यांच्या आरोग्याची माहिती लपवणे हे जनतेच्या विश्वासाशी खेळण्यासारखे आहे. (वृत्तसंस्था)

### मणिपूरमध्ये चार बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, २८ नोव्हेंबर**

सुरक्षा दलांनी इम्फाळ पूर्व आणि इम्फाळ पश्चिम जिल्ह्यांमधून खंडणीत सहभागी असलेल्या वेगवेगळ्या प्रतिबंधित संघटनांशी संबंधित चार बंडखोरांसह पाच जणांना अटक केली, असे पोलिसांनी शुक्रवारी सांगितले .

बुधवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यात कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या तीन सक्रिय कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. ते इम्फाळ पूर्व भागातील जनतेकडून, पेट्रोल पंपांवर, खाजगी शाळा आणि सरकारी महाविद्यालयांकडून खंडणीत सहभागी असल्याचे पोलिसांनी सांगितले. गुरुवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील लुकर मायाई लीकाई भागातून या संघटनेच्या आणखी एका सदस्याला अटक करण्यात आली. तो बंदी घातलेल्या संघटनेसाठी तरुणांच्या भरतीत सहभागी असल्याचा आरोप आहे. सुरक्षा दलांनी गुरुवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोंठा अहल्लूप येथून एकाला अटक केली आणि त्याच्या ताब्यातून दोन हातबॉम्ब जप्त केले. (वृत्तसंस्था)

# खैबर प्रांताच्या मुख्यमंत्र्यांना पोलिसांची बेदम मारहाण

### इम्रान खानच्या समर्थनार्थ निदर्शने करणाऱ्यांवर लाठीमार

◆ **इस्लामाबाद, २८ नोव्हेंबर**

तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांची तुरुंगात भेट घेऊ द्यावी, यासाठी पाकिस्तान तहरिक ए ए इन्साफ अर्थात् पीटीआय पक्षाचे कार्यकर्त्यांनी रावळपिंडीतील अदियाला तुरुंगाबाहेर जोरदार निदर्शने केली. यावेळी खैबर पख्तूनख्वा राज्याचे मुख्यमंत्री सोहेल आफ्रिदी यांना लाथा-बुक्क्यांनी जोरदार मारहाण करण्यात आली.



लष्कराच्या आदेशानुसार अफरीदी यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, गुरुवारी सोहेल आफ्रिदी अदियाला तुरुंगाजवळ पोहोचले, तेव्हा तेथे मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात होता. पीटीआय समर्थकांची गर्दीही वाढत असल्याने तणावाचे वातावरण होते. आफ्रिदींच्या आगमनामुळे परिस्थिती अधिक चिघळली.पोलिसांनी मुख्यमंत्री आणि त्यांच्यासोबतच्या नेत्यांना पुढे जाण्यापासून रोखले. यावेळी झालेल्या धक्का-बुक्कीमध्ये, पोलिसांच्या काही कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना रस्त्यावर पाडत मारहाण केली. पीटीआय पक्षाने या घटनेचा तीव्र निषेध केला असून, ही लोकशाही अधिकारांवरचा थेट हल्ला असल्याचे म्हटले आहे.

**आंदोलन चिघळल्यास सरकार जबाबदार**

आफ्रिदी यांनी आरोप केला की, सरकारला इम्रान खान यांच्या आरोग्याबाबत आणि सुरक्षेबाबत उपस्थित झालेल्या सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे द्यावी लागतील अन्यथा आम्ही जनतेसोबत रस्त्यावर उतरू. आंदोलन चिघळल्यास यासाठी सरकार जबाबदार असेल. देशातील बिघडलेल्या परिस्थितीसाठी लष्करप्रमुख असीम मुनीर जबाबदार आहे. इम्रान खान यांच्यापर्यंत पोहोचण्यास प्रतिबंध घालणे आणि त्यांच्या आरोग्याची माहिती लपवणे हा जनतेच्या विश्वासाशी खेळ आहे. (वृत्तसंस्था)

### माझ्या वडिलांना डेथ सेलमध्ये ठेवले

इम्रान खानचा मुलगा कासिम खान याने सांगितले की, त्याच्या वडिलांना ८४५ दिवसांपूर्वी अटक करण्यात आली होती. गेल्या ६ आठवड्यांपासून त्यांना डेथ सेलमध्ये ठेवण्यात आले आहे. या काळात कोणालाही त्यांना भेटू दिले नाही. हे सर्व कोणत्याही सुरक्षा नियमामुळे नाही, तर जाणूनबुजून केलेली कारवाई आहे.

### ३०० पोपटांची तस्करी करणाऱ्या दोघांना अटक

◆ **बरेली, २८ नोव्हेंबर**

उत्तर प्रदेशातील बरेली येथे वन विभाग आणि विशेष कार्य दल यांनी संयुक्त कारवाईत आंतरराज्यीय वन्यजीव तस्करांना अटक केली. ३०० हून अधिक पोपट त्यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आले. हे पक्षी चार मोठ्या पिंजऱ्यात बंद करण्यात आले होते. तस्करांनी पक्ष्यांना अमानुष स्थितीत ठेवले होते.

माहितीच्या आधारे वन्यजीव तस्करांची एक टोळी बरेलीमार्गे दिल्लीकडे जात आहे. ही माहिती विश्वासार्ह होती. काही वेळातच, एक संशयास्पद वाहन थांबवण्यात आले आणि झडतीत ३०० पोपट आढळले, असे वन विभाग अधिकारी दिशा भंडारी यांनी सांगितले. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांची ओळख अरसलाख खान आणि शाकिब अशी पटली आहे. अनेक जिल्ह्यांमधून पोपट पकडले आणि ते बरेलीमध्ये गोळा करून दिल्लीला नेले. तिथे ते मोठ्या प्रमाणात विकले, ही बाब चौकशीदरम्यान त्यांनी कबूल केली. हा लहान प्रमाणात होणारा बेकायदेशीर व्यापार नसून हे एक संपूर्ण नेटवर्क असण्याची शक्यता आहे. पक्षांना पकडणे हे वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन आहे. तस्करांनी हे पोपट कोणत्या माध्यमातून विकले आणि ते कोणाच्या संपर्कात होते, याचा तपास सुरू आहे. ताब्यता घेतलेले पोपट वनविभागाच्या देखरेखीत सुरक्षित आहेत. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ऐश्वर्यावर पाकी मौलवीची असभ्य टिप्पणी

**इस्लामाबाद** : पाकिस्तानी मौलवी मुफ्ती अब्दुल कावी यांनी अलीकडेच अभिनेत्री ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांच्यावर असभ्य टिप्पणी केली आहे. एका पॉडकास्टमध्ये त्यांनी म्हटले की, जर ऐश्वर्या-अभिषेक वेगळे झाले, तर अभिनेत्री स्वतः त्यांना निकाहचा प्रस्ताव पाठवेल. पॉडकास्टमध्ये जेव्हा त्यांना विचारण्यात आले, तुम्ही त्यांच्यासाठी तयार असाल का?. तेव्हा मुफ्तींनी उत्तर दिले, नक्कीच, मी का तयार नसेन? जेव्हा त्यांना विचारण्यात आले की तुम्ही ऐश्वर्याचा धर्म बदलणार का, तेव्हा ते म्हणाले, नक्कीच, ऐश्वर्या रायचे नाव आयशा राय असे लिहू, खूप मजा येईल. हा पॉडकास्ट सुमारे १३ दिवसांपूर्वी पाकिस्तानच्या अनफोल्ड पाकिस्तान नावाच्या यूट्यूब चॅनलवर अपलोड करण्यात आला होता. या पॉडकास्टमध्ये मुफ्ती अब्दुल कवी यांनी असाही दावा केला की राखी सावंतने त्यांना लग्नाचा प्रस्ताव दिला होता.



### ‘असंभव’मधील भूमिकेसाठी प्रियाचे अपार कष्ट



**मुंबई** : ‘असंभव’ चित्रपटात मुक्ता बर्वे आणि प्रिया बापट यांची प्रमुख भूमिका आहे. विशेष म्हणजे, यात प्रियाला भूमिकेच्या दोन वेगवेगळ्या छटा सादर करण्याची संधी मिळाली आहे. एक ३५ व्या वर्षातील असून दुसरी ७५ व्या वर्षातील आहे. प्रियाचे दोन्ही लूक अचूक व्हावे यासाठी तिने आणि मेकअप टीमने अपार कष्ट घेतले. ७५ वर्षीय वृद्धेचा रूप धारण करण्यासाठी तिला साडे तीन तास मेकअप करायला लागायचे. त्या वृद्ध पात्राचा आवाजही काढणे हे प्रियाचे कसब होते. एखादी वृद्ध महिला कशी बोलेल, कशी बसेल आणि तिच्या वावरण्यात कुठेही अभिनय वाटणार नाही, याचीही खबरदारी घेण्यात आली. त्यासाठी प्रियाने अनमोल भावे याच्या मदतीने वृद्ध महिलेच्या आवाजाचा, बोलण्याच्या शैलीचा सराव केला. एकूणच काय तर पात्राला जिवंत करण्यासाठी प्रियाने अपार कष्ट घेतले.



उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यात शुक्रवारी खाजगी प्रवासी बसला आग लागून तिची राखरांगोळी झाली. ही बस दिल्लीवरून वाराणसीला जात होती. ४३ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. आगीत बसमधील सर्व साहित्य जळून खाक झाले

# कॅनडामधील कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार करणाऱ्याला दिल्लीत अटक

◆ **नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने कॅनडामधील कपिल शर्माच्या कॅफेमध्ये झालेल्या गोळीबारात सहभागी असलेला शूटर बंधू मानसिंह सेखोनला अटक केली आहे. सेखोन हा गँगस्टर गोल्डी ब्रारशी संबंधित आहे.

गोळीबारानंतर तो भारतात परतला. सेखोन हा लॉरेन्स बिश्नोई गँगचा मोस्ट वॉन्टेड गँगस्टर गोल्डी ढिल्लोनच्या संपर्कात होता. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेचे हे एक मोठे यश मानले जात आहे. अटक करण्यात आलेला आरोपी बंधू मानसिंह सेखोन हा कॅनडामधील गोळीबार घटनेतील मुख्य शूटर असल्याचे सांगितले जाते. कॅफेमध्ये झालेल्या गोळीबारामागील कट समोर येण्यासाठी ही अटक महत्त्वाची आहे. सेखोनचे गोल्डी ब्रारशी संबंध असल्याने दिल्ली पोलिस पुढील तपास करत आहेत. बंधू मानसिंह सेखोन याने कॅनडामधील कपिल शर्माच्या कॅफेमध्ये गोळीबार केला. गोळीबारानंतर तो ताबडतोब भारतात पळून आला. दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्याला दिल्लीत अटक केली. (वृत्तसंस्था)

## दीपिका अबू धाबीची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

**अबू धाबी** : दीपिका पदुकोण रणवीरसिंहसोबत ‘एक्सपिरीयन्स अबू धाबी’ची ब्रँड ॲम्बेसेडर बनली आहे. अबू धाबीच्या संस्कृती आणि पर्यटन विभागाने या आशयाची घोषणा केली आहे. दीपिकाचा नवरा रणवीर २०२३ पासून या मोहिमेत काम करतो आहे. आता त्यात दीपिकाचाही प्रवेश झाला आहे. त्यामुळे आता ते अशा प्रकारच्या पर्यटन मोहिमेचे प्रतिनिधीत्व करणारे हिंदी चित्रपटसृष्टीतील पहिले जोडपे ठरले आहे. भारत आणि त्यापलीकडे असलेल्या प्रेक्षकांसाठी दीपिका अबू धाबीमधून तिचा प्रवास शेअर करेल. शहराला अनुभवांनी समृद्ध असलेले डेस्टिनेशन म्हणून दाखवेल, ज्यामध्ये प्रत्येकासाठी काहीतरी पाहण्यासाठी, करण्यासाठी आणि शोधण्यासाठी काहीतरी असेल, अशी जाहिरात केली जात आहे.



# चीनकडून सीमेवर रोबोट्सची फौज तैनात

**● २४ तास पहारा देणार ● बॅटरी स्वतःच बदलणार**

◆ **बीजिंग, २८ नोव्हेंबर**

चीनने आपल्या तांत्रिक कौशल्याचे प्रदर्शन करणारा एक मोठा निर्णय घेतला आहे. यूबी टेक रोबोटिक्स नावाच्या कंपनीला २६४ दशलक्ष युआन किंवा अंदाजे ३७ दशलक्ष किमतीचे कंत्राट देण्यात आले आहे. या करारांतर्गत, कंपनी ग्वांग्झीच्या सीमावर्ती भागात ह्युमनॉइड रोबोट्स तैनात करेल. ही तैनाती डिसेंबरमध्ये सुरू होणार आहे.

व्हिएतनामच्या सीमेला लागून असलेल्या फांगचेंगगांग येथे हा करार झाला. येथे, यूबी टेक जुलैमध्ये लाँच झालेला त्यांचा नवीन वॉकर एस२ रोबोट तैनात करेल. हा जगातील पहिला ह्युमनॉइड रोबोट आहे जो स्वतःची बॅटरी बदलू शकतो. या वैशिष्ट्यांमुळे तो २४ तास सतत काम करू शकतो.

**रोबोट्सचा आतापर्यंतचा सर्वात मोठा वापर**

हा ह्युमनॉइड रोबोट्सचा सर्वात मोठा वास्तविक जगातील अवतार आहे. चाचण्यांमध्ये, हे वॉकर एस२ रोबोट सीमा चौक्यांवर तैनात केले जातील, जिथे ते प्रवाशांना मार्गदर्शन करण्यास, गर्दी नियंत्रित करण्यास, गस्त घालण्यास आणि रसद हाताळण्यास मदत करतील. अहवालात असेही म्हटले आहे की ते स्टील, तांबे आणि ॲल्युमिनियम उद्योगांमध्ये तपासणीसाठी वापरले जातील. याचा अर्थ असा की रोबोट केवळ सुरक्षेसाठीच नव्हे तर औद्योगिक उत्पादनासाठी देखील वापरले जातील. (वृत्तसंस्था)



### चीनमध्ये झपाट्यात वाढतेय एआय रोबोटिक्स

चीनमध्ये एआय आणि रोबोटिक्सची व्याप्ती झपाट्याने वाढत आहे. चीन अनेक क्षेत्रांमध्ये रोबोट्सचा समावेश करत आहे. विमानतळ, सरकारी कार्यालये, प्रमुख कार्यक्रम रोबोट्स सर्वत्र आहेत. हांग्झो विमानतळाने प्रवाशांच्या प्रश्नांची उत्तरे देणारा रोबोट देखील तैनात केला आहे. शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन समिटमध्ये बहुभाषिक रोबोट्सचा वापर देखील करण्यात आला. अनेक शहरांमध्ये पोलिसांप्रमाणे गस्त घालणारे रोबोट्स देखील दिसले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# मोठ्या शून्याकडून छोट्या शून्याकडे

देशातील सर्वांत जुना वा वयोवृद्ध काँग्रेस पक्ष काही केल्या सुधारायला तयार नाही. नावापुरता नेता कुणीही असला तरी गांधी घराण्याचे वर्चस्व संपत नाही. ना काँग्रेसवाल्यांना बदल करावासा वाटतो, ना गांधी घराण्यातल्या लोकांना आता तरी काँग्रेसला स्वबळावर वाढू द्यावे, असे वाटते. सध्या काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे असले तरी काँग्रेस पक्षावर आजही गांधी घराण्याचा रिमोट कंट्रोल आहेच. खडगे हे नाममात्र आणि नामधारी अध्यक्ष आहेत. कर्नाटकातील सत्तासंघर्षात तशी कबुली त्यांनी आपल्या तोंडाने दिली आहे. गांधी घराणे काँग्रेस पक्ष चालवत असले तरी त्यात सध्या अंतिम शब्द राहुल गांधी यांचा असतो. राहुलच्या आले मना तेथे कोणाचे चालेना, अशी सध्या काँग्रेस पक्षाची स्थिती आहे. राहुल गांधी म्हणतील ती काँग्रेस पक्षात पूर्व दिशा असते. राहुल गांधींनी पश्चिम दिशेला पूर्व म्हटले तरी काँग्रेसचे नेते डोके गहाण ठेवून त्यांचीच री ओढायला सुरुवात करतात आणि तसे समोरच्याला पटवून देण्याचा प्रयत्नही करीत असतात.

बरं, ज्या राहुल गांधींची काँग्रेसमधील सर्व नेते जी-हुजुरी करतात, त्यांचे नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व असाधारण वगैरे आहे, असेही नाही. ते अतिशय साधारण आणि कोणताही वकूब नसलेले नेते आहेत. ते नेते बनले कारण ते गांधी आहेत. काँग्रेस पक्षात आजवर अनेक अध्यक्ष होऊन गेलेत. राहुल गांधी यांच्यासारखा अकार्यक्षम आणि कर्तृत्वहीन अध्यक्ष आजपर्यंत दुसरा कोणी झाला नाही. काँग्रेस पक्षातील सर्वांत अयशस्वी नेता असे त्यांचे वर्णन करावे लागेल. देशातील जनतेचा विश्वास तर काँग्रेसने गमावलाच आहे, आता पक्षातील नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचाही राहुल गांधी यांच्या नेतृत्वावरून विश्वास उडू लागला आहे. नेता तो असतो, जो पक्षात चैतन्य निर्माण करतो, नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास आणि विजयाची जिद्द निर्माण करतो. पक्षाला निवडणुका जिंकून देतो तो नेता. यातील एकही काम राहुल गांधी आजपर्यंत करू शकले नाही. काँग्रेस पक्षाला एकही निवडणूक त्यांच्या नेतृत्वात जिंकता आलेली नाही. लोकसभा आणि विधानसभा सोडा, पण साधी ग्रामपंचायत, नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेची निवडणूकही राहुलबाबांच्या नेतृत्वात काँग्रेसला धडाची फळली नाही. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत गांधी घराण्याचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेठी मतदारसंघात राहुलबाबांचा पराभव झाला. त्यानंतरही पक्षाच्या वाट्याला सतत पराभव आले. आता काँग्रेस पक्षात राहुल गांधी यांच्या नेतृत्वाविरुद्ध आवाज उठवणे सुरू केले आहे. त्याची सुरुवात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रशीद अल्वी यांनी केली आहे. काँग्रेसचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी करीत अल्वी यांनी सर्वांना धक्का दिला. एकप्रकारे त्यांनी राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर अविश्वास व्यक्त करीत नेतृत्वबदलाची मागणी केली आहे.

एखाद-दुसऱ्या निवडणुकीत पक्षाचा पराभव झाला तर समजण्यासारखे असते. पण राहुलबाबांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्ष एकही निवडणूक जिंकू शकला नाही. २०१४ पासून लोकसभेच्या तीन तर विविध राज्यांतील आतापर्यंतच्या ९५ विधानसभा निवडणुकांत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. पुढील दोन वर्षांत राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाने विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे शतक गाठले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आता तर काँग्रेस पक्षाला बुडत्या जहाजाचे स्वरूप आले आहे. ते अजून पूर्णपणे बुडाले नसले तरी ते गटांगळ्या खाऊ लागले आहे हे नक्की. अशाही स्थितीत आणि इतिहास समोर असताना, काँग्रेस पक्षाला गांधी घराणेच वाचवू शकेल किंवा तेच आपले तारणहार असल्याचे त्या पक्षातील नेत्यांना अजूनही का वाटते, हा प्रश्न अनाकलनीय आहे. एकेकाळी गांधी घराण्याच्या पुण्याईवर काँग्रेस पक्ष वाढला, सत्तेवर आला, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मात्र, आता ती परिस्थिती राहिली नाही. २०१४ नंतर, देशात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा उदय झाल्यानंतर तर परिस्थितीत झपाट्याने बदल झाला. काँग्रेसचे नेतृत्व सोनिया गांधी यांच्याकडून राहुल गांधी यांच्याकडे आल्यानंतर तर काँग्रेसचा मोठा ऱ्हास सुरू झाला. गेल्या ११ वर्षांपासून काँग्रेसची घसरण सुरू आहे, जी राहुल गांधी यांना अद्याप सावरता आली नाही. मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाच्या झंझावातात राहुल गांधी यांचा पार पालापाचोळा झाला आहे. त्यामुळेच राहुल गांधी यांच्या नेतृत्वक्षमतेबद्दल पक्षात चर्चा सुरू झाली आहे. रशीद अल्वीसारखे नेते आता जाहीरपणे बोलू लागले आहेत. अल्वी खुलेआम बोलत असले तरी ती त्यांची एकट्याची भावना नव्हे. काँग्रेस पक्षातील बहुसंख्य नेत्यांची ती भावना आहे. कुणीही हारणाऱ्या घोड्यावर पैसे लावत नाही. काँग्रेस पक्षात राहुल गांधी यांची स्थिती सतत हारणाऱ्या घोड्यासारखी झाली आहे. त्यामुळेच रशीद अल्वी यांनी जाहीरपणे राहुल गांधींना काँग्रेसच्या नेतृत्वपदावरून पायउतार होण्याची सूचना आणि प्रियांका वढेरा यांच्याकडे काँग्रेसचे नेतृत्व सोपवण्याची मागणी केली आहे. रशीद अल्वी यांच्या पहिल्या सूचनेशी बहुतेक जण सहमत होण्याची शक्यता असली तरी दुसऱ्या सूचनेशी किती जण सहमत होतील, याबद्दल शंका आहे.

प्रियांका वढेरा या इंदिरा गांधी यांच्यासारख्या दिसतात, त्यामुळे त्यांच्याकडे काँग्रेस पक्षाचे नेतृत्व सोपवावे, अशी अल्वी यांची सूचनावजा मागणी आहे. आतापर्यंत प्रियांका वढेरा म्हणजे काँग्रेस पक्षासाठी झाकली मूठ सव्वा लाखाची होत्या. पण मागील काही निवडणुकीत त्यांच्याही नेतृत्वाचा फुगा फुटला. आपल्या नेतृत्वाचा करिश्मा त्या दाखवू शकल्या नाहीत. या देशातील मतदार आता शहाणा झाला आहे. नेत्याच्या चेहऱ्याकडे पाहून, वा चेहरा किती स्मार्ट आहे, कोणासारखा दिसतो, हे पाहून तो मतदान करीत नाही. कोण देशाचे कणखरपणे नेतृत्व करू शकतो, देशाला प्रगतिपथावर नेऊ शकतो, विकासाच्या मार्गावर अग्रेसर करू शकतो, हे पाहून तो मतदान करीत असतो. उगीच सलग तीन लोकसभा निवडणुकीत देशातील जनतेने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाला निवडून दिले नाही.

थोडेसे मागे वळून पाहिले तर असे दिसते की, काँग्रेस महासचिव म्हणून प्रियांका वढेरा यांना उत्तरप्रदेश काँग्रेसचे प्रभारी करण्यात आले होते. उत्तरप्रदेश काँग्रेसचे सर्वाधिकार त्यांच्याकडे सोपवण्यात आले होते. पण त्या उत्तरप्रदेशात काँग्रेसची इभ्रत वाचवू शकल्या नाहीत. राज्यात पुन्हा एकदा काँग्रेसचे पानिपत झाले. अशा स्थितीत काँग्रेसचे नेतृत्व प्रियांका यांच्याकडे सोपवल्याने फार काही फरक पडेल, असे वाटत नाही. राहुल गांधी हे मोठे शून्य असतील तर प्रियांका या छोटे शून्य ठरतील. शून्याचा आकार लहान असो वा मोठा, त्याने फार फरक पडत नाही, असते ते फक्त शून्यच. विरोधकांचे पक्ष टिकले पाहिजेत, असे लोकशाहीप्रेमींना वाटते. काँग्रेस टिकली पाहिजे, वाचली पाहिजे, असे काँग्रेसच्या नेत्यांनाही वाटत असेल तर त्यांनी गांधी घराण्याबाहेर काँग्रेसचे नेतृत्व शोधले पाहिजे, घराण्याच्या बाहेरील नेत्याकडे काँग्रेसचे नेतृत्व सोपवले पाहिजे. घराण्याच्या बाहेरचा नेता काँग्रेसचा फार फायदा करू शकला नाही तरी फारसे नुकसानही करू शकणार नाही. काँग्रेस पक्षाने राहुलबाबांच्या नेतृत्वात नुकसानीची कमाल मर्यादा कधीचीच गाठली आहे. काँग्रेस पक्षात आता नुकसान होण्यासारखे काही उरले नाही. त्यामुळे काँग्रेस पक्ष वाचला पाहिजे, टिकला पाहिजे, असे काँग्रेसच्या नेत्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल तर त्यांनी गांधी घराणे किंवा त्या घराण्याचे नेतृत्व वगळून विचार सुरू केला पाहिजे. तसेही राहुल गांधी गरज असताना काँग्रेस पक्षाला वाऱ्यावर सोडत वारंवार परदेशात जातच असतात. हलाखीला आलेला पक्ष तरीही कसाबसा चालतोय. आता गमावण्यासारखे काहीही राहिलेले नाही. त्यामुळे पठडीबाहेरचा विचार करून काँग्रेसने एकदा हा प्रयोग करून पाहायला हरकत नसावी. शून्यांच्या पल्याड गेलात तरच आकडेमोड सुरू होईल, हे काँग्रेस नेत्यांनी समजून घ्यायला हवे.

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# ही तर रामराज्याची नांदी...

जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत भगवान श्रीरामांच्या जन्मभूमी मंदिरात प्रभू रामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली आणि २५ नोव्हेंबर २०२५ रोजी धर्मध्वज फडकवण्यात आला. हा सोहळा अभिजित मुहूर्तावर म्हणजेच सकाळी ११.४५ ते दुपारी १२.२९ दरम्यान संपन्न झाला. हा ऐतिहासिकदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा क्षण होता. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: ध्वजारोहण केले. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत उपस्थित होते. सुमारे पाचशे वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर, असंख्य बलिदानानंतर हा क्षण पाहायला मिळाला आहे, हे आपल्या पिढीचं भाग्य आहे. माउली म्हणतात, ''रुप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी'' विठ्ठलाचं दर्शन झालं आणि सुखाशी नातं जडलं. हे सुख कशामुळे प्राप्त झालं तर, अनेक जन्मांपासून जे सत्कर्म केलं, त्यामुळे हे सुख प्राप्त झालं आहे. मी अतिशय खात्रीने सांगू शकतो की जसा आनंद माउलींना विठ्ठलाचं रूप पाहिल्यावर झाला, तसा आनंद आज प्रत्येक हिंदूला झाला असावा. हा क्षण, हा सोहळा पाहण्यासाठी आपण जिवंत राहिलो, हे काय कमी आहे! काही वर्षांपूर्वीच कोरोनाचं संकट आलं आणि यात आपण आपले जिवलग, नातलग, मित्रवर्य गमावले. मात्र आपण बचावलो तो हा सुंदर सोहळा पाहण्यासाठी... इतिहास साक्षी आहे की, इस्लामी जिहादी आक्रमकांनी श्रीराम जन्मभूमीवरील मूळ मंदिर उद्ध्वस्त केले. औरंगजेबासारख्या अतिरेक्यांनी त्या जागी बाबरी नावाची रचना उभी केली. पण मंदिर तोडले तरी श्रद्धा तोडता येत नाही, हे त्या अतिरेक्यांना कळलंच नव्हतं. भारताची समाजरचनाच अद्भुत आहे. ज्या विस्तारवादी पंथांनी अर्ध्याहून अधिक जग आपल्या पंथाचं केलं, त्या पंथांना भारत पूर्णपणे बाटवता आला नाही. त्या पंथांना भारताच्या संस्कृतीचा नायनाट करता आला नाही. याचं कारण आपल्या मनात वसलेला राम आहे.

श्रीराम हे केवळ दैवत नाही. तर ती भारतीयांच्या जीवनाची शैली आहे. हा भारतीयांचा आत्मा आहे. हा श्वास आहे. हनुमंत ज्याप्रमाणे आपली छाती फाडून त्यात रामाचं अस्तित्व असल्याचं दाखवतो. ही कथा रुपक आहे. हनुमंत हा हिंदूंचं प्रतीक आहे. हनुमंताप्रमाणे प्रत्येक हिंदूच्या हृदयात राम आहे. म्हणून प्रत्येक हिंदू म्हणजे रामाचं जणू एक मंदिर आहे. या हाडामांसाच्या देहात प्रभू श्रीराम राहतात. ही आपली भावना आहे. म्हणूनच आपला समाज, आपली संस्कृती नष्ट होऊ शकली नाही. पाचशे वर्षे हिंदूंनी जन्मभूमीची जागा सोडली नाही. कोर्टात लढले, रस्त्यावर उतरले, बलिदान दिले. रामजन्मभूमी मुक्तीसाठी कारसेवकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. १९९० मध्ये मुलायमसिंग सरकारने कारसेवकांवर गोळ्या झाडल्या, तरी हिंदू मागे हटला नाही. हजारो हिंदूंनी आपल्या शरीराची समिधा करून या यज्ञात आपले सर्वस्व अर्पण केले. ते बलिदान व्यर्थ गेले नाही. आणि मग आला तो क्षण - नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राम मंदिराच्या निर्मितीला गती दिली. अवघ्या काही वर्षांत भव्य दिव्य मंदिर उभं राहिलं. २२ जानेवारी २०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: प्राणप्रतिष्ठा केली आणि मंदिराच्या गाभाऱ्यात रामललांची मूर्ती विराजमान झाली. आता राम मंदिराच्या कळसावर धर्मध्वज फडकला. मोदींनी थरथरत्या हातांनी ध्वजाला प्रणाम केला. डाव्यांनी, जिहादी वृत्तींनी मोदींची थट्टा केली. पण ते हात वयामुळे थरथरत नव्हते. आपला जन्म राम-कर्मासाठी कामी आला, ही कृतज्ञता त्या थरथरत्या हातात होती... शबरीने असंख्य वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ज्यावेळी पहिल्यांदा रामाचं दर्शन केलं असेल, तेव्हा तिचेही हात थरथरले असतील. तिच्याही शरीरात कंपन उठलं असेल. तिच्या नयनांतून गंगा यमुना वाहिल्या असतील. या भावना शहरी नक्षलींना नाही कळणार, या भावना जिहादी प्रवृत्तीच्या लोकांना नाही कळणार, या भावना दळभद्री मनाच्या लोकांना नाही कळणार. या भावना समजून घ्यायच्या असतील तर तुम्हाला हिंदू व्हावं लागेल, राममय व्हावं लागेल. कदाचित तुम्ही जन्माने हिंदू नसाल पण भावनेने हिंदू व्हावं लागेल. हा भाव आपल्याला ज्ञानेश्वर माउलींच्या मूर्तीत दिसतो, हा भाव आपल्याला तुकोबांच्या तसबिरीत दिसतो, हा भाव आपल्याला समर्थ रामदासांच्या प्रत्येक ओळींमध्ये दिसतो, हा भाव आपल्याला कबीराच्या भक्तीत दिसतो. हा भाव या दानवांना कसा कळेल?



आपला धर्मध्वज फडकला आणि संपूर्ण विश्वाला एकच संदेश दिला गेला - ज्यांनी ज्यांनी आमचा धर्म दडपण्याचा प्रयत्न केला, त्यांना आता हे कळलं पाहिजे की तुमची जिहादी मानसिकता, मिशनरी कटकारस्थाने, तुमची डावी आक्रमणे किंवा धर्मांतराचे षडयंत्र यापैकी कशानेही हिंदू धर्माला, हिंदू संस्कृतीला किंचितही इजा होणार नाही. उलट ज्याप्रमाणे प्रभू श्रीरामांनी रावणाचा अंत केला त्याप्रमाणे हिंदू तुमचे सगळे डाव उद्ध्वस्त करतील आणि अविरत ध्वज फडकवत ठेवतील. या आनंदाच्या क्षणीही काही लोकांच्या पोटात दुखायला लागलं आहे. काँग्रेस, डावे, तथाकथित पुरोगामी आणि शहरी नक्षली बुद्धिजीवी धर्मध्वजाची थट्टा करतायत. म्हणतायत, ''हा मध्ययुगाकडे परतण्याचा प्रयत्न आहे'', ''हा विज्ञानविरोधी डाव आहे'', ''हा असहिष्णुतेचा विजय आहे.'' पण या साऱ्यांचा दुटप्पीपणा फार भयंकर आहे. हे लोकच तर सतत गांधींचं नाव घेऊन म्हणतात, ''गांधीजी रामाचे भक्त होते, ते रोज रामाचे भजन गायचे, शेवटच्या क्षणी देखील त्यांनी 'हे राम' म्हटलं''. पण ज्या रामाचे गांधीजी भजन गायचे, त्या रामाचंच मंदिर आणि त्या रामाचाच धर्मध्वज या लोकांना नकोय! म्हणजे एकीकडे गांधींच्या नावाचा वापर करायचा आणि दुसरीकडे रामाला नावे ठेवायची? हा दुटप्पीपणा आता हिंदू जनतेने ओळखला पाहिजे. आता तुम्ही म्हणाल या शुभ प्रसंगी या दानवांचा उल्लेख का करता? अहो, आपला सणही रावण दहन केल्यानंतरच साजरा होतो की नाही? आता धर्मध्वज फडकला आहे, याचा अर्थ असा की भारताला पुन्हा ते जुने वैभव प्राप्त होण्याचा क्षण जवळ आला आहे. प्रभू श्रीरामांच्या कृपेने भारत पुन्हा एकदा महासत्ता होईल. नारायण आले की त्यामागून लक्ष्मी येणारच! आता खऱ्या अर्थाने रामराज्याची नांदी सुरू झाली आहे. पुढची २०-२५ वर्षे म्हणजे २०४७ पर्यंत आपण विकसित भारत घडवणार आहोत, हा ध्यास सर्वांनीच मनात ठेवला पाहिजे. आपल्यातील जातिवाद, प्रांतवाद, भाषावाद मिटवून भारताला बलशाली करण्याचा ध्यास घेतला पाहिजे. जातिवाद, प्रांतवाद, भाषावादाच्या दलदलीत ढकलणाऱ्या पुढाऱ्यांवर मतपेटीतून हल्लाबोल करून हद्दपार केलं पाहिजे. कारण भारत आर्थिकदृष्ट्या, लष्करीदृष्ट्या, तंत्रज्ञानात, विज्ञानात अतुलनीय शक्तिशाली करायचा असेल तर आपल्यातील भेद हीच खूप मोठी अडचण आहे. म्हणून हा भेद नकोय... या आधुनिक भारताची मुळे ही हिंदूभूमीच्या हजारो वर्षांच्या संस्कृतीत, सनातन धर्मात घट्ट रुजलेली आहेत. रामराज्य म्हणजे केवळ रामाचं भजन गाणं नव्हे; तर रामराज्य म्हणजे न्याय, समरसता, सुशासन, आत्मनिर्भरता, वैज्ञानिकता आणि संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श असलेलं राज्य होय! ते राज्य आता दूर नाही. हा फडकणारा धर्मध्वज म्हणजे एक संकल्प आहे. हिंदू सभ्यतेला पुन्हा जागृत करण्याचा संकल्प. पाचशे वर्षांपूर्वी मंदिर पाडलं होतं, पण आज मंदिर उभं राहिलं आणि त्यावर धर्मध्वज फडकला. यापुढे कोणत्याही आक्रमकाला, कोणत्याही धर्मांधाला, कोणत्याही दुटप्पी राजकारण्याला हे विसरता येणार नाही की ही भूमी रामाची आहे, ही भूमी कृष्णाची आहे, ही भूमी शिवाची आहे. ही हिंदूंची भूमी आहे आणि या भूमीवर आता पुन्हा रामराज्य येत आहे.

जय श्रीराम!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# कुटुंबव्यवस्था टिकणे आवश्यक

आज एका वृत्तपत्रातील बातमी वाचण्यात आली. त्यातील घटना भारतातील नसली तरी, भारतात तशी घटना घडू नये, असे वाटते. या बातमीत म्हटल्याप्रमाणे लंडनमधील एका जोडप्याच्या लग्नाचा १० वा वाढदिवस डिसेंबरमध्ये आहे. हे जोडपे एकाच छताखाली राहत असले तरी त्यांचे एकमेकांशी संबंध काही आवश्यक गरजेपुरतेच आहेत. त्यांच्या नात्यात एकमेकांबद्दल स्वारस्य उरलेले नाही. कामाच्या ठिकाणावर क्वाईट क्विटिंग, म्हणजे कोणतेही कारण न सांगता कामातून अनासक्ती, असाच व्यवहार पाश्चिमात्य देशांमधील अनेक जोडपी आता नात्यांमध्ये दाखवत आहेत. याला शांततेत घेतलेला काडीमोड, असे म्हटले जाते.

यात जोडपी एकमेकांपासून भावनिकदृष्ट्या वेगळी होतात. ते एकमेकांशी कोणताही संवाद ठेवत नाहीत किंवा एकमेकांपासून कोणतीही अपेक्षा बाळगत नाहीत. न्यायालयात जाऊन घटस्फोट न घेता एकत्र राहणे, अशी जोडपी अनेक वर्षे एकत्र राहू शकतात. केवळ मुलांमुळे घटस्फोट घेऊ शकत नाहीत. दोघांपैकी एकाची आर्थिक स्थिती कमकुवत असणे किंवा दुसऱ्यावर अवलंबून असणे, अशा परिस्थितीमुळे न्यायालयात जाऊन घटस्फोट घेणे टाळून क्वाईट डिव्होर्स स्वीकारला जात आहे. यावरून मला हिंदी हास्य कवी सुरेंद्र शर्मा यांनी एका कार्यक्रमात सांगितलेला विनोद आठवतो. त्यांनी म्हटले होते की, माझ्या लग्नाचा ५० वा वाढदिवस आम्ही साजरा केला. अमेरिकेत असतो तर, ५० व्या लग्नाचा वाढदिवस साजरा केला असता. कारण, अमेरिकेत नवरा-बायको रस्त्यावर, बागेत, रेल्वेत, कारमध्ये कुठेही आणि वेळ मिळेल तेव्हा, प्रेम करतात. त्यामुळे त्यांचा प्रेमाचा कोटा लवकर पूर्ण होतो. त्यामुळे ते पटापट जोडीदार बदलतात. तर, भारतीय नवरा-बायकोला प्रेम करायला वेळच मिळत नाही. त्यामुळे त्यांचा प्रेमाचा कोटा पूर्णच होत नाही. त्यामुळे ते अनेक वर्षे सोबत राहतात. नवरा-बायकोचे भांडण झाले तर, बायको म्हणते की, मी तुम्हाला कधीचीच सोडून गेली असती पण, मुलांमुळे तसे करणे मला शक्य झाले नाही. याचा अर्थ भारतीय नवरा-बायको रेल्वे रुळाप्रमाणे असतात. सोबत चालतात पण, एकमेकांना भेटत नाहीत. तर, मुले त्यांच्यामधील स्लिपरचे काम करतात. नवरा-बायकोचे पटो अथवा न पटो पण, सोबत चालावेच लागते. भारतीय लोक पाश्चिमात्य संस्कृतीचे जाणते अजाणतेपणी अनुकरण करतात. त्यामुळे आपल्या देशात हा ट्रेंड येऊ नये, असे वाटते.

भारतात एकत्र कुटुंबपद्धती आहे. त्याचे प्रमाण हल्ली कमी होत असले तरीही आजही अनेक कुटुंबे एकत्र राहतात. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये परिवारात कोणीतरी एक वडील किंवा ज्येष्ठ व्यक्ती असते. तिच्या आदेशाचे सर्व सदस्य पालन करतात. कुटुंबात काही वाद झाल्यास ती ज्येष्ठ व्यक्ती वाद झालेल्या दोघांचीही समजूत काढून प्रसंगी कठोर भूमिका घेऊन त्यांच्यातील वाद मिटविला जातो. या उलट पाश्चिमात्य देशांमध्ये मुले ठरावीक वयानंतर घराबाहेर पडतात. स्वत: काही नोकरी, कामधंदा करून पैसे कमवितात, शिकतात, मित्र, मैत्रिणीसोबत रिलेशनशिपमध्ये राहतात. तसेच, कोणी कोणाला भेटायला एकमेकांच्या घरी अथवा बाहेर भेटायचे असल्यास अगोदर अपॉईंटमेंट घ्यावी लागते. अशी स्थिती भारतात नाही. भारतीय मुले-मुली शिक्षण होईपर्यंत आई-वडिलांसोबतच राहतात. बहुतांश मुलांचे लग्न झाल्यावरही ते आई-वडिलांसोबतच वास्तव्य करतात. मात्र, अलिकडच्या काळात मुले-मुली शिक्षण, नोकरीनिमित्ताने पुणे, मुंबई, बंगलोर इत्यादी मोठ्या शहरांमध्ये जात आहेत. तर, काही परदेशातही जात आहेत. तिकडे गेलेल्या मुलांकडून किंवा नोकरीच्या ठिकाणी विदेशात राहून आलेल्या मुला-मुलींच्या संपर्कात आलेल्या मुलांकडून पाश्चिमात्य देशातील संस्कृतीचे अनुकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतीय संस्कृती टिकून राहण्याचे मूळ कारण, भारतीय कुटुंब व्यवस्था हे आहे. कुटुंबात मुला-मुलींवर जे संस्कार होतात किंवा केले जातात, ते जीवनभर त्यांच्यासोबत असतात. तेव्हा, कुटुंबव्यवस्था टिकावी, कुटुंबात सर्व सदस्यांमध्ये संवाद असावा, एकमेकांना सहकार्य करण्याची भावना कायम असावी. तेव्हा, भारतीय संस्कृती टिकण्यासाठी एकत्र कुटुंबव्यवस्था टिकणे अतिशय आवश्यक आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# नुसत्या बातम्यांवर गुजराण!

यांची उडी सकाळी पत्रकार परिषद घेणं, भोंगा वाजवणं, ट्विट करणं, फेसबुक लाईव्ह करण्याच्या पलीकडे जातच नाही. रस्त्यावर उतरून आंदोलनं करणं, मोर्चे काढणं हे तर फार लांब राहिलं. साधं निवडणूक प्रक्रियेतसुद्धा भाग घेत नाही आहेत. हे प्रचारालासुद्धा जात नाहीत इतके हे अहंकारी झाले आहेत. लोकांच्या दारात जाऊन मतं मागणं आता यांना कमीपणा वाटू लागलं आहे. सध्या यांचं अस्तित्व केवळ माध्यमांमध्ये आहे. यांचं बोलणं, बरळणं जनता मनावर घेत नाहीत, मात्र, माध्यमं यांना डोक्यावर घेतात. आणि केवळ आपली बातमी आली की बस झालं, यावर समाधान मानून... एवढ्या एका गोष्टीवर हे गुजराण करत आहेत.

मुळात जनतेने विरोधी पक्षात बसवले आहे. त्यामुळे जनतेचे प्रश्न पोटतिडकीने आणि ताकदीने उजागर करून सरकारला जाब विचारण्याचं काम सक्षम विरोधी पक्ष म्हणून विरोधी पक्षांनी केलं पाहिजे. जनहिताच्या व्यापक मुद्यावर बोलण्याऐवजी निरर्थक प्रश्नाला हवा देऊन, काहीही एक फायदा होणार नाही. हे अजूनही विरोधकांना कळले नसेल तर, यांचे भविष्य अंधारातच आहे.

केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या आयआयटी बॉम्बेसंदर्भात केलेल्या वक्तव्याचा विपर्यास करत विरोधकांनी आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न चालवला आहे. अर्थात मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव, बॉम्बे-मुंबई, मराठी माणूस असे सगळे मुद्दे हे ऐन निवडणुकीच्या तोंडावर यांना सुचतात, हा वेगळा भाग आहे. एक मात्र, येथे खरं आहे... मुंबईसाठी आणि मुंबईकरांसाठी शिवाय मराठी माणसासाठी या लोकांनी काहीही केलेलं नाही. प्रेतांच्या टाळूवरचं लोणी खाणारी ही जमात आहे. 'बॉम्बे'चे 'बम्बई' आणि मग 'मुंबई' करण्यामागे या पत्रकार परिषदवीरांचे काहीही एक योगदान नाही. 'बॉम्बे'चे 'बम्बई' आणि 'मुंबई' करण्यासाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते राम नाईक यांनी हा संपूर्ण लढा दिला. संपूर्ण इतिहास माहीत नसलेल्या विरोधकांनी टीकेची झोड उठवून 'मुंबई'चे श्रेय लाटण्याचा आता ३० वर्षांनी प्रयत्न चालवला आहे. राम नाईक यांच्या सहा वर्षांच्या अविरत प्रयत्नांनंतर केंद्र सरकारने 'बॉम्बे' 'बम्बई'ऐवजी सर्व भाषांत 'मुंबई' हेच नाव वापरण्याचा अध्यादेश १५ डिसेंबर १९९५ रोजी जारी केला होता.

राम नाईक १९८९ मध्ये पहिल्यांदा लोकसभा सदस्य झाले त्यावेळी, हिंदी मसुद्यात त्यांचं नाव राम नायक (उत्तर बम्बई) असे लिहिले होते. ते बघून नाईक यांनी लोकसभा सभापतींना तत्काळ पत्र लिहिले व असे असता कामा नये, सर्वच भाषांत माझे नाव राम नाईक (उत्तर मुंबई) असेच लिहिले पाहिजे असे सुचविले. तत्कालीन लोकसभा सभापती रविराय यांच्याशी चर्चा झाली. विशेष नाव सर्व भाषांमध्ये सारखेच असले पाहिजे, त्यांचे भाषांतर होऊ शकत नाही, हे नाईक यांचे म्हणणे तत्त्वत: बरोबर आहे व निदान लोकसभेच्या कामकाजात तरी यापुढे सर्व भाषांमध्ये 'नाईक' आणि 'मुंबई' असेच लिहिले जाईल असा निर्णय लोकसभा सभापतींनी घेतला. इथून मग बॉम्बे, बम्बईचे मुंबई व्हावे यासाठीच्या प्रयत्नांची खरी सुरुवात झाली. नाईकांनी सर्व संबंधितांना पत्रे लिहिली, लोकसभेत प्रश्न उपस्थित केला. अखेर गाडी अडली ती तांत्रिक मुद्यावर. गावाचे किंवा शहराचे नाव बदलायचे तर त्याचा अधिकार महसुली नियमाप्रमाणे राज्य सरकारचा असतो. यासाठी राज्य सरकारकडून प्रस्ताव मंजूर होऊन मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे यावा लागतो. महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीचे राज्य आल्यावर मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना ही माहिती दिली. त्यांच्या मंत्रिमंडळाने एकमताने हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलाही पण पुन्हा गाडी अडली. तत्कालीन काँग्रेस सरकारने हा प्रस्ताव काहीही कारवाई न करता बासनात गुंडाळून ठेवला. मग पुन्हा केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर १५ डिसेंबर, १९९५ रोजी केंद्रानेही बॉम्बे, बम्बईऐवजी मुंबई हेच नाव वापरावे असा अध्यादेश जारी केला. अर्थात यातही एक छोटी चूक झाली. हिंदीत 'मुंबई' शब्द 'मुम्बई' असा लिहिला गेला. पुढे १९९९ मध्ये राम नाईक स्वतः केंद्रात राज्यमंत्री असताना जेव्हा त्यांच्याकडे गृहखात्याचाही अतिरिक्त भार दिला गेला, तेव्हा या संदर्भातील अंतिम सुधारित आदेश २८ मे, १९९९ रोजी काढून 'मुंबई' हेच नाव सर्व भाषांत केले. वर्षानुवर्षे पाठपुरावा केल्यानंतर महाराष्ट्राची अस्मिता राखण्याचा ऐतिहासिक निर्णय करण्याचे भाग्य सर्व श्रेय हे राम नाईकांना जाते. एवढंच नव्हे तर, नंतरच्याकाळात नाईक उत्तर प्रदेशचे राज्यपाल झाले तेव्हा, नाईक यांच्या आदेशानेच 'अलाहाबाद'चे 'प्रयागराज' व 'फैजाबाद'चे 'अयोध्या' असे नामांतरण झाले. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आयआयटी बॉम्बेचं नाव बदलण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारकडे विनंती करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे जे लोक नावांच्या, प्रतीकांच्या, इतिहासांच्या खुणा जपण्यासाठी धडपडतात, पुसलेल्या खुणा परत आणण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावतात, त्यांना यांच्यासारख्या ''आयत्या बिळात नागोबा''वाल्यांनी शहाणपणा शिकविण्याची गरज नाही.

जनतेचे प्रश्न सोडून साऱ्या गोष्टींचं भांडवल हे लोक करत असतात. त्यामुळे जनतेचे वारंवार फटके मिळत आहेत. आता येत्या निवडणुकीत जनता जर फटके मारून हाकलतील तर, अरे हे असं कसं झालं म्हणून विचार करत बसतील. पण तुम्ही जनतेत गेलाच नाही तर जनता तुम्हाला आपलंसं कसं करतील? अन्यवेळी तर सोडा नेमक्या बिहार निवडणुकीदरम्यान जनतेला, कार्यकर्त्यांना सोडून सगळे महत्त्वाचे, तिकीट वाटपाचे निर्णय घेण्याच्यावेळी राहुल गांधी कोलंबियाला गेले होते. बिहार निवडणुकीच्या निकालावेळी ते अबूधाबीला होते. असं केल्यानं कसं चालेल. तुमची जनतेशी नाळ तुटली आहे. पराभव जरी झाला असेल तरी, जनेतेला धन्यवाद दिले पाहिजेत. कार्यकर्त्यांना धीर दिला पाहिजे, त्यासाठी त्यांना भेटलं पाहिजे, भेटण्यासाठी उपलब्ध असले पाहिजे एवढं साधं जर कळत नसेल तर, केवळ एसीमध्ये बसून, फेसबुक लाईव्ह, पत्रकार परिषदा घेऊन जनता तुम्हाला मत देईल अशी अपेक्षा करत असाल तर, या गोड गैरसमजातून बाहेर निघून जमिनीवर काम करण्याची गरज आहे. आत्मपरीक्षणाची गरज आहे. किती दिवस, भाषावाद, प्रांतवादावर, नुसत्या बातम्यांवर गुजराण करणार? त्यातून काहीही उपलब्धी होणार नाही. निव्वळ तोंडाच्या वाफा दवडून कोणताही लाभ होणार नाही.

९२७०३३३८८६

## दत्त जयंतीचे महत्त्व

मार्गशीर्ष महिन्यातला महत्त्वाचा सण म्हणजे दत्त जयंती. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर संध्याकाळी दत्तांचा जन्म झाला, म्हणून या दिवशी सर्वत्र भगवान दत्तात्रेयांचा जन्मोत्सव साजरा केला जातो. दत्त जयंती या दिवशी दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे पूजा आणि नामजप केल्यास दत्त-तत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास मदत होते. बहुतांशी ठिकाणी त्रिमूर्ती म्हणजे त्रिमुखे असलेल्या स्वरूपात दत्ताची पूजा केली जाते. तर काही ठिकाणी एकमुखी दत्ताच्या मूर्तीचे पूजन केले जाते. दत्ताला 'अवधूत' असे देखील म्हटलं जातं. दत्ताचे चोवीस गुरू मानले जातात. आपल्या पुराणांमध्ये धार्मिक ग्रंथांमध्ये, त्यांचे वर्णन ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचा संगम किंवा या तिघांचा संयुक्त अवतार म्हणून केले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दत्तभक्ती पाहायला मिळते. यातही महाराष्ट्रात तर दत्त भगवानांचा सर्वांत मोठा प्रभाव पाहायला मिळतो. आपल्याकडे प्रत्येक गावात, शहरात दत्ताची लहान, मोठी अनेक मंदिरे आहेत. दत्तांचा जन्म मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला झाला होता. या दिवशी दत्त जयंती साजरी केली जाते. मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेला दत्त पूजा आणि दत्त दर्शन केल्याने भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात, अशी मान्यता आहे. हिंदू पौराणिक मान्यतेनुसार, देव दत्तात्रेयांमध्ये त्रिदेवाची शक्ती अस्तित्वात आहे, म्हणून त्यांची पूजा केल्याने लवकर लाभ होतो. भगवान दत्ताचे मंत्र अत्यंत प्रभावी आणि लवकर फळ देणारे मानले जातात. त्याच्या मंत्रांचा आदरपूर्वक जप केल्याने आणि प्रार्थना केल्याने व्यक्ती जीवनातील प्रत्येक समस्यापासून मुक्त होऊ शकते. भगवान दत्तात्रेयांची विशेष पूजा महाराष्ट्रात तसेच संपूर्ण भारतामध्ये केली जाते. विशेषतः महाराष्ट्रात दत्तात्रेय जयंती मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. दत्तात्रेयांच्या मंत्रांबद्दल बोलायचे तर तर त्यांच्या मंत्रांच्या वापराने शत्रूंच्या नाशाबरोबरच जीवनातील इतर अडथळेही दूर होतात.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

## वाचक पत्रे

## अन्नाचा आदर करा!

अन्नाला आपल्या शास्त्रांत 'पूर्ण ब्रह्म' म्हटले आहे. कारण अन्नातूनच शरीराला ऊर्जा (प्राण) मिळते. सात्त्विक अन्न केवळ पोट भरत नाही, तर मनालाही शांत आणि पवित्र बनवते. घरी भक्तिभावाने, भगवंताचे नामस्मरण करत बनवलेले अन्न हे खऱ्या अर्थाने सात्त्विक असते. मात्र, आजच्या धकाधकीच्या जीवनात वेळेअभावी आणि हौसेखातर उपाहारगृहात जेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक मालक विविध योजना आणतात. त्यातीलच एक म्हणजे 'अनलिमिटेड थाळी' ही संकल्पना! २०-२५ पदार्थांनी सजलेली ही थाळी पाहण्यास आकर्षक असली, तरी एका व्यक्तीसाठी ती मुळीच आवश्यक नसते.

इतक्या पदार्थात सहजपणे पाच-सहा लोकांचे जेवण होऊ शकते. तरीही प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र थाळी घेण्याची अट असते. उरलेले पदार्थ घरी नेता येत नाही. त्यामुळे उष्टे पदार्थ टाकून दिले जातात. हे दृश्य अत्यंत वेदनादायक आहे. कारण आपल्या देशात आजही हजारो लोक अर्धपोटी किंवा उपाशीपोटी झोपतात. अतिखाणे हे आरोग्यास हानिकारक आहेच, पण अशी नासाडी ही सामाजिकदृष्ट्याही अक्षम्य आहे. म्हणूनच 'किती खावे, काय खावे आणि कसे खावे' हे जरी व्यक्तिगत प्रश्न असले तरी उपाहारगृह चालवणाऱ्यांनी आणि ग्राहकांनी दोघांनीही याबाबत विवेकाने वागणे गरजेचे आहे. अन्नाची नासाडी म्हणजे, अन्नदात्याचा, शेतकऱ्याचा आणि निसर्गाचा अपमान आहे. अन्नाला ब्रह्म मानून, जितके आवश्यक आहे तितकेच घेणे आणि आदराने ग्रहण करणे हीच खरी संस्कृती आहे.

**रेणुका हरदास**/नागपूर

## आजचे संघगीत-९७

शनिवार, २९ नोव्हेंबर २०२५

### चरण चालु दे सदा ध्येयमंदिराकडे

चरण चालु दे सदा ध्येयमंदिराकडे
अंतरात आमुच्या स्मृती तुझीच जागु दे ॥धृ.॥

गती मती द्युती तुझी आमुच्यात येउ दे
सुखात आणि संकटी तुझा मनास ध्यास दे
गतीस खंड त्या नको अम्ही असू सदा खडे ॥१॥

पाहुनी सभोवती दु:ख दैन्य आपदा
जाणुनी स्वयेच तू त्यागिलीस संपदा
दंभ मोह लाजले पाहता तुझ्याकडे ॥२॥

चरण धुंद चालु दे वेग त्यास येउ दे
ध्येयमंदिरावरी दृष्टि अढळ राहु दे
कवच घालुनी स्मृती सिद्ध संगरा खडे ॥३॥

धूलिच्या कणांतुनी घोष हा उठे महा
स्पर्श होउनी तुझा देह धन्य हो अहा
वाट पाहता युगे अशी विभूति सापडे ॥४॥

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## महत्वाचे...



सोलापूर : सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे खा. प्रणिती शिंदे यांनी संपर्क साधून उपोषणकर्ते रघुनाथ खजूरकर यांच्या मागण्याबाबत उपाययोजना करावी अशा सूचना दिल्या.



### खा. शिंदेंनी जाणून घेतल्या तिऱ्हे, शिंगोली, तरटगावला जोडणाऱ्या पुलाविषयीच्या समस्या

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

तिऱ्हे, शिंगोली, तरटगाव या गावांना जोडणारा जुना पूल सीना नदीला पूर आल्यानंतर नादुरुस्त पडझड झाला. पुलाची साईड रोलिंग व संरक्षक पाईप तोडफोड झाले तर काही पाण्यात वाहून गेले. पुलावर मोठमोठे खड्डे पडले. या पुलावरून वाहतूक धोक्याची झाले आहे. या सर्व समस्या खासदार प्रणिती शिंदे यांनी जाणून घेतल्या. गेल्या पंधरा दिवसांमध्ये या पुलावर तीन अपघात झाले. एक प्रवासी टमटम पुलावरुन पाण्यात पडले. यात सदर टमटम चालकाचा जीव कसाबसा वाचला. आणखीन एका अपघातात मोटरसायकलस्वार पायबंदी झाला. रस्ता नादुरुस्त असल्यामुळे एस.टी.बसही बंद झाली आहे. रस्ता दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम खाते व राष्ट्रीय महामार्ग हे एकमेकांकडे बोट दाखवित आहेत, असे सांगण्यात आले. खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधत या भागातील नागरिकांच्या समस्या त्यांच्या कानी घातल्या. आणि सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग यांची संयुक्त बैठक लावून तातडीने येथील रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अशा सूचना दिल्या. याप्रसंगी उत्तर सोलापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भारत जाधव, मोहोळ तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी, राजेश पवार, सोमनाथ दावणे, कुंदन दावणे, राजू मोटे, रावसाहेब गायकवाड, महेश गायकवाड, बबलू रासेराव, राहुल भोई, चंद्रभान गायकवाड आदी उपस्थित होते.

### तक्रारींचा वेळेत निपटारा न करणाऱ्या मनपाच्या १० अधिकारी-कर्मचाऱ्यांना दंड

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

महापालिकेच्या पोर्टल/माय सोलापूर ॲपवरील नागरी तक्रारींचे वेळेत निपटारा न करणाऱ्या महापालिकेच्या १० अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या सर्वांना मिळून एकूण तीन हजार १०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत. शहरातील नागरीकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीकोनातून ऑनलाईन तक्रार करण्याची सोय महापालिकेने पोर्टल/माय सोलापूर ॲपवर उपलब्ध केली आहे. या तकारीचे निराकरण संबंधित विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कडून मुदतीत पूर्ण करून, केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित पोर्टल व ॲपवर अद्ययावत करण्याचे निर्देश सर्व अधिकारी कर्मचारी यांना वेळोवेळी देण्यात आले आहेत. या अनुषंगाने तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या १० अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकूण तीन हजार १०० रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

**या अधिकारी व कर्मचाऱ्यांना झाला दंड**

अजिंक्य साळुंखे (विभागीय कार्यालय क्र.१), निलकंठ मठपती (नगररचना विभाग), दीपाली मेटकरी (नगररचना विभाग), मन्मत चांदोडे (मालमत्ता कर विभाग), धीरज वाघमोडे (घनकचरा व्यवस्थापन विभाग), अमोल कांबळे(घनकचरा व्यवस्थापन विभाग),निशात आख्तर कानकुर्ती (घनकचरा व्यवस्थापन विभाग),अनिकेत कांबळे (विभागीय कार्यालय क्र.३), अक्षय फुंदे (विभागीय कार्यालय क्र.७), अनिकेत कावळे (विभागीय कार्यालय क्र.२) असे दंडात्मक कारवाई झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

# उसाच्या बिलासाठी शेतकऱ्यांचा रस्तारोको

## सोलापूर-विजयपूर महामार्गावर मांडला ठिय्या; उसाला पहिली उचल ३,४०० देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

ऊस गाळप हंगाम सुरू होऊन एक महिना होत आला.ऊस कायदा १९६६ नुसार ऊस गाळप झाल्यापासून १४ दिवसाच्या आत ऊसबिले जमा करणे बंधनकारक असताना, एक महिना झाला तरीही साखर कारखान्यांनी ऊस बिले जमा केलेली नाहीत. याच पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शुक्रवार (दि. २८) नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास सोलापूर विजापूर महामार्गावर व्हनमुर्गी फाटा (तेरामेल) येथे रस्तारोको आंदोलन शासनाचे व प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी विविध घोषणा देत शेतकरी संघटनेने येत्या दोन दिवसात सकारात्मक निर्णय न घेतल्यास कर्नाटकमधील शेतकऱ्यांनी ज्याप्रमाणे उग्र आंदोलन केले. त्याप्रमाणे उग्र आंदोलन करू, वेळ पडल्यास कायदा हातात घेऊ असा निर्वाणीचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनी यावेळी दिला.

दरम्यान, सोलापूर विजयपूर महामार्गावर शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केल्याने काही काळ सोलापूर विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. महामार्गावर वाहनाच्या लांबच लांब रांगा पहावयास मिळाल्या. प्रशासनाने तात्काळ आंदोलनकरते शेतकऱ्यांना महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची सूचना केल्यानंतर महामार्ग वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला.

यावेळी आंदोलनात इकबाल मुजावर, मोहसीन पटेल,पप्पू पाटील, चाँदसो यादगिरे, बसवराज रामपुरे, कमलेश बामगोंडे, तुकाराम शेटसंदी, जावेद आवटी, सिकंदर मकानदार, वसंत पाटील, यासिन मकानदार, नरेंद्र पाटील, अब्दुलराजाक मकानदार, विजय साठे, भागवत बिराजदार, सचिन मस्के आदींसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते.






### शेतकऱ्यांना कायदा हातात घेण्यास भाग पाडू नये

सोलापूर सोडून ईतर जिल्ह्यांमध्ये ऊसाला पहिली उचल म्हणून ३२०० ते ३६०० रुपये पर्यंत ऊस दर जाहीर केलेले आहेत. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यामध्ये सुद्धा यावर्षी गाळप होणाऱ्या ऊसाला पहिली उचल ३४०० रुपये मिळावेत. या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शुक्रवार (दि. २८) नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास सोलापूर विजापूर महामार्गावर व्हनमुर्गी फाटा (तेरामेल) येथे रस्तारोको आंदोलन केले आहे. सर्वसागर कारखाने सत्ताधारी तसेच विरोधक लोकप्रतिनिधी यांचीच आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांना ऊसाला दर देत नाहीत. शासन आणि प्रशासनाने यावर तात्काळ सकारात्मक भूमिका घ्यावी. अन्यथा शेतकऱ्यांना कायदा हातात घेण्यास भाग पाडू नये, ज्याप्रमाणे कर्नाटक राज्यामध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन केले. त्याच पद्धतीने उग्र आंदोलन राज्यभर पेटवले जाईल, असा ईशाराही श्री. रणदिवे यांनी दिला आहे.

### टेंभुर्णीत माढा तालुका मुलींच्या खो-खो स्पर्धा

**टेंभुर्णी, दि. २८ नोव्हेंबर-**

स्व.लोकनेते कृष्णातदादा बोबडे यांच्या स्मरणार्थ १४ वर्षांखालील गटाची मुलींची खोखो स्पर्धा शनिवार ६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता श्री माऊली शिक्षण संस्था संचलित सनराईज स्पोर्ट्स क्लबने सनराईज इंग्लिश मिडीयम स्कुल टेंभुर्णी येथे आयोजित केली आहे. प्रथम पारितोषिक ७ हजार ३३, द्वितीय ५ हजार ३३, तृतीय ३ हजार ३३ व चतुर्थ २ हजार ३३ व चषक असे स्वरूप आहे. खेळाडूची जन्म तारीख १ जानेवारी २०१२ नंतरची असावी. संघानी अमर काळे ९१४६८९१३५५ अथवा सागर खुळे ८६२६०५८३७७. यांच्याशी संपर्क साधावा, असे क्लबचे प्रमुख अमर काळे यांनी केले.

# महिलांवरील अत्याचार रोखण्यास सरकार अपयशी

## मोहोळच्या प्रचार सभेत खासदार प्रणिती शिंदे यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

महिलावरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत असून महिला वर्गा बरोबर लहान मुलीही अत्याचाराला बळी पडत असून याकडे प्रशासन गांभीर्याने दखल घेत नसल्याचे खंत खासदार प्रणितीताई शिंदे यांनी मोहोळ येथे नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भात प्रचार कार्यक्रमाच्या वेळी बोलताना केले.

गवत्या मारुती चौकातील या सभेस नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार राज्य सचिव शाहिनताई शेख, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार ॲड. सोनल जानराव, सदस्य पदाचे उमेदवार संतोष शिंदे, कामिनी चोरमले,रोहित गावस्कर, शरयु आनंद गावडे,महमद जुबेर मुजावर आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी केले. मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी आभार मानले.




खासदार शिंदे म्हणाल्या, सरकार वेगवेगळ्या योजना आणतात पण ते पूर्णत्वास नेत नाहीत. काँग्रेसने असे कधीच नव्हते. काँग्रेसने योजना आणल्या पण त्या योजनेचा लाभ शेवटपर्यंत सर्वसामान्य जनते पर्यंत पोचविला. सध्या देशातल्या नोकऱ्या गायब झालेल्या आहेत. बेरोजगारी वाढलेली आहे. महागाई शिंगेला पोहोचलेली आहे. आरोग्याच्या समस्या तशाच आहेत. महिला वरील अत्याचार वाढलेले आहेत. भ्रष्टाचारात वाढ झालेली आहे. अशा सरकारला पण निवडून देणार आहात का ? असा प्रतिप्रश्न करून काँग्रेस पक्षाला त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे. हा पक्ष भारतीय स्वातंत्र्य पूर्वीचा १४० वर्षाचा पक्ष आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला निवडून आणून पक्ष बळकट करा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार म्हणाले, क आज देशाची लोकसंख्या १४० कोटी आहे. तरीही अन्नाचा तुटवडा आपल्याला पडत नाही. कारण ७० वर्षांमध्ये काँग्रेसने सगळे नियोजन करून ठेवले होते. औद्योगिक क्षेत्र असो,कृषीक्षेत्र असो, आरोग्य असो, शैक्षणिक असो या सर्वच क्षेत्रामध्ये भारत देश काँग्रेस पक्षाने प्रगतीपथावर आणला आहे. हे सर्व काँग्रेस पक्षाने केलेले आहे. हे लक्षात असू द्या. म्हणून या देशाला काँग्रेस शिवाय पर्याय नाही. यासाठी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला भरघोष मतानी निवडून द्या. आम्ही मोहोळचा विकास करु. असे त्यांनी सांगितले.



सोलापूर : शहरात रोज रात्री थंडी वाढत आहे. या थंडीमुळे धुकेही वाढत आहे. हैदराबाद-पुणे बायपास महामार्गावर रात्रीच्या वेळी धुक्याचे टिपलेले छायाचित्र.



सोलापूर : माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे हे सोलापुरात आल्यावर त्यांचे उद्योजक विकी बनसोडे यांनी स्वागत केले. यावेळी चेतन नारोटे, रियाज निगेवान, ओंकार थोरात.

**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**
६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२
फोन -०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०६/०६/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार समर्थ श्रीशैल माळी प्रोप्रा श्रीशैल शरणप्पा माळी रा. प्लॉट नं. २१०/११/३. हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर व जामीनदार १) कुंडलिक झुंबर खंडागळे रा. खंडागळे वस्ती, उळे, दक्षिण सोलापूर २) लक्ष्मण ज्योती जोगदनकर रा. खंडोबाची वाडी. सावरगाव ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद ३) गीतांजली श्रीशैल माळी रा. प्लॉट न.२१०/११/३, हेरीटेज मनिधारी एम्पायर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये ३८.९२,०५८/- या वर दि.१७/११/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमेची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव **जेथे आहेत व जैसे आहेत** अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीशैल शरणप्पा माळी | डि व सब डि सोलापुर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे मुळेगांव, धवल नगर गट नं. १०६/अ+ब/३ (ऑनलाईन उतारा प्रमाणे गट नं. १०६/अ/ब/३) | प्लॉट नं.१३०. क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३१ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १२९ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३२ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३२ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३१ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३३ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३४ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३२ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३४ क्षेत्र ९२.८१ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३५ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३३ | रु. २,९०,०००/- |
| | | प्लॉट नं.१३५ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३६ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३४ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३६ क्षेत्र ९२.९३ चौ.मी. | गट नं.१०६/४ | प्लॉट नं. १३७ | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३५ | रु. ३,००,०००/- |
| | | प्लॉट नं.१३७ क्षेत्र १३७.५४ चौ.मी. | गट नं.१०६/४ | ले आ रस्ता | ले आ रस्ता | प्लॉट नं. १३६ | रु. ४,२५,०००/- |
| लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ **बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दि. १५/१२/२०२५** वेळ - सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत **निविदा उघडण्याची तारीख व वेळ दि. १६/१२/२०२५ सायं. ५:०० वा** | | | | | |
| १७/११/२०२२ अखेर येणेबाकी | | रु. ३८.९२,०५८/- दि. १८.११.२०२२ पासून होणारे व्याज, दंड व्याज व इतर खर्च | | | | | |

**टिप-** लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.१२/१२/२०२५ पूर्वी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर, आर.टी.जी.एस ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. २. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील. ३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. ४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - २७/११/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली. सोलापूर**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022
IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 93933602 | मालमत्तेवर कर्ज | १. तुकाराम रामचंद्र फुले २. शोभा तुकाराम फुले | 04/10/2025 | रुपये 84,818.75/- |
| **मालमत्तेचा पत्ता**: मालेवाडी (अ) सर्व्हे क्रमांक ३/३/बी, क्षेत्रफळ ३७.00.00 आर, (३७00.00 चौ. मीटर) येथील निवासी मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, मालेवाडी (अ), तालुका: माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१ येथे स्थित, आणि अशी सीमा आहे:- पूर्व: नामदेव बाबू फुले पश्चिम: तात्या नाना फुले उत्तर: श्री. जालिंदर अप्पा फुले यांची मालमत्ता दक्षिण: रस्ता | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : २९/११/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : जिल्हा सोलापूर, **तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर** सोलापूर महानगरपालिकेचे हद्दवाढ भाग नेहरु नगर मधील सदानंद नगर मधील **खुली प्लॉट जागा** यांसी **गट नं.३०/अ/१३** मधील प्लॉट नं. E-०९ याचे क्षेत्र ७९.८१ चौ.मी. किंवा ८६० चौ. फुट. यांसी चतुः सिमाः पुर्वेसः प्लॉट नं. ई-८, दक्षिणेसः प्लॉट नं. ई-१०, पश्चिमेसः रस्ता, उत्तरेसः लिहून देणार यांनी बांधलेला जोता.

येणेप्रमाणे वर खुलासा केलेली प्लॉटजागा ही **मारुती बेलप्पा तळभंडारे** यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन, त्यांनी सदरची प्लॉटजागा ही आमचे अशिल-**सागर शिवकुमार माळेकर** यांना खरेदी देण्याचे ठरवून, आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन आमचे अशिलाचे नांवे कब्जापावती व करारपत्र आमचे अशिलांच्या नावे लिहून दिलेली आहे. सदर प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री सदर प्लॉटजागा मालकांनी आमचे अशिलास दिली आहे.

तरी वर नमूद प्लॉटजागेवर अन्य कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, टाच, साठेखत, गहाणखत वगैरे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रासह त्यांची लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे मुदतीत कोणी काही हक्काची जाणीव न दिल्यास, सदर प्लॉटजागा वर नमूद मालकांचे मालकीची असून ती निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल सदर प्लॉटजागेचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. २८/११/२०२५.

**सही/-**
**ॲड. विलास चं. गुदपे**
**एम.ए.एलएलबी.**
**रा. ब्लॉक नं.२४, सोनी नगर, मोतीबाग,**
**सोलापूर मो.नं. ९९७०१५५४१५**
**अशिल-सागर शिवकुमार माढेकर तर्फे ॲडव्होकेट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारताचे वन-डेवर लक्ष केंद्रित : मॉर्केल

◆ **रांची, २८ नोव्हेंबर**


कसोटी मालिकेतील पराभवातून बाहेर पडून भारतीय संघाला लवकरात लवकर वन-डे क्रिकेटवर लक्ष केंद्रित करावे लागेल. धोकादायक, आत्मविश्वासू दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सामना करण्यासाठी भारतीय संघाला पुन्हा गती मिळवणे अत्यावश्यक आहे, असे भारतीय संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल म्हणाले.

कोलकाता आणि गुवाहाटी येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ०-२ असा लाजिरवाणा क्लीन स्विप व कसोटी पराभवानंतर भारत तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत येत आहे.रविवार ३० नोव्हेंबर रोजी रांची येथे भारत व दक्षिण आफ्रिकेदरम्यान पहिला दिवस-रात्र काळात एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामना खेळला जाणार आहे.

कसोटीपासून वन-डे क्रिकेटकडे वळणे मानसिकदृष्ट्या कठीण आहे, परंतु संघ त्या बदलासाठी दृढनिश्चयी आहे. आमच्यासाठी दोन आठवडे निराशाजनक होते, परंतु आता आमच्याकडे विचार करण्यासाठी काही दिवस आहे. आता महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली सर्व ऊर्जा वन-डे क्रिकेट संघात घालणे आहे, असे मोर्केल म्हणाले.

**मजबूत सुरुवात करणे आवश्यक**

दक्षिण आफ्रिका संघ आपल्या कसोटी मालिकेतील विजयानंतर ताजातवाना व उत्साही असेल. रंगीत कपडे परिधान करणे व चेंडू बदलणे वेगळी ऊर्जा आणते. दक्षिण आफ्रिकेकडे गती आहे, तेव्हा भारतीय संघासाठी पुढील एक किंवा दोन आठवड्यात चांगली मजबूत सुरुवात करणे महत्वाचे आहे, असा इशारा मॉर्केलने दिला.



२०२६ चा टी-२० विश्वचषक स्पर्धेची तयारी म्हणून एकदिवसीय मालिका वापरण्याचा विचार त्यांनी फेटाळून लावला.

माझ्यासाठी निराशाजनक दोन आठवड्यांनंतर भारतीय संघात पुन्हा गती आणणे हे लक्ष केंद्रित आहे आणि ते करण्याचा मार्ग म्हणजे चांगले, भक्कम वन-डे क्रिकेट खेळणे आहे. रोहित शर्मा व विराट कोहलीसारखे अनुभवी खेळाडू संघात परत आल्यामुळे आपण उत्साहित आहे, असे ते म्हणाले.

केएल राहुल व ऋषभ पंत दोघेही संघात एकत्र खेळतील का असे विचारले असता, मॉर्केलने निवडीच्या बाबींबद्दल काहीही सांगितले नाही. माझा विभाग गोलंदाजी आहे, मी निवडीत सहभागी होत नाही. आमच्याकडे निवडकर्त्यांकडे ते हाताळण्याची जबाबदारी आहे, असे ते म्हणाले.

**रांचीच्या वातावरणाचे मूल्यांकन करणे आवश्यक**

रांचीतील सामने प्रकाशझोतात असल्यामुळे तेथील परिस्थितीचे काळजीपूर्वक मूल्यांकन करणे आवश्यक आहे, असे मॉर्केल म्हणाले.

काल जेव्हा मी विमानातून उतरलो तेव्हा ते खूपच थंड होते. सायंकाळी चेंडू काय करतो हे पाहणे मनोरंजक असेल. आज आम्ही प्रकाशझोतात सराव करत आहोत, त्यामुळे आम्हाला चांगले संकेत मिळतील, असे ते म्हणाले.

खेळपट्टी खूप चांगली दिसते. संघबांधणीवर चर्चा आज रात्री होईल. सरावानंतर आपल्याला वाट पहावी लागेल, असे ते म्हणाले.

**गिल, अय्यर बरे होताय**

शुभमन गिल व श्रेयस अय्यर दुखापतींमधून सावरत आहे. ते बरे होत आहे, असे त्यांनी सांगितले.

मी दोन दिवसांपूर्वी शुभमनशी केवळ चौकशी करण्यासाठी बोललो आणि तो बरा होत आहे. श्रेयसने आपले पुनर्वसन सुरू केले आहे व तो उत्तम आहे. आम्ही त्यांचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत. ते निरोगी आहेत आणि संघात परतण्याची तयारी करत आहेत, असे त्यांनी सांगितले.ॉ

**युवा गोलंदाजांसाठी मोठी संधी**

अनेक वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आल्यामुळे, एकदिवसीय मालिकेने अर्शदीप सिंग, हर्षित राणा व प्रसिध कृष्णा सारख्या दुसऱ्या फळीतील वेगवान गोलंदाजांसाठी एक महत्त्वाची संधी आहे. हे तिघेही एका दर्जेदार फलंदाजी विभागाविरुद्ध खेळणार आहेत. त्या सर्वांनी भरपूर वन-डे क्रिकेट खेळले आहे, हे एक आक्रमक ब्रॅण्डचे क्रिकेट आहे, असे मॉर्केल म्हणाले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानला नमवून श्रीलंका अंतिम फेरीत

**टी-२० तिरंगी क्रिकेट मालिका** | **दुष्मंथ चमिराचे ४ बळी**




दुष्मंथ चमिराचे अभिनंदन करताना श्रीलंकेचे खेळाडू

◆ **रावळपिंडी, २८ नोव्हेंबर**

वेगवान गोलंदाज दुष्मंथ चमिराने २० धावांत टिपलेल्या ४ बळींच्या बळावर श्रीलंकेने पाकिस्तानवर ६ धावांनी रोमहर्षक विजय नोंदवून टी-२० तिरंगी मालिकेच्या अंतिम फेरीत धडक मारली. या तिरंगी मालिकेतील तिसरा संघ झिम्बाब्वे बाहेर झाला आहे. आता शनिवारी याच मैदानावर पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेने मर्यादित २० षटकांत ५ बाद १८४ धावा उभारल्या आणि पाकिस्तानसमोर विजयासाठी १८५ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला ७ बाद १७८ धावांपर्यंत मजल मारता आली.

सलग तीन विजयांसह शनिवारी अंतिम फेरीत पोहोचलेल्या पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाची कारकिर्दीतील सर्वोत्तम नाबाद ६३ धावांची खेळी व्यर्थ ठरली.

श्रीलंकेकडून सलामीवीर कामिल मिश्राने ४८ चेंडूंत ६ चौकार व ३ षट्कारसह ७६ धावांची आकर्षक खेळी केली. कुसल मेंडिसने ४० धावांची व जनित लियानगेने नाबाद २४ धावांची भर घातली.

विजयासाठी पाकिस्तानच्या कर्णधझार सलमान आगासह उस्मान ख्वाजा (३३), सईम अयुब (२७) व मोहम्मद नवाजने (२७) शर्थीचे प्रयत्न केले, परंतु पॉवर प्लेमध्ये ३ धावांत ३ बळी अशा आकड्यांसह दुष्मंथ चमीराने पाकिस्तानचा पाठलाग रोखला. पाकिस्तानला विजयासाठी १० धावांची आवश्यकता असताना केवळ तीन धावा दिल्या.

सर्वांनी योगदान दिले, अर्थातच चमीराने जागतिक दर्जाची गोलंदाजी केली, याचा अभिमान आहे, असे श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाका म्हणाला. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### तन्वी, प्रबोध राज्यस्तरावर चमकले



**वाशीम** : बारामती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेत वाशीमच्या शोतोकॉन कराटे ॲकॅडमीचे विद्यार्थी तन्वी श्रीकिसन खेलपाडे आणि प्रबोध माधव अढाव या दोन विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करणारी तन्वी ही राज्यातून दुसरी तर प्रबोध हा राज्यातून तिसरा आला. या विजयामुळे आता तन्वी आणि प्रबोध हे दोन्ही खेळाडू शासकीय सेवेमध्ये खेळाडूंसाठी जे पाच टक्के राखीव असतात, त्यासाठी आता ते पात्र ठरले आहेत. प्रशिक्षक सेन्सेई निखिल देशमुख यांनी या खेळाडूंना मार्गदर्शन केले. मागील वर्षी चैतन्य बबन डाखोरे याने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवून लुधियाना येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली होती.

### पुणे ग्रॅण्ड टूर सायकल रोड रेस १९ जानेवारीपासून

**नवी दिल्ली** : देशातील पहिली युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल २.२ श्रेणी रोड रेस, पुणे ग्रॅण्ड टूरची पहिली आवृत्ती १९ ते २३ जानेवारी दरम्यान आयोजित केली जाणार आहे. यजमान भारत दोन संघांना मैदानात उतरवणार आहे. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियातर्फे (सीएफआय) २ ते ६ डिसेंबर दरम्यान ओडिशातील संबलपूर येथे राष्ट्रीय अजिंक्यपद आणि निवड चाचण्या आयोजित करण्यात येणार आहे. निवडलेल्या खेळाडूंचे मूल्यांकन २८ डिसेंबर रोजी पुण्यात होणाऱ्या राष्ट्रीय रोड रेसद्वारे केले जाईल. भारत अ आणि भारत ब या दोन भारतीय संघांची उपस्थिती, उदयोन्मुख आणि अनुभवी सायकलपटूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवण्यासाठी एक व्यापक व्यासपीठ प्रदान करेल. बजाज पुणे ग्रॅण्ड टूर हा भारताचा प्रमुख कार्यक्रम आहे, या कार्यक्रमाचा उद्देश युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलच्या (यूसीआय) जागतिक कॅलेंडरमध्ये पुणे सायकल रोड रेससाठी नियमित स्थान मिळवणे आहे. पहिल्या आवृत्तीत उच्चभ्रू आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी होतील, त्यामुळे ही स्पर्धा चुरशीची आणि जागतिक दर्जाची होईल असा विश्वासआहे. या टूरमध्ये पुणे जिल्ह्यातील निसर्गरम्य भागातून जाणारे चार टप्प्यांचे ४३७ कि.मी.चे आव्हानात्मक मार्ग असतील.

### वनरक्षक नीलेश धोंगडे यांची ऐतिहासिक कामगिरी

**अहेरी** : नांदेड येथील विष्णुपुरी प्रकल्पात पार पडलेल्या १२ व्या राष्ट्रीय ड्रॅगन बोट अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. विशेष म्हणजे, आलापल्ली (गडचिरोली) येथील वन विकास महामंडळात कार्यरत असणारे वनरक्षक नीलेश किशोरराव धोंगडे यांनी वरिष्ठ गटात ऐतिहासिक यश मिळवले. पुरुष डीबी २२ - ५०० मीटर या क्रीडा प्रकारात नीलेश धोंगडे यांनी कांस्यपदक जिंकून केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर गडचिरोली परिसराचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे. या स्पर्धेचे महत्त्व अधिक होते. कारण यातील कामगिरीच्या आधारावरच सान्या हैनान, चीन येथे २०२६ मध्ये होणाऱ्या ६ व्या आशियाई बीच गेम्ससाठी भारतीय ड्रॅगन बोट संघाची निवड होणार आहे. नीलेश धोंगडे यांच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांची भारतीय संभाव्य संघात निवड होण्याची शक्यता बळावली आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल वनरक्षक नीलेश धोंगडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# एस.पी.एम. स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

एस.पी.एम.इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात पार पडला. याचे उद्घाटन संगमेश्वर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापिका संगीता कोळी यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी क्रीडा शिक्षक प्रकाश कंपली, पालक शिक्षक संघटनेच्या अध्यक्षा गितांजली मुळे उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय अनुराधा इंगळे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्र संचलन विद्यार्थ्यांनी गार्विक मुळे, वेदिका गौतमे, गार्गी कमठाणकर यांनी केले. स्वरा क्षीरसागर हिने आभार मानले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



# ए. जी. पाटील अभियांत्रिकीत आंतर विभागीय बॅडमिंटन व टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे अंतर्गत आंतर विभागीय बॅडमिंटन आणि टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, विद्यापीठ सहाय्यक क्रीडा समन्वयक प्रा. बालाजी फुलचवाड, संजय वाईकर, सोलापूर झोन सचिव प्रा. सचिन गायकवाड, निवड समिती सदस्य प्रा.अमित वडवेराव, प्रा. गणेश बागल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. टेबल टेनिस स्पर्धा प्रमुख पंच झेड. एम. पुणेकर, बॅडमिंटन स्पर्धा अमित नल्ला, सोनिया चंकेश्वरा यांच्या सहकार्याने पार पडली. स्पर्धेचे संयोजन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. शिवशरण कोरे व क्रीडा समन्वयक यांनी केले. सर्वांगीण विकासासाठी संस्था अध्यक्ष एस. ए. पाटील व संस्था सचिव शिवानंद पाटील यांनी प्रोत्साहन दिले.




# बार्शीच्या कुणाल लोखंडेचा जलतरण स्पर्धेत षटकार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. २८ नोव्हेंबर-**

विधी महाविद्यालयातील कुणाल लोखंडे याने महाविद्यालयानी जलतरण स्पर्धेतील ५० व १०० मीटर फ्री स्टाईल, ५० व १०० मी बॅक स्ट्रोक आणि ५० व १०० मी ब्रेस्ट स्ट्रोक या सहा प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त कर्मवीर जलतरण तलावात श्री. शिक्षण शास्त्र महाविद्यालय ही स्पर्धा आयोजित केली होती. कुणालला शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता व मनोहर सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. त्याचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. सोनकांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी प्रा. शिकारे एम. पी., प्रा.मिठा एम.एस., प्रा.साखरे दीपिका, प्रा. सुरवसे मॅडम, प्रा. समाधान काळे, प्रा.वडणे सर, प्रा.खोत सर, गव्हाणे एस.एस., कोळी के. वी., कोल्हे ए.जी., वाघे आर. जी., माने एम.एम., कृष्णा सातपुते, ठोंबरे एस.के., शेळके एस.एम. उपस्थित होते. त्याचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी.टी.पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार आदींनी अभिनंदन केले.

# जिल्हा शुटींग बॉल संघाच्या कर्णधारपदी बेगमपुरे, गरगडे

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा शुटींग बॉल संघाच्या कर्णधारपदी शोएब बेगमपुरे व कार्तिका गरगडे यांची निवड करण्यात आली. परभणी येथे होणाऱ्या ३८व्या राज्य स्पर्धेसाठी त्रिस्त्रीय निवड समितीने निवडलेला सोलापूर जिल्हाचा पुरुष व महिला संघ असोसिएशनचे सचिव फैजअहमद बेगमपुरे यांनी जाहीर केला.

सोलापूर शहर व जिल्हा शुटींग बॉल असोसिएशन व समृद्धी स्पोर्ट्स क्लबच्या वतीने पुरुष व महिला अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा पार पडली. त्यातून हे संघ निवडले. समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे उपाध्यक्ष रामचंद्र दत्तू यांनी पुरुष व महिला संघांना किट दिले.

दोन्ही संघांचे समृद्धी सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष तथा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, उपाध्यक्ष अलीम शेख, सचिव फैजअहमद बेगमपूरे, रशीद बागवान, मेहमूद मडकी, सलीम करणकोट, इकबाल दलाल, तौसिफ बागवान, आमीर कुमठे व कलीम करणकोट यांनी अभिनंदन केले.

**संघ : पुरुष** : शोएब बेगमपुरे, अमीर काझी, हिरो शेख, गणेश मोरे, अजय कांबळे, फैजान इनामदार, अमन शेख, जुनैद कुरेशी, विनायक नाळे, फरहान लालकोट, सिद्धार्थ कांबळे, ओंकार चक्रनरायण. प्रशिक्षक: श्रीनिवास कामूर्ती, संघ व्यवस्थापक: रफी दिवाण.

**महिला** : कार्तिका गरगडे, अनम रंगरेज, वैष्णवी आदलिंगे, नौशिन चांदा, श्रावणी खताड, फिरदौस शेख, संचिता माडी, सानिया सय्यद, मानसी अलदर, अदीबा शेख, राणी लोभटे, आफिया शेख. प्रशिक्षक: अब्दुल हमीद हिरोली, संघ व्यवस्थापक: विष्णू तळभंडारे.



# कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताहास सुरुवात

## खेळामुळे शरीर आणि मन उत्साही व आनंदी राहते

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

जुळे सोलापूर येथील कै. वि.मो.मेहता प्राथमिक शाळेच्या मैदानावर क्रीडा सप्ताहास सुरवात झाली.

हवेत फुगे सोडून या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस उपनिरीक्षक मोहन पवार, उदयसिंह साळुंखे याच्या हस्ते झाले. सुरवातीस क्रीडा ज्योतीचे जल्लोषात आगमन झाले. इ.३री व ४थीच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धरीत्या संचलन करुन प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. स्वरा कुलकर्णी हिने सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ दिली १ली ते ४थी च्या सर्व विद्यार्थ्यांनी साहित्य कवायत प्रकार सादर केले. संचलनातील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाप्रमुख रोहिणी माशाळकर व गणेश माने यांचे मार्गदर्शन लाभले. इ. ३री च्या विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. त्यांना सुनेत्रा मोहोळकर यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे राजेश पटवर्धन यांनी सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर क्रीडामैदानाचे पूजन करुन व टॉस उडवून इ.२री च्या रस्सीखेच सांघिक सामन्याचे उद्घाटन करण्यात आले. मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी माशाळकर यांनी केले. शीतल जालीमिंचे यांनी आभार मानले.

### भारत-श्रीलंका महिला टी-२० मालिका २१ डिसेंबरपासून

**नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर**

आगामी २१ डिसेंबरपासून भारतात श्रीलंका महिला संघ भारताविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिका खेळणार आहे. २१ ते ३० डिसेंबर दरम्यान विशाखापट्टणम् आणि त्रिवेंद्रम येथे मालिकेतील पाच सामने खेळले जाणार आहे, असे बीसीसीआयने शुक्रवारी सांगितले. दोन्ही देशांमधील राजकीय तणावामुळे बांगलादेशविरुद्धचा नियोजित सामना पुढे ढकलण्यात आला होता. या वर्षाच्या सुरुवातीला एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय महिला संघाचा हा पहिलाच सामना असेल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) पुढील महिन्यात पाच सामन्यांच्या सामन्यांसाठी श्रीलंकेचे यजमानपद भूषवणार असल्याने आगामी महिला टी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर करत आहे.



# विश्वविजेती दिव्यांग क्रिकेटपटू गंगा कदम रविवारी सोलापुरात

**दमाणी अंध शाळेच्या वतीने विमानतळापासून दमाणीनगरपर्यंत रॅली**

## मुख्यमंत्र्याकडून १६ डिसेंबरला सन्मान

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

दिव्यांग (अंध) महिलांच्या पहिल्या विश्वचषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत भारताने विजेतेपद पटकाविले. त्या संघात उपकर्णधार गंगा कदम हिचा समावेश होता. ती सोलापुरात विमानाने रविवारी दुपारी दोन वाजता येणार आहे. सोलापुर विमानतळावर भैरूरतन दमाणी अंध शाळेच्या वतीने तिचे स्वागत करण्यात येणार आहे. विमानतळापासून ते दमाणी नगरपर्यंत भव्य रॅली काढण्यात येणार आहे. भैरूरतन दमाणी अंधशाळेत या रॅलीची सांगता होणार आहे. तरी सोलापुरातील क्रीडा प्रेमींनी उपस्थित राहून तिला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन तिचे प्रशिक्षक राज शेळके यांनी केले आहे. विजेत्या महिला संघाचा सन्मान १६ डिसेंबर रोजी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून निरोप आला असल्याचेही श्री. शेळके यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# तलाठी भाऊसाहेबांनी पळापळी केल्याने दीड लाख शेतकऱ्यांची झाली 'ई-केवायसी'

- अजूनही २५ हजार शेतकऱ्यांची ई-केवायसी पेंडिंग
- साडेपाच लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर ६६५ कोटी जमा



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आणि यातील सर्वच रक्कम मंजूर झाली आहे. यातील ५ लाख ९९ हजार ६६१ शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७३२ कोटी ०४ लाख ४५ हजार ४४० रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ५ लाख ५१ हजार ५२७ शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ६६५ कोटी ०२ लाख ९९ हजार ५६१ रूपये इतकी रक्कम जमा झाले आहेत आणि ईकेवायसीअभावी, फार्मर आयडीअभावी २४ हजार २९४ शेतकऱ्यांचे २६ कोटी ५६ लाख २९ हजार ३३७ रूपये पेंडिंग पडले आहेत. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश मिळताच जिल्ह्यातील तलाठी भाऊसाहेबांनी पळापळी केल्याने १५ दिवसांत दीड लाख शेतकऱ्यांची ई-केवायसी होवून त्यांच्या खात्यावर पैसेही जमा झाले.

अतिवृष्टी होवून दीड महिना झाले तरी अजून २४ हजार २९४ शेतकऱ्यांच्या खात्यावर दमडीही पडली नसल्याने त्यांना रब्बी हंगामाचे बि-बियाणे, खते घेण्यासाठी अडचण आली. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे मात्र केवळ ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. जिल्हा प्रशासनाकडून ही रक्कम अदा करण्यासाठी धडपड चालू आहे. गावनिहाय कॅम्प सुरू केले आहेत. आता ई-केवायसी शेतकऱ्यांसाठी गरजेची आहे. यामुळे जाणकार शेतकरी आपला फार्मर आयडी, ई-केवायसी ई-महासेवा केंद्र आणि प्रशासनाच्या शिबिरात जावून काढू लागले आहेत. मात्र अनेक अडाणी शेतकऱ्यांना या कामात यश येत नाही. यामुळे अशाच शेतकऱ्यांचे हे पैसे बँकांत पडले आहेत.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत म दत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यावर सध्या थेट रक्कम जमा होवू लागली असून, अॅग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज आहे. यामुळे शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांच्या ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या काही दिवसात पैसे मिळणार आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचेही जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी, अॅग्रीस्टॅक करून घेतले जात आहे. अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे जिल्ह्यातील विविध भागात झालेल्या शेती, पायाभूत सुविधा व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकताच केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यात दौरा केला आहे. त्याचेही अहवाल केंद्राकडे जाणार आहे.

त्या काळात महापूर आणि अतिवृष्टीने जिल्ह्यातील १२ हजार ५० हेक्टर क्षेत्रावरील माती खरडून गेली. त्यामुळे या जमिनी कसण्यायोग्य राहिल्या नाहीत. यासाठी राज्य शासनाकडे ५७ कोटी रुपयांची मागणी केल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली. अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे काम सध्या सुरु आहे. फॉर्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचत आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांचे फॉर्मर आयडी नाहीत, अशा शेतकऱ्यांची ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गाव पातळीवर शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी तलाठी यांना आदेश देण्यात आले आहेत; अशीही माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली. अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी ढासळून त्यात गाळ पडला आहे. या विहिरींच्या दुरुस्तीचेही नियोजन आखण्यात येत आहे. यासाठी रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांना मदत करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

## सोलापूरच्या केंद्रिय विद्यालयातील रविंद्र आठवलेंचा आज निरोप समारंभ

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-

येथील मध्य रेल्वेच्या पी.एम. श्री केंद्रीय विद्यालयातील कर्तव्यनिष्ठ कर्मचारी रवींद्र लक्ष्मण आठवले (सब स्टाफ) हे केंद्रीय विद्यालयातील ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त दि. २९ नोव्हेंबर रोजी मोदी येथील पी.एम. केंद्रीय विद्यालय येथे निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी स्टाफ आणि रवींद्र आठवले यांचे कुटुंबिय व आठवले मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आठवले यांनी ३६ वर्षांच्या सेवाकाळात नेहमीच कामाला प्राधान्य दिले. त्यांनी विद्यालयाच्या विविध जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडल्या. २१ जुलै १९९० मध्ये रेल्वे सेवेत रुजू झालेले आठवले यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. विशेषतः पी.एम. केंद्रीय विद्यालय मध्य रेल्वे येथे सब स्टाफ म्हणून काम करताना त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी आजपर्यंत प्रामाणिकपणे आपली सेवा पार पाडली.

**३६ वर्षांच्या समर्पित सेवेनंतर आज होणार सेवानिवृत्त**



## महत्वाचे...

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेची तयारी

अक्कलकोट दि.२८ नोव्हेंबर

अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा आयोजित केली असून यानिमित्त मंगरूळे हायस्कूल शेजारील पटांगण येथे वाटरप्रूफ मंडप उभारण्याच्या कामाची जय्यत तयार करण्यात येत आहे. अक्कलकोटमध्ये भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी मिलन कल्याणशेट्टी, मैंदर्गीमध्ये अंजली बाजारमठ आणि दुधनीमध्ये अतुल मेळकुंदे यांच्या प्रचारानिमित्त अक्कलकोट येथील मंगरूळे प्रशालेजवळ मैदानामध्ये सकाळी साडेदहा वाजता ही जाहीर सभा होणार आहे. अक्कलकोट तालुक्याच्या विकासाचा दृढ संकल्प आणि भारतीय जनता पक्षाचे विकासाचे धोरण नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सभा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे सर्वांनी मोठ्या संख्येने या जाहीर सभेस उपस्थित राहावे असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहे.





### सांगोल्यात ५८ जणांचे रक्तदान

सांगोला, दि.२८ नोव्हेंबर

सांगोल्यातील शहीद जवान सामाजिक संस्थेच्या वतीने २६/११ दिन व संविधान दिनाच्या निमित्ताने शहरातील नेहरू चौक येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ५८ रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. रक्तदान शिबिराचे उद्घाटन वीरपत्नी शितल वाघमोडे, मंगल आदलिंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहीद जवानांच्या प्रतिमेचे पूजन बापूसाहेब ठोकळे, माजी सैनिक उत्तम चौगुले, संगिता चौगुले, माजी सैनिक निम्हणे, आनंद व्हटे, रमेश फुले, अरविंद केदार, शिवाजी इंगोले, राजेंद्र यादव, वसंतराव फुले यांच्या उपस्थित करण्यात आले. याप्रसंगी अमर रहे अमर रहे, वीर जवान अमर रहे, भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देऊन शहीदांचे स्मरण करण्यात आले. यावेळी सांगोला तालुक्यातील शहीद झालेले जवान व सर्व महापुरुषांचे फलक लावण्यात आले होते. रक्तदान शिबिर प्रसंगी गजानन बनकर, सोमेश यावलकर, सुरेश माळी, सुरेश फुले, माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र मराळ, संतोष ऐवळे, विश्वजीत फुले, दत्तात्रय नवले, रावसाहेब गायकवाड, सिताराम महिमकर, प्रसाद फुले, महेश बनकर यांनी भेटी देवून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. प्रास्ताविक अच्युत फुले व आभार प्रदर्शन बिरुदेव मासाळ यांनी केले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी संतोष महिमकर, महादेव दिवटे, अभिषेक फुले, आजित जाधव यांनी परिश्रम घेतले.

## प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला विजयी करा : भीमराव शेळके

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट दि २८ नोव्हेंबर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट शहराच्या विकासाची मोठी कामे चालू आहेत. तीर्थक्षेत्र विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अक्कलकोट शहराच्या विकासासह प्रभाग क्रमांक एकच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा नगराध्यक्षपदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी प्रभाग १ चो उमेदवार सुनंदा स्वामी व भिमराव उर्फ तम्मा शेळके यांना प्रचंड मताने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे उमेदवार भीमराव उर्फ तम्मा शेळके यांनी केले आहे. प्रभाग क्रमांक एक मधून भाजपाने भीमराव उर्फ तम्मामामा शेळके व सुनंदा स्वामी यांना उमेदवारी दिली आहे. भाजपाचे उमेदवार भीमराव शेळके यांनी आवाहन करताना म्हणाले की, अक्कलकोट शहराचा विकास हा झपाट्याने सुरू आहे.



आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अथक परिश्रम करून शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे. शहरात नवीन पाण्याची पाईपलाईन टाकणे, ड्रेनेजची नवीन पाईप टाकणे, बस स्थानकाची नूतन इमारत बांधणे, श्री मल्लिकार्जुन मंदिराची उभारणी, रस्ते विकास ही कामे सुरू आहेत. अक्कलकोट शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी तसेच प्रभाग क्रमांक एक मधील भाजपाचा उमेदवार म्हणून मी उभा आहे. तसेच सुनंदा स्वामी या प्रभाग क्रमांक एक अ मधून उभ्या आहेत. प्रभाग क्रमांक एकच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला मत देऊन विजयी करावे असे आवाहन भीमराव उर्फ तम्मामामा शेळके यांनी केले.

## बस वाहकाला मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

बार्शी, दि.२८ नोव्हेंबर-

बार्शी बसस्थानक परिसरात गुरुवारी दुपारी राज्य परिवहनच्या बसमधील वाहकाला प्रवाशांकडून मारहाण, शिवीगाळ व धमकावल्याची घटना घडली. याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी मधुकर विष्णू बागुल (वय ३१, नोकरी-वाहक, नारायणगाव एस.टी. आगार) यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, नारायणगाव बार्शी-नारायणगाव या नियमित फेऱ्यांमध्ये एमएच १४ एलएक्स ८८५१ या बसने सेवा देत असताना बार्शी एस. टी. स्टॅण्ड येथे प्रवासी उतरत असतानाच दोन इसमांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केली. प्रवासी चढताना लांब जाणाऱ्या प्रवाशांना प्रथम बसू द्या, असे सांगितल्यावर, सोमनाथ चंद्रशेखर खुडे (रा. लहुजी चौक, सुभाषनगर, बार्शी) व सूरज चंद्रशेखर खुडे (रा. माजीवाडा, साईनाथनगर, ठाणे वेस्ट) यांनी फिर्यादी वाहकाला अर्वाच्य शिवीगाळ करत हाताने चापट मारली, धक्काबुक्की केली व तुझे हातपाय काढीन, तू महाराष्ट्रात कशी नोकरी करतोस ते बघतो, अशी धमकी दिली.

घटनेदरम्यान प्रवाशांकडून गोळा केलेल्या तिकीट रकमेतील ३००० रुपयांची रक्कम गहाळ झाल्याची नोंद फिर्यादीने केली आहे. कंट्रोल रूमवरील काथवटे यांनी दोन्ही संशयित आरोपी प्रवाशांना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा अरेरावीपणा कायम राहिल्याने एस.टी. स्टॅण्डवरील ड्युटीवरील पोलिसांना बोलविण्यात आले. वरिष्ठांशी चर्चा करून फिर्यादी वाहकाने तक्रार नोंदवली असून तपास बार्शी पोलिसांकडून सुरु आहे.

## विकासासाठी वंचित बहुजन आघाडीला विजयी करा : आंबेडकर

अक्कलकोट, दि.२८ नोव्हेंबर-

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या राजकीय कारकीर्दी ची सुरवात असते. निवडणुकीत निवडून येणारे प्रतिनिधी हे खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करत असतात. यामुळे या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे जनतेची सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रियंका मडीखांबे आणि संजाबाई ठोंबरे यांच्या प्रचारार्थ भिमनगर अक्कलकोट येथे त्यांची जाहीर सभा झाली. यावेळी ते बोलत होते.





यावेळी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. नितीन ढेपे, राज्य उपाध्यक्ष व जिल्हा निरीक्षक सोमनाथ साळुंखे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक तालुकाध्यक्ष शिलामणी बनसोडे, तालुकाध्यक्ष विशाल ठोंबरे, कामगार संघटनेचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे रविराज पोटे, आतिश बनसोडे, सोलापूर शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, महासचिव विनोद इंगळे उपस्थित होते. पुढे बोलताना आंबेडकर म्हणाले, आपण निवडून दिलेले आमदार खासदार हे वर्षानुन एकदाही मतदारांना तोंड दाखवीत नाहीत. जितका विकास आमदार खासदार करू शकत नाहीत तितका विकास हे स्थानिक स्वराज्य संस्थेमधील नगरसेवक करत असतात. आपल्या प्रभागातील विविध विकास कामे ही प्रामुख्याने नगरसेवकच करतात.

त्यामुळे येथे आपल्या विचाराचे उमेदवार असणे गरजेचे आहे. लबाड, चोरी करणाऱ्यांना घरी बसवास असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. ढेपे, जिल्हाध्यक्ष मडीखांबे, राज्य उपाध्यक्ष साळुंखे यांचेही भाषण झाले.

## अकलूज बाजार समितीत मक्याला २४०० रु.हमीभाव; तर खासगी व्यापारी देतात फक्त १८०० रुपये

तभा वृत्तसेवा,
पिलीव दि.२८ नोव्हेंबर-

> माळशिरस तालुक्यात मका हमीभाव केंद्र नसल्यामुळे खाजगी व्यापाऱ्याकडून शेतकऱ्यांची अक्षरश लुट केली जात आहे. यामुळे दरातील तफावत लक्षात घेईल तसेच शेतकऱ्यांना दराबाबत न्याय मिळेल.
> **- सुखदेव लेंगरे, मका उत्पादक शेतकरी, कुसमोड.**

माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २४०० रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने मका खरेदी सुरू करण्यात आली आहे. तर खाजगी व्यापारी मात्र केवळ १८०० रुपये दर देत असल्याने शेतकऱ्यातून नाराजी व्यक्त होत आहे.

बाजार समितीसाठी शेतकऱ्यांनी ७,१२ उताऱ्यावर पिकाची नोंदणी व त्यावर क्षेत्रफळ, आधार कार्ड झेरॉक्स, आधार कार्ड लिंक असलेले बँक खाते पासबुक झेरॉक्स, फार्मर आयडी, बायोमेट्रिक करण्यासाठी स्वतः शेतकऱ्यांनी हजर राहणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा मोबाईल नंबर तर शासनाने ठरवुन दिलेल्या निकषानुसारच एफ.ए.क्यु दर्जाची मका खरेदी करण्यात येणार आहे. बाजार समीतीने उपकेंद्र पिलीव, माळशिरस व तालुक्यातील इतर मोठ्या गावात सदरची हमीभाव मका खरेदी केंद्रे सुरु करुन न्याय द्यावा अशी मागणी मका उत्पादक शेतकऱ्यांमधुन होत आहे. दरम्यान शासनाचा मक्केचा हमीभाव हा २४०० रुपये आहे. यामुळेच खाजगी व्यापाऱ्यांचे पितळ उघडे पडले आहे. पिलीव येथील व्यापारी सध्या चांगल्या प्रतीची मका फक्त १८०० रुपये क्विंटल या दराने खरेदी करीत आहेत. क्विंटल मागे ६०० रुपयांची लूट खाजगी व्यापारी करत आहेत. किती मोठी दराबाबत तफावत मग शासनानेच यावर तोडगा काढून बाजार समितीमार्फत तालुक्यातील सर्व मोठ्या गावात सदरची मका हमीभाव केंद्रे सुरू करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी तालुक्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांमधुन होत आहे. बाजार समिती फक्त अकलूज येथे हमीभावाने मका खरेदी न करता तालुक्यातील त्यांच्या पिलीव, माळशिरस, नातेपुते, वेळापूर, माळीनगर, श्रीपूर याठिकाणी जर सदरची मका हमीभाव केंद्रे सुरू केली तर शेतकऱ्यांचा चांगला फायदा होईल तसेच खाजगी व्यापाऱ्याकडून होणारी लुट थांबुन शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल.

## निधन वार्ता...

### ज्ञानेश्वर सावंत

सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-



येथील धर्मशी लाईन एसटी स्टँड जवळील रहिवासी ज्ञानेश्वर रघुनाथ सावंत (वय ६८) यांचे गुरुवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. सोलापूर जिल्हा न्यायालयाजवळील राम कृष्ण हरी टायपिंग सेंटरचे ते मालक होते. त्यांच्या पार्थिवावर पुणे नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अॅड.विलास काळे

सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-



केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग विभागातील सेवानिवृत्त अधिकारी व कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी अॅड. विलास नारायण काळे (वय-६५) यांचे सोमवारी दि.२४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, विवाहीत मुलगी, जावई, नातवंडे, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

### रमेश पावले

सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते राहुल रमेश पावले यांचे वडील रमेश पावले (वय ६८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अक्कलकोट नगरपरिषद नगराध्यक्षपदासाठी सहा उमेदवार रिंगणात








तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि.२८ नोव्हेंबर-

अक्कलकोट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत नगरसेवक पदासाठीच्या २५ जागांपैकी अकरा जागा महिला प्रवर्गासाठी आरक्षण असून ४० महिला उमेदवार हे निवडणुकीत नशीब आजमावित आहेत. थेट नगराध्यक्ष पदासाठी सहा उमेदवार रिंगणात असून एकही महिला उमेदवाराचा समावेश नाही.

अक्कलकोट नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण बारा प्रभाग असून नगरसेवक पदाच्या २५ जागा आहेत. यातील ११ जागा या ओबीसी, एससी, खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव आहेत. नगरसेवक पदासाठी एकूण ७६ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.थेट नगराध्यक्ष पदासाठी सहा जण हे निवडणूक लढवत आहेत. विविध प्रभागातील ११ जागांसाठी विविध पक्षांकडून ४० महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर नगराध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पार्टी तर्फे मिलन कल्याणशेट्टी, कॉंग्रेस कडून अशपाक बळोर्गी, शिवसेना शिंदे गटातर्फे रईस टिनवाला, शिवसेना ठाकरे गटातर्फे बाबासाहेब जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटातर्फे इक्रार शेख, अपक्ष म्हणून नागनाथ उमदी हे निवडणुकीच्या मैदानात आहेत.

अक्कलकोट नगरपरिषद **प्रभाग क्रमांक एक अ** सुनंदा स्वामी (भारतीय जनता पार्टी) कौसर नदाफ (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) राजश्री बोलदे (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक एक ब** भीमराव शेळके (भारतीय जनता पार्टी) गुरुपादप्पा गुब्याड (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) राहुल चव्हाण (शिवसेना शिंदे गट) सिकंदर चाऊस (अपक्ष) **प्रभाग क्रमांक दोन अ** कस्तुरा चौगुले (भारतीय जनता पार्टी) विजयालक्ष्मी आळवीकर (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) शकुंतला चौगुले (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक दोन ब** लक्ष्मीकांत धनशेट्टी (भारतीय जनता पार्टी) श्रीशैल गंगनगोंडा (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) मंगेश जाधव (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक तीन अ** मुस्तफा गवंडी (भारतीय जनता पार्टी) मुस्तफा बळोरगी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) **प्रभाग क्रमांक तीन ब** रेश्मा शेख (भारतीय जनता पार्टी)जाहिराबी शेख (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) पुतळाबाई शिरसागर (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक चार अ** अविनाश मडीखांबे (भारतीय जनता पार्टी) राहुल मोरे (शिवसेना शिंदे गट) नागेश हरवाळकर (अपक्ष) **प्रभाग क्रमांक चार ब** मंजना कामनूरकर (भारतीय जनता पार्टी) रखमाबाई शापवाले (शिवसेना शिंदे गट) विद्या माळी (अपक्ष) **प्रभाग क्रमांक पाच अ** रेणुका राठोड (भारतीय जनता पार्टी )सुस्मिता अळोळी (शिवसेना शिंदे गट)नसरीन बागवान (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी)**प्रभाग क्रमांक पाच ब** रमेश कापसे (भारतीय जनता पार्टी) सय्यद मुजम्मिल पाशा पिरजादे (शिवसेना शिंदे गट) सौरभ लांडगे (राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट) सैपन शेख (एम आय एम) **प्रभाग क्रमांक सहा अ** अर्पणा शिंदे (भारतीय जनता पार्टी) जयश्री फुलारी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) गंगाबाई इसापुरे (शिवसेना शिंदे गट ) **प्रभाग क्रमांक सहा ब** यशवंत धोंगडे ( भारतीय जनता पार्टी )सिद्धाराम आळगी (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक सात अ** नवीद डांगे (भारतीय जनता पार्टी) रजाक बागवान (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) नुरुद्दीन बागवान (शिवसेना शिंदे गट ) **प्रभाग क्रमांक सात ब** अमृता शिंदे (भारतीय जनता पार्टी) मीनाक्षी सूर्यवंशी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) फरियाशाजनीन टिनवाला (शिवसेना शिंदे गट) जन्नतबी बागवान (अपक्ष) **प्रभाग क्रमांक आठ अ** शैला स्वामी (भारतीय जनता पार्टी) शोभा इचगे ( शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक आठ ब** महेश हिंडोळे (भारतीय जनता पार्टी) आकाश शिंदे (शिवसेना शिंदे गट) रवींद्र डोके (शिवसेना ठाकरे गट) **प्रभाग क्रमांक ९ अ** स्नेहा खवळे (भारतीय जनता पार्टी) आरती पारखे (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) पुतळाबाई शिरसागर (शिवसेना शिंदे गट) नाजीन होटकर (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) संजाबाई ठोंबरे (वंचित बहुजन आघाडी) **प्रभाग क्रमांक ९ ब** सद्दाम हुसेन शेरीकर (भारतीय जनता पार्टी )शकील खिस्तके (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) राहुल भकरे (शिवसेना शिंदे गट )देवेंद्र शिंदे (शिवसेना ठाकरे गट) **प्रभाग क्रमांक दहा अ** सोनाली शिंदे (भारतीय जनता पार्टी) हर्षदा पाटील (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक दहा ब** देविदास कवटगी (भारतीय जनता पार्टी ) सिद्धलिंग लाळशेरी ( शिवसेना शिंदे गट ) अक्षय सोमवंशी (अपक्ष) **प्रभाग क्रमांक ११ अ** आरती गायकवाड (भारतीय जनता पार्टी) सरिता कुरले ( शिवसेना शिंदे गट) प्रियांका म डीखांबे (वंचित बहुजन आघाडी) **प्रभाग क्रमांक ११ ब** महेश इंगळे (भारतीय जनता पार्टी) मुबारक कोरबू (शिवसेना शिंदे गट) किरण किरात (शिवसेना ठाकरे गट) **प्रभाग क्रमांक १२ अ** ऋतुराज राठोड (भारतीय जनता पार्टी) अशितोष राठोड (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) **प्रभाग क्रमांक १२ ब** भागुबाई कुंभार (भारतीय जनता पार्टी) कमलाबाई राठोड (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस) ताराबाई कुंभार (शिवसेना शिंदे गट) **प्रभाग क्रमांक बारा क** अल्फिया कोरबू (भारतीय जनता पार्टी) सायराबानू कोरबू (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ) रवीना राठोड (शिवसेना शिंदे गट) अक्कलकोट नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी बहुरंगी लढत आहे. तर २५ नगरसेवक पदांसाठी विविध ठिकाणी दुरंगी तर काही ठिकाणी तिरंगी लढत आहे. या निवडणुकीची चर्चा चांगलीच रंगली असून विविध पक्षाच्या उमेदवारांचे प्रचारासाठी कंबर कसल्याचे दिसून येत आहे.

# रा.स्व.संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक सदाशिव देवधर यांनी केले ‘राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष’ या विशेषांकाचे मुक्तकंठाने कौतुक

## दै.तरुण भारतच्या वतीने करण्यात आले प्रकाशित

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.२८ नोव्हेंबर-**

रा.स्व.संघ अर्थात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कारकीर्दीस शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वतीने नुकताच राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. रा.स्व. संघाचे राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव उर्फ सदुभाऊ देवधर यांनी या विशेषांकाचे मुक्तकंठाने कौतुक केले.

दैनिक सोलापूर तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी शुक्रवारी (ता.२८) श्रीक्षेत्र पंढरपूर येथील सदाशिव देवधर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंभर वर्षाच्या कारकिर्दीवर चर्चा झाली. या शंभर वर्षाच्या कार्यकाळातील काही जुन्या आठवणींना श्री.देवधर यांनी उजाळा दिला. राष्ट्रीय स्वयंसवेक संघातील सुरुवातीच्या काळापासून ज्या ज्या ठिकाणी सेवाकार्य करण्याची संधी मिळाली. त्या त्या ठिकाणी त्या त्या काळात ज्या ज्या महान व्यक्तींचा सहवास लाभला. त्या-त्या वेळी आलेले अडचणी आणि त्या त्या अडचणींवर मात करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पाळेमुळे रुजविण्यात आलेले अनुभवही त्यांनी कथन केले.


याप्रसंगी दैनिक सोलापूर तरुण भारतचे विपणन विभागाचे मुख्य प्रबंधक मनोहर बायनी, वितरण विभागाचे प्रमुख नागसेन शिवशरण, पंढरपूर विभागाचे प्रतिनिधी महेश भंडारकवठेकर, दैनिक सोलापूर तरुण भारतचे पंढरपूर येथील एजंट संतोष कुलकर्णी यांच्यासह देवधर परिवार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक उपस्थित होते.

### साधी राहणी अन् संघाविषयीची निष्ठा

रा.स्व.संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव उर्फ सदुभाऊ देवधर यांची अत्यंत साधी राहणी असून केलेल्या कामाबद्दलचा त्यांना कोणताही अहंभाव नाही. या वयात देखील रा.स्व.संघाविषयीची निष्ठा, आत्मियता, प्रेम आणि तल्लखबुध्दी तसेच त्यांच्याकडे असलेला माहिती खजिना अवर्णनीय म्हणावा लागेल.

### नियमितपणे घेत असतात माहिती

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ मार्गदर्शक सदुभाऊ देवधर हे वृध्दापकाळाने आता पंढरपूर येथील निवासस्थानीच वास्तव्यास असतात. तब्येतीच्या कारणामुळे पहिल्यासारखे झोकून देवून कार्य होत नाही. मात्र रा.स्व.संघाच्या रोजच्या घडामोडींची माहिती ते नियमितपणे घेत असतात.



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घेतली आवर्जून भेट

मध्यंतरीच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव देवधर यांना दिल्ली येथे खास निमंत्रण पाठवुन बोलावून घेऊन आवर्जुन त्यांची भेट घेतली होती. या भेटी दरम्यान पंतप्रधानांनी श्री.देवधर यांच्या तब्येतीची विचारपूस करुन त्यांच्या बरोबर विविध विषयांवर चर्चा देखील केलेली होती.

### चरणस्पर्श आणि निमंत्रण

रा.स्व.संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.सदाशिव देवधर हे महनीय व्यक्ती म्हणून गणले जातात. अशा महनीय व्यक्तींच्या भेटीमुळे आपण धन्य झालो, असे सांगत दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी श्री.देवधरांचे चरणस्पर्श करुन दर्शन घेतले. तसेच सोलापूर येथील दैनिक तरुण भारतच्या नवीन कार्यालयास भेट देण्याविषयी आग्रहाचे निमंत्रण दिले.

### विशेषांकाच्या निर्मितीबद्दल धन्यवाद

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपली शंभर वर्षाची वाटचाल पुढच्या वर्षी पूर्ण करीत आहे. त्यानिमित्त दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वतीने राष्ट्रयज्ञ के सौ वर्ष या नावाने विशेषांक काढण्यात आला. सदर विशेषांक श्री.सदाशिव देवधर यांना दिले असता त्यांनी कुतुहलाने पाहणी करुन विशेषांकाच्या निर्मितीबद्दल दैनिक सोलापूर तरुण भारत व्यवस्थापनास धन्यवाद दिले.

### देशभरातील कार्यकर्ते पंढरीत येत असतात

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पार्टी यांसह संघ परिवारातील विविध संस्था-संघटनांचे देशभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते हे ज्येष्ठ मार्गदर्शक सदाशिव देवधर यांच्या पंढरपूर येथील निवासस्थानी भेट घेण्यासाठी आवर्जून येत असतात.

---

## नगरपालिका निवडणुकीची धामधुम

# पक्षप्रमुखांच्या वक्तव्यांविषयीच्या चर्चांना उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील अनगरसह मोहोळ, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मंगळवेढा, करमाळा, अकलूज, मैंदर्गी, दुधनी, सांगोला, कुर्डुवाडी या नगरपालिकांच्या निवडणुकीची धामधुम सुरु आहे. तर दुसरीकडे त्या त्या पक्षसंघटनेचे स्थानिक पातळीवरील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते करीत असलेल्या विविध वक्तव्यांविषयीच्या चर्चांना वाड्यावस्त्यांवरील गप्पांमधून उधाण आले आहे. दैनिक सोलापूर तरुण भारतने सोलापूर जिल्ह्यातील विविध पक्षसंघटनांच्या प्रमुखांना बोलते करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार कालरोजी भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांच्या मुलाखती छापण्यात आल्या. आजरोजी शिवसेना शिंदे गटाचे अमोल शिंदे, शिवसेना उबाठाचे संतोष पाटील, दत्तात्रय गणेशकर यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या.

## दुर्दैवाने प्रमुख लढत ही भाजपसोबतच

**तभा वृत्तसेवा । मकरंद ढोबळे**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नुकताच सोलापूर जिल्हा दौरा झाला. या दौऱ्यामुळे नगरपालिका निवडणुक लढण्यासाठी आम्हाला मोठी ताकद मिळाली आहे. मोहोळ मतदार संघात नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शिवसेना जिंकेल. सांगोला, करमाळा याठिकाणी एकहाती निवडणूक जिंकू. दुधनी हा माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे तीही निवडणूक जिंकू. अक्कलकोटमध्ये जोरदार लढत असली तरी शंभर टक्के निवडणूक आम्हीच जिंकू. काही ठिकाणी आम्ही भाजपबरोबर असलो तरी दुर्दैवाने आमची प्रमुख लढत ही ज्यांचं काम लोकसभेत केलं. त्या भारतीय जनता पार्टीशी आहे. लाडक्या बहिणींचा भाऊ, एकनाथ शिंदे यांनी केलेलं काम हे त्यांच्या लक्षात आहे. एकनाथ शिंदेंचा धाडसीपणा, निर्णय घेण्याची क्षमता या सर्वांचा फायदा शिवसेनेच्या उमेदवाराला होईल, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी सांगितले.

## शिवसेना उबाठाला चांगले वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर -**



मंगळवेढा, बार्शी, मोहोळ, अक्कलकोटमध्ये शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार निवडून येतील. नगरपालिका निवडणुकीमध्ये प्रमुख लढत ही भाजपाबरोबर आहे. बार्शी, कुर्डुवाडी आणि मोहोळ या तीन नगरपंचायतींवर भगवा फडकेल. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला वातावरण चांगले आहे. आमच्या पक्षाचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी व्यक्त केला.

## धनदांडग्या उमेदवारांच्या विरोधात लढाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**



सध्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात वातावरण आहे. अक्कलकोटचा विकास ज्या पध्दतीने व्हायला पाहिजे तसा झाला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठा रोष आहे. त्याचाच फायदा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाला होईल. धनदांडग्या उमेदवारांच्या विरोधात शिवसैनिकांची लढाई आहे. शिवसेना उबाठा पक्षाची प्रमुख लढत ही भारतीय जनता पार्टी बरोबरच आहे, असे शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी सांगितले.

---

सोलापूर तरुण भारत आयोजित

यादी क्रमांक ४

# ‘‘मला हवंय आदर्श सोलापूर ’’

## या विषयावरील निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची यादी...

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | सोम्या सराटी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| २ | आलिया नदाफ | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३ | प्रथमेश कदम | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४ | मधुमाला घोडके | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ५ | कार्तिकी फुलमाळी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ६ | आयुष अंकुशे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ७ | भूषण इंगळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ८ | परिवर्तन मस्के | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ९ | श्रीकाश वलपा | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १० | स्नेहा बिराजदार | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ११ | गौरी गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १२ | योगिराज स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १३ | रूद्र राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १४ | परिक्षित कोरचगाव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १५ | दुर्वा भोसले | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १६ | श्रीनिधी शिंपी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १७ | प्रिया हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १८ | सुहानी तानवडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १९ | ऋतुजा हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २० | यशराज सूर्यवंशी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २१ | जय कापसे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २२ | वरद बडगू | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २३ | रूपेश अवधूत | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २४ | अनिकेत तळभंडारे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| २५ | शाहिश्री शेरखाने | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | भुषण राजकुमार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २७ | शौर्य राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २८ | पृथ्वी पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २९ | असद मुजीद | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३० | राजवीर खांडेकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३१ | अमेय काटकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३२ | सिद्धी जखनाईक | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३३ | यश काकडे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३४ | अथर्व हुक्कीरे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३५ | अथर्व पाटील | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३६ | सार्थक शिंदे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३७ | श्रीनाथ सुरवसे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३८ | श्रेयस नवले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३९ | तेजश्री भोसले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४० | श्रीनिवास कोळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४१ | मेघराज बिराजदार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४२ | विवान राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४३ | देवयानी वाघमोडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४४ | चिन्मय नागुरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४५ | अनुष्का क्षीरसागर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४६ | प्रांजल पाटील | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४७ | प्रज्ञा माने | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४८ | सेजल माळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४९ | नारायणी बाबर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५० | विनायक मोहिते | भारती विद्यापीठ, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | समर्थ राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५२ | आदित्य वाघमोडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५३ | यश मनोरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५४ | अथर्व जाधव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५५ | समर्थ हुळ्ळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५६ | आरूषी कोळी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ५७ | त्रिशा उंबरजे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ५८ | रुतिका तुरूप | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ५९ | अभय शिंदे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६० | सुजित रोडगे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६१ | अनिकेत प्रधान | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६२ | श्रीयश प्रधान | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६३ | संस्कार शेळवणे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६४ | मोहम्मद शेख | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६५ | आर्यन माळी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ६६ | सार्थक राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६७ | प्रणव करकंटी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६८ | आर्यन राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६९ | ईशानी राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७० | आरोही बंडगर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७१ | दुर्वा भोसले | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७२ | श्रीनिधी शिंपी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७३ | प्रिया हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७४ | सुहानी तानवडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७५ | ऋतुजा हांडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ७६ | युवराज कानघट्टी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७७ | श्रेयश मडिवाळ | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७८ | अनुज आरकेल | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ७९ | विवेक केत | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८० | मनोज चौखंडे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८१ | आनंदी बंडगर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८२ | पौर्णिमा भडंगे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८३ | सुमित गायगवळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८४ | माधुरी देशमुख | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८५ | चनबसप्पा स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८६ | पुनम भांडेकर | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ८७ | मानसी शहापुरे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ८८ | रोहन गायकवाड | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ८९ | संध्या पवार | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९० | आलिया इनामदार | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९१ | विद्या कापरे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९२ | दिशा बंदपट्टे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९३ | श्रद्धा पवार | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९४ | तेजस्विनी बंदपट्टे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९५ | तेजस्वी भांडेकर | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९६ | मधु कांबळे | जयभवानी प्रशाला, सोलापूर. |
| ९७ | स्नेहल सूर्यवंशी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९८ | मनोज कानगंटी | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९९ | शिवप्रताप चिणवर | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| १०० | ओम डोळ्ळे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## गाणगापूर येथे ४ डिसेंबरला दत्त जयंती उत्सव

**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

श्रीक्षेत्र गाणगापूर येथे श्री दत्त महाराजांचा जन्मोत्सव तिथीप्रमाणे केला जातो. मार्गशीर्ष चतुर्दशी यंदा श्री क्षेत्र गाणगापूर येथे दत्त जयंती सोहळा ४ डिसेंबर रोजी दुपारी १२:०० वाजता होईल.



दि. ५ डिसेंबर रोजी श्री गुरुदत्त महाराजांचे रथोत्सवाचा कार्यक्रम होणार आहे. दरम्यान, पहाटे २ वाजता काकड आरती व निर्गुण पादुकेला पुजारी मंडळाकडून केशर लेपन १२ वा पाळणा होईल. संध्याकाळी ७:३० महामंगल आरती संपन्न होणार आहे.

उत्सव असल्यामुळे दैनंदिन कार्यक्रमांमध्ये काही बदल राहणार नाही, अशी माहिती दत्त मंदिराचे मुख्य पुजारी उदयकुमार काशिनाथ भट पुजारी यांनी दिली आहे.

# एसटी बसस्थानक प्रमुख उत्तम जोंधळे यांच्यावर निलंबनाची कुऱ्हाड

- **बसस्थानकावरील स्वच्छता करण्याचे ८ दिवसांपूर्वी दिले होते आदेश**
- **आदेश देऊनही कार्यवाही न झाल्याने परिवहन मंत्री सरनाईक यांच्याकडून कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**



मागील आठवड्यात ज्यावेळेस आलो होतो. त्यावेळेस फार भयानक परिस्थिती आढळली होती. अस्वच्छतेचे आगार हे सोलापूर बस स्थानक असल्याचे दिसत होते, शौचालयातून घाणेरडा वास येत होता, पिण्याच्या पाण्यासाठीची अवस्था गंभीर होती. एका आठवड्याची संधी देऊन देखील सुधारणा न केल्याने बस्थानक प्रमुख उत्तम जोंधळे यांना निलंबित केले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बस स्थानक पाहणी वेळी दिली. आठ दिवसांपूर्वी सोलापूर बस स्थानकावर पाहणी करण्यासाठी आलो होतो. प्रत्येक वेळेस अधिकाऱ्यांवर कारवाई करणे योग्य नसल्याने आठ दिवसांची त्यांना संधी दिली होती. शुक्रवारी सोलापूर बसस्थानकावर पाहणी करण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आले असता त्यांना शौचालयाचा घाण वास येत असल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता केलेली होती परंतु पाच नळांपैकी एकच नळ चालू होते. चार नळ बंद अवस्थेत होते. बाकीची जी अवस्था आहे ती जैसे थेच असल्याने नाइलाजास्तव बस स्थानक प्रमुखाला निलंबित करावा लागल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून राज्यातील बस स्थानक चांगली असावेत, स्वच्छ असावीत, लोकांना पिण्यासाठी पाणी मिळावं अशी भूमिका राज्य शासनाची आहे. अधिकाऱ्यांकडून जर योग्य कार्य केले जात नसतील तर अशी कारवाई आम्हाला यापुढे देखील करावी लागेल, असा इशाराही सरनाईक यांनी दिला.

यावेळी जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, माजी आ. राजन साळवी, उपजिल्हा प्रमुख संजय सरवदे, तुकाराम मस्के, मजीद बागवान, वैभव जवळकोटे, शरद काटे, कुमार धुमाळ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**▸ राज्यातील इतर बसस्थानकावर अस्वच्छता आढळल्यास अशीच कारवाई**

सोलापूर बस स्थानकावर ज्या पद्धतीची अस्वच्छता आढळली त्याच पद्धतीची राज्यांमधील इतर बसस्थानकावर अस्वच्छता ठेवण्याचा प्रयत्न बसस्थानक प्रमुखांनी जर केला तर अशी कारवाई आम्हाला करावी लागेल.

**▸ विद्यार्थी वेळेवर घरी पोहोचेली पाहिजे, समस्या असल्यास तक्रार करा**

राज्यातील माझे विद्यार्थी वेळेवर घरी पोहोचले पाहिजेत यासाठी एसटीच्या सुविधा विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना वेळेवर जर सोडू शकत नसू तर हे योग्य नाही. प्रत्येक बस स्थानक प्रमुखांचे फोन नंबर शाळांना दिलेले आहेत. त्या नंबरवर संपर्क साधून तक्रारी कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.




**पार्क चौकातील बस स्टॉप गायब :** पार्क चौकात नव्याने उभारण्यात येत असलेल्या शोरुमचे बांधकाम सुरु आहे. या बांधकामामुळे शोरुमसमोरील महापालिकेचा बस स्टॉप गायब झाला आहे.

# नगरपालिका निवडणूक पार पडल्यावर बोरामणी येथील माळढोकच्या अस्तित्वाचे फेरसर्वेक्षण : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी राज्य शासनाकडून सकारात्मक पुढाकार घेण्यात आला आहे. या परिसरात असलेल्या माळढोकच्या अस्तित्वाचे फेरसर्वेक्षण नगरपालिका निवडणुकीनंतर डेहराडून येथील राष्ट्रीय सर्वेक्षण खात्याकडून करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी आज (दि. २८) माध्यमांशी बोलताना दिली.



राज्य सरकारने सोलापुरातील होटगी रोडवरील विमानतळावरुन प्रवासी विमानसेवा सुरु केली आहे. मात्र याठिकाणी नाईट लँडिंगची सुविधा नसल्याने दिर्घकालीन प्रवासी विमानसेवेत अडचणी निर्माण होत आहेत. इतकेच नाहीतर भविष्यात स्लॉटचीही कमतरता होणार आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून आता बोरामणी येथील नियोजित विमानतळावरुन विमानसेवा सुरु करण्याच्या हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत. बोरामणी येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी यापुर्वी २००५ मध्येच सुमारे दोन हजार एकर जमिनीचे संपादन करण्यात आले आहे. मात्र जमिनीचे संपादन झाल्यानंतर येथील नियोजित विमानतळाच्या रनवे वरच माढळोकच अस्तित्व क्षेत्र असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले. त्यामुळे येथील विमानतळाच्या उभारणीस गेल्या कित्येक वर्षापासून ब्रेक लागला आहे. बोरामणी परिसरात माढळोकचे अस्तित्व कधीच दिसून आले नाही; अशी माहिती येथील स्थानिकांकडून सातत्याने मिळत आहे. त्यामुळे याबाबत राज्य शासनाकडून आता पुन्हा एकदा येथील माढळोकच्या अस्तित्वाचे फेरसर्वेक्षण करण्यास सुरुवात करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी डेहराडून येथील सर्वेक्षण विभागास दिलेल्या पत्रानुसार या विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला आहे. बोरामणी येथे माढळोकच्या अस्तित्वाचे फेरसर्वेक्षण करण्यासाठी पथक तयार असल्याचेही सांगण्यात आले आहे. प्रशासकीय यंत्रणा सध्या निवडणूक कामात व्यस्त असल्याने निवडणुका संपल्यानंतर येथील फेर सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे विमानतळ झाल्यानंतर शेतकरी, उद्योजकांसह जिल्ह्याच्याच विकासाला मोठी चालना मिळणार आहे.




# दर्जात्मक युनिफॉर्मसाठी सोलापूरचे नाव सातासमुद्रापलीकडे जाईल

- **युनिफॉर्म प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी आ.सुभाष देशमुख यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर**

मुंबईतील नेस्को एक्झिबिशन सेंटर आयोजित युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शनाला तीन दिवसात महाराष्ट्रासह अन्य राज्यातील तीन हजार गारमेंट व्यावसायिकांनी भेट दिली असून यात बाराशेहून अधिक इतर राज्यातील गारमेंट व्यावसायिकाचा समावेश होता. या प्रदर्शनासाठी खास परदेशातील दहा ते पंधरा बायर्सनीही भेट दिली. यामुळे दर्जात्मक युनिफॉर्मसाठी सोलापूरचे नाव सातासमुद्रापलीकडे घेतले जाईल असे, प्रतिपादन माजी वस्त्रोद्योगमंत्री व आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनच्या वतीने झालेल्या तीन दिवसीय फेअरच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य माढाचे सीईओ संजीव जयस्वाल, मुख्य वित्त व्यवस्थापक अजय सिंग पवार, फेअर चेअरमन अजय रंगरेज, सचिव श्रीकांत अंबुरे आदी उपस्थित होते. या प्रदर्शनात १५०हून अधिक स्टॉलधारक सहभागी झाले होते. या स्टॉलचे वैशिष्ट्य असे होते की, हॉस्पिटल कार्पोरेट शालेय गणवेश स्पोर्ट्स सेक्युरिटी गार्ड्स हाऊसकीपिंग पर्यंतचे सर्व युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शनात होते. याबरोबरच ब्लेझर टाय शूज व सर्व पोशाखाना लागणाऱ्या आकर्षक प्रकारच्या बॅचचा प्रदर्शनात समावेश होता. प्रत्येक युनिफॉर्म गारमेंट स्टॉलला २०० ते ६०० व्यापाऱ्यांनी भेट दिली. त्यामुळे प्रत्येकाला काम व्यवसाय भरघोस मिळेल, अशी अपेक्षा व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. कारण सोलापुरातील युनिफॉर्मचे कमी दर व दर्जात्मक कपडे तसेच मागील प्रदर्शनामुळे देखील या गारमेंट फेअरला प्रचंड प्रतिसाद मिळाला. प्रास्ताविक फेअर चेअरमन अजय रंगरेज यांनी केले. श्रीकांत अंबुरे यांनी आभार मानले. अमित जैन व प्रकाश पवार यांनी सूत्रसंचालन केले.

# सोलापूरच्या 'आयटी पार्क'साठी राज्य सरकारकडून हालचाली वाढल्या

## एमआयडीसीकडून एचपीसीकडे प्रस्ताव गेला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

आयटीपार्कचे सोलापूरकरांचे स्वप्न आता लवकरच साकार होणार असून, त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव एमआयडीसीच्या सीओंनी राज्य शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे पाठविला असून, या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर लवकरच बांधकाम पूर्ण होऊन आयटी पार्क सुरु होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २८) माध्यमांशी बोलताना दिली.

दरम्यान, यामुळे आता येत्या काही दिवसात उच्चस्तरीय समितीची बैठक होवून हा विषय लवकरच मार्गी लागणार असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले. म्हणजेच आता सोलापूरच्या आयटी पार्कसाठी राज्य सरकारकडून हालचाली वाढल्याचेच दिसून येते. गेल्या काही वर्षांपासून सोलापुरात आयटी पार्क सुरु करण्याची वारंवार मागणी होत होती. मागील तीन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयटी पार्कसाठी जागेचा शोध घेऊन प्रस्ताव पाठविण्याचा आदेश जिल्हा प्रशासनाला दिला होता. त्यानुसार हिरज, कुंभारी, जुनी मिल, होटगी येथील जागेची पाहणी करण्यात आली. यात होटगी येथील जागा निश्चित करण्यात आली आहे. होटगी येथे जलसंपदा विभागाच्या मालकीची ५० एकर जागा ही लॉजिस्टिक पार्कसाठी देण्यात आली असून, आता तीच जागा आयटी पार्कसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

जागेसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये जलसंपदा विभागाला एमआयडीसी विभागाकडून दिले जाणार आहे. अतंर्गत रस्ते, दिवाबत्ती, पाणी आदी मुलभूत सुविधांसाठी सुमारे ३७ ते ३८ कोटी रुपये लागणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**आयटीपार्कसाठी येणारे अडथळेही केले दूर**

होटगी रोडवरील सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा सध्या २० केपीएलडी क्षमतेचा डिस्टीलरी प्रकल्प असून, त्यांचा हा प्रकल्प येत्या वर्षभरात १०० केपीएलडी क्षमतेचा होणार आहे. यात झीरो लिक्वीड डिस्चार्ज (झेएलडी) तंत्राचा वापर केल्याने मळीचा वास हा शुन्यावर येणार आहे. विमानतळावरुन उडणाऱ्या विमानसेवेच्या फनेलमध्ये प्रस्तावित आयटी पार्क इमारतीचा समावेश होत नाही. ५० मीटर उंचीपर्यंत बांधकाम करता येते. याबाबत होटगी रोडवरील विमानतळ प्रशासनाचा अभिप्राय घेण्यात आला आहे. तसेच होटगी येथील प्रस्तावित आयटी पार्क जागेच्या ५० एकरावर सुमारे ४० ते ४५ हजार जण बसून काम करतील इतकी क्षमता असल्याचेही आशीर्वाद यांनी सांगितले. तसेच पुण्याच्या हिंजवडीपेक्षा अर्ध्या किंमतीने स्वस्तात होटगी येथे जागा उपलब्ध होणार आहे. यामुळे आता आयटी पार्कचे सोलापूरकरांचे स्वप्नही लवकरच साकार होणार आहे.



# सामाजिक शांतता भंग करणाऱ्या उमेश पाटलांवर कारवाई करा


**मोहोळ भाजपाच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षकांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

गेल्या काही दिवसापासून मोहोळ तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक शांतता भंग करित असलेल्या तसेच कोणतेही ठोस पुरावे नसताना तालुक्यातील जेष्ठ नेत्यांना हेतू पुरस्सर बदनाम करण्याचा घाट घातलेल्या राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, यासाठी मोहोळ भाजपाच्या वतीने जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तालुक्यात सातत्याने प्रक्षोभक भाषणे करणे, तालुक्यातील नेत्यांवर बिनबुडाचे आरोप करणे, कोणतेही पुरावे नसताना जुनी प्रकरणे काढून एकाच परिवाराला सातत्याने टार्गेट करणे, विनाकारण वादग्रस्त वक्तव्य करुन मोहोळ तालुक्यातील सामाजिक सलोखा आणि शांतता बिघडविण्याचे काम पाटील करित आहेत. त्यामुळे तालुक्यातील सामाजिक सलोखा सातत्याने बिघडत चालला आहे.विनाकारण समाजात तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे अशी बेताल वक्तव्य करणाऱ्या पाटील यांचा तातडीने बंदोबस्त करावा आणि संबधितावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.

यावेळी प्रकाश चवरे, दिपक माळी, भरत सुतकर, ज्ञानेश्वर चव्हाण, धनाजी गावडे, प्रशांत बचुटे, शशिकांत पाटील, शिवाजी चव्हाण, रामराजे कदम, विजयकुमार पोतदार यांच्यासह आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२८१

**हां हो नवल नोहे देशी । म-हाटी बोलिजे तरी ऐसी ।**
**वाणें उमटताहे आकाशीं । साहित्य रंगाचे ॥**

भाषा हे एक संवादाचे महत्वाचे माध्यम आहे. विषयांची, विचाराची देवाण-घेवाण प्रामुख्याने भाषेतूनच केली जाते. माणसाला कितीही भाषा येत असल्या तरीही त्याचे खरे प्रेम त्याच्या मातृभाषेवर असते. असे नि:स्वार्थ प्रेम मातृभाषेवर असायलाही पाहिजे. माऊलींच्या तोंडून बाहेर पडत असलेली मराठी भाषा ही केवळ श्रोत्यांच्या काना-डोक्यातच शिरते असे नाही तर त्यांची रसाळ भाषा श्रोत्यांच्या हदयात स्थान करुन राहते आहे. माऊलींचे मराठी भाषेवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. कारण त्यांचे मातृभाषेवरील प्रेम मी तोकडया शब्दात व्यक्त करणे म्हणजे त्यांच्या मातृभाषेवरील प्रेमाला संकुचित केल्यासारखे होणार आहे. तरीपण मी एवढं मात्र निश्चित म्हणेणं की, मातृभाषेवर प्रेम असावं ते माऊलीसारखं आपण, आपली मातृभाषेवरील प्रेमाची चाचपणी करुन घ्यावी. या चाचपणी अंती आपल्या लक्षात येईल की, आपण या प्रेमात कमी पडत आहोत. माऊलींच्या तोंडून भगवतगीतेचे वर्णन मराठी भाषेत ऐकत असतांना, श्रोत्यांच्या आनंदाला मर्यादा राहीली नाही. त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडत आहेत. ते असे आहेत, हां हो नवल नोहे देशी । म-हाटी बोलिजे तरी ऐसी । वाणें उमटताहे आकाशीं । साहित्य रंगाचे ॥ माऊलींच्या तोंडून अर्जुनाचे वर्णन ऐकल्यानंतर श्रोते म्हणाले, केवढे हे आमचे सौभाग्य! या वर्णनात माऊलींनी एकापेक्षा एक सुंदर शब्दांची रचना करुन व्याख्यानाला विलक्षण शोभा आणली आहे. या बोलण्यातील मनोहर रंग नादब्रम्हासही जिंकुन टाकत आहेत. या शब्दांच्या गोडीने सप्तसुरावरही मात केली आहे. मराठी इतकी सुंदर बोलली जाऊ शकते यावर विश्वास बसत नाही. या मराठी भाषेच्या आकाशात रसालंकाराच्या रंगाचे नानाप्रकार स्पष्ट दिसत आहेत. अद्वैताचे महान तत्वज्ञान सांगण्यास ही भाषा समर्थ आहे. या भाषेने ज्ञानाचे ईतके स्वच्छ आणि सुंदर चांदणे पाडले आहे की, ज्यात गुढ भावार्थाची शीतलता निर्माण झाली आहे. हिच्या प्रकाशाने गीतेची श्लोकार्थारुपी चंद्रविकासी कमळे आपोआप उमलत आहेत. मराठी भाषा जर ख-या अर्थाने अनुभवायची असेल तर ज्ञानेश्वरी वाचायला हवी. मराठी भाषेचे सौंदर्य ज्ञानेश्वरीतून ओसंडत आहे. खरेच मातृभाषेवर प्रेम असावे ते माऊलींसारखे. आपल्या मातृभाषेबद्यलचे अनेकांचे ज्ञान पाहिले तर, तुज आहे तुजपाशी । परी तु जागा चुकलाशी ॥ असे म्हणण्यासारखी अवस्था झाल्याचे लक्षात येते. आमची मायबोली आमच्याजवळ असुनही आम्हाला ती समजत नाही. ज्ञानेश्वरी सारखा मातृभाषेचा शब्द रत्नाची खाण असणारा ग्रंथ आमच्या जवळ असुनही आमची भाषा आम्हाला अनुभवता येत नाही. असो, आपण तत्काळ, हदयपुर्वक या ग्रंथाकडे वळू या. आमची मायबोली किती गोड आहे याचा अनुभव घेऊ या. दोन वाक्य बोलले तरी त्यात इतर भाषेचा समावेश करण्याच्या वृत्तीपासुन दूर होऊ या. मम्मी, डैडी, सर या पेक्षा आई, माई, ताई बाबा या शब्दातील गोडवा अनुभवू या. ज्ञानेश्वरी हा केवळ वाचण्याचा, ऐकण्याचा ग्रंथ नसुन तो अनुभवण्याच्या ग्रंथ आहे असे नामदेव महाराज म्हणतात. म्हणुन आपणही संत नामदेवांच्या म्हणण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ या. जय जय राम कृष्ण हरी।. -



**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार
दि. २२ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशीर्ष शु. नवमी
ऋतु - हेमंत
नक्षत्र- रेवती (०७.४०)
योग - परिघ (०७.३५)
करण - तैतिल (२९.०५)
....राहू काल....
शनिवार : स. ९ ते १०.३०

दिनविशेष - १९५९: मराठी इतिहासकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचे निधन.
१९९३: जे. आर. डी. टाटा तथा जहांगीर रतनजी दादाभॉय टाटा यांचे निधन.
२०००: शास्त्रीय गायक गुलाम मुस्तफा खाँ आणि घटमवादक टी. एच. विक्कू विनायक राम यांना उस्ताद हफीज अली खाँ स्मृती पुरस्कार जाहीर.



## शिवस्फूर्ती तरुण मंडळाच्या सभामंडपाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

शिवसेना मुख्यनेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष निधीतून व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या प्रयत्नातून शिवाजी नगर, बाळे, येथे शिवस्फूर्ती तरुण मंडळाच्या सभामंडपाचे भूमिपूजन श्री गणराया व श्री भवानी मातेचे पुजन करून करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, युवकनेते अर्जुन सलगर, महेशजी बोकन, गोविंद जाधव, दादासाहेब जाधव, विकास वाळके, ज्ञानेश्वर लामकान, संतोष शितोळे, आकाश साळुंखे, दिगंबर इंगोले, श्रीकांत नंदुरे, आबा साठे, ओमकार साठे, लामकाने काका, नीलकंठ कोरे, आकाश काशीद, शशिकांत काशीद, संदीप चव्हाण, समर्थ सपाटे, विश्वनाथ वाळके, बटाने काका, रोहन राजपूत, समर्थ पालवे, सुधीर पालवे, अनंत गुरव, जीवन बनगे, संतोष माने, महेश राऊत, बाळासाहेब निळ, प्रसाद बाबर, नवनाथ धाकपाडे, मारुती पिंगळे, हरीश सलगर, मुलानी सर, सुहास कांबळे, संकेत पालवे, अण्णा घाडगे, मुन्ना यादव, साळुंखे मेजर, रमेश रजपूत यांच्यासह माता-भगिनी उपस्थित होते.

# ९० स्मशानभूमी दुरुस्तीसाठी दोन कोटींची गरज

## अतिवृष्टी व महापुरामुळे झाले नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

अतिवृष्टी आणि महापुराच्या पाण्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील ९० स्मशानभुमींचे नुकसान झाले आहे. या स्मशानभुमींच्या दुरुस्तीसाठी दोन कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. तसा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने शासनाकडे पाठविला आहे.

हा निधी जिल्हा परिषदेकडे उपलब्ध नसल्याने शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव पाठविला आहे. शासनाकडून निधी आल्यानंतरच स्मशानभूमीचे दुरुस्तीचे कामे हाती घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



**स्मशानभूमीची तालुकानिहाय संख्या**
अक्कलकोट -२३, करमाळा-११
उत्तर सोलापूर-११, दक्षिण सोलापूर-२६
**एकूण-९०**

**प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे**

अतिवृष्टी व महापुरामुळे जिल्हयातील ९० स्मशानभूमीचे नुकसान झाले आहे. तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. निधी आल्यानंतर स्मशानभूमीची दुरुस्ती करण्यात येईल.

**-सूर्यकांत भुजबळ,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत, जि.प. सोलापूर

## हि.ने. वाचनालयात संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर व ज्येष्ठ संचालक अॅड.धनंजय माने व ग्रंथपाल दत्ता मोरे यांच्या हस्ते संविधानाच्या उद्देशिकेस आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. येळेगावकर यांनी भारतीय संविधान हा पवित्र राष्ट्रीय ग्रंथ असून त्यातील महत्त्वाच्या तरतुदी समजून घेतल्या पाहिजेत. त्यातील मूलभूत हक्क, कर्तव्य यांचे पालन केले पाहिजे. भारतात संविधानिक संस्कृती निर्माण व्हावी संविधान हा केवळ भाषणाचा, लेखांचा विषय न राहता आचरणाचा विषय झाला तर लोककल्याणकारी राज्य निर्माण होऊ शकेल. यावेळी ग्रंथालयातील कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उद्देशिकेचे सामुदायिकपणे वाचन केले.



## राणी कित्तूर चन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालयात संविधान दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

राणी चन्नम्मा शासकीय महिला औद्योगिक महाविद्यालयात आयोजित संविधान दिवस कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी भारतीय स्वतंत्र चळवळीचा इतिहास सांगून भारतीय संविधान निर्मितीवर प्रकाश टाकला.

यावेळी ते म्हणाले, भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असून, हा कायदा राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे आणि भारतीय नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करतो.

घटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता दिले असून प्रत्येकांनी आपल्या देशाचे रक्षण, राष्ट्रीय बंधुत्वाची भावना स्त्री पुरुष समानता, पर्यावरण जतन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सार्वजनिक मालमत्तेचे जतन करणे आपले कर्तव्य आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर व अन्य सदस्यांना स्मरण करण्याचा हा दिवस आहे. यावेळी प्रा. रमेज कंपली, विवेक चंदालिया, प्रा. स्मितांजली दामा, प्रा. पद्मावती नागणसुरे उपस्थित होते.



## पाणी व स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केले आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व जल जीवन मिशन अंतर्गत कर्मचारी यांचे वेतन रखडल्यामुळे व विविध मागण्यांसाठी गुरुवारी राज्यभर काळ्या फिती लावून आंदोलन केले. या आंदोलनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी राज्य कृती समितीचे अध्यक्ष रमांकात जाधव यांनी दिली आहे.

जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत एकत्रित कर्मचारी काम करीत आहेत. या अंतर्गत कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करण्यात आला नाही. शासनात कायम करणेच्या मागणीबरोबर या कर्मचायांचे माहे ऑक्टोबरचे वेतन प्रलंबित आहे, प्रशासकीय खर्चासाठी निधी नाही. यामुळे कामावर परिणाम झाला आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. कृती समितीचे कार्याध्यक्ष जाधव यांनी विभागाच्या या धोरणाचा निषेध केला.

जिल्हा स्तरावर काम करणाऱ्या सल्लागारांचे वेतन वेळेवर होत नाही. यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झाली. यामुळे राज्यभर आंदोलन करणेत आले आहे. राज्यस्तरावर निधी उपलब्ध असूनही वेतनासाठी निधी वेळेत मिळत नाहीत. एसएनए स्पर्श प्रणालीद्वारे दिला जाणार निधी जमा होणेस २० दिवसापेक्षा अधिक कालावधी लागतो. या सर्व प्रक्रियेचा परिणाम कामावर होत आहे. या सर्व बाबींचा विचार करता वेळेत निधी उपलब्ध करून देणेत यावा, अशी मागणी करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात २७ नोव्हेंबर रोजी या घटनेला निषेध म्हणून काळ्या फिती लावून काम करण्याचा निर्णय राज्य कृती समितीने घेतला आहे. जलजीवन मिशन अंतर्गत कर्मचारी यांना दर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कायम टांगती तलवार आहे. तसेच स्वच्छ भारत मिशनची कामे ग्रामपंचातीच्या १५वा वित्त आयोगाच्या निधीशी लिंक केल्यामुळे देखील कामावर परिणाम झालेला आहे. असेही, कार्याध्यक्ष जाधव यांनी सांगितले. वेळेत वेतन न झाल्यास दिनांक १ डिसेंबरपासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा देणेत आला आहे.

# स्पर्श प्रणालीद्वारे कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा होणार वेतन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत हजारो कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुरळीतपणा व पारदर्शकपणा येण्यासाठी शासनाने 'स्पर्श' ऑनलाइन वेतन प्रणाली वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अवेळी व उशिरा होणारे वेतन आता कर्मचाऱ्यांच्या थेट खात्यावर जमा होणार आहे. ही प्रक्रिया जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे. जिल्हा कोषागार कार्यालयातून मुंबईच्या कार्यालयात गेल्यानंतर तेथून दिल्लीच्या कार्यालयात माहिती जाते, त्यानंतर वेतन जमा होते.

दरम्यान, राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत नवीन ई-स्पर्श संगणक प्रणाली कार्यरत करण्याची कार्यवाही राज्यस्तरावरून सुरू करण्यात आली आहे. त्यासासठी कर्मचाऱ्यांची माहिती व बँकेचे तपशील भरण्याचे काम सुरू झाले आहे.

दिवाळीच्या काळात वेतन वितरणास विलंब झाला होता. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी आंदोलने, निवेदन व मोर्चे काढून वेतन वेळेवर करण्याची मागणी आरोग्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानंतर आरोग्य विभागाने दिवाळीनंतर ऑक्टोबरपर्यंतचे वेतन जमा केल्याचे संघटनेने सांगितले.

**प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेला होणार वेतन**

शासनाने आता ई-स्पर्श ऑनलाइन प्रणालीतून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत जमा होणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. सुरुवातीच्या काळात थोड्या तांत्रिक अडचणी येत आहेत, त्या लवकरच दूर होतील. त्यानंतर प्रत्येक महिन्याला वेळेवर वेतन जमा होईल.

**- डॉ.रोहन वायचळ,** कर्मचारी संघटना प्रमुख

# 'युजीसी'च्या नियमांचे उल्लंघन करणारा शासन निर्णय रद्द करा

## सुटाची मागणी : अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांना सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) च्यावतीने प्राध्यापक भरती संबंधित ६ ऑक्टोबर २०२५ चा शासन निर्णय रद्द करण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

युजीसी नवी दिल्लीच्या १८ जुलै २०१८च्या रेग्युलेशन्समध्ये सहाय्यक प्राध्यापक भरतीसाठी निकष राज्यशासनाने ८ मार्च २०१९ रोजी लागू केले होते. मात्र, शासनाने ६ ऑक्टोबर २०२५ रोजी नवीन शासन निर्णय लागू केला. 'सुटा''च्या मते, हा नवीन शासन निर्णय 'युजीसी'च्या नियमांचे उल्लंघन करणारा आणि अन्यायकारक आहे. या निर्णयामुळे उच्चशिक्षित तरुणांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या शासन निर्णयामध्ये मुलाखतीतील कामगिरीला केवळ २५% वेटेज देण्यात आले असून, उमेदवारांच्या पदवीला ७५% वेटेज देण्यात आले आहे. तसेच, विद्यापीठांच्या स्थानानुसार पदव्यांमध्ये भेदभाव केला गेला आहे, ज्यामुळे बहुतांश पात्र उमेदवारांच्या संधी नाकारल्या जाणार आहेत. सुटाचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे आणि कार्यवाह भगवान अदटराव यांनी हा बेकायदेशीर व अन्यायकारक निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



# क्रीडामंत्री; आता सन्मान नको, नोकरीची गरज

## दृष्टी केवळ डोळ्यांची नाही, तर आत्मविश्वासाची असते. ती जिथे-जिथे गेली तिथे-तिथे विजय मिळवूनच आली. ती आहे सोलापुरची गंगा संभाजी कदम





श्रीलंकेतील कोलंबो येथे नुकत्याच झालेल्या अंध महिलांच्या पहिल्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत तिने भारताचे प्रतिनिधित्व केले. फक्त प्रतिनिधीत्वच नाही तर भारतीय संघाच्या उपकर्णधार पदाचीही जबाबदारी सांभाळीत भारतीय संघाला विश्वविजेते मिळवून देण्यात तिने सिंहाचा वाटा उचलला. भारतीय क्रिकेट संघातील गंगा ही महाराष्ट्रातील एकमेव क्रिकेटपटू आहे. तिच्या या कामगिरीमूळे सोलापूरच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तूरा रोवला गेला आहे. या विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, अमेरीका, पाकिस्तान, श्रीलंका व नेपाळ या ७ देशांचे संघ सहभागी झाले होते.

तिने संपुर्ण स्पर्धेत भेदक गोलंदाजी करताना ६ सामन्यात १३ षटकात ३ गडी बाद केले व केवळ ३५धावा दिल्या. चपळाईने क्षेत्ररक्षण करत तिने ६ गडी धावबाद केले. श्रीलंकेविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात ती सामनावीर ठरली. यात तिने पाच खेळाडू धावबाद केले तर एका षटकात एक धावात एक बळी टिपला. ऑस्ट्रेलिया विरुध्दच्या उपांत्य सामन्यात तिने सलामीला फफलंदाजी करताना ३१ चेंडुत ३ चौकारांच्या मदतीने नाबाद ४१ धावा काढल्या.

ऑगस्ट २०२३ मध्ये इग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे झालेल्या क्रिकेट स्पर्धेतही भारतीय संघाने सुवर्णपदक जिंकले होते. त्या संघातही ती सहभागी होती. त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडे वारंवार हेलपाटे घालून, पत्रव्यवहार करुन आजतागायत कोणताही सन्मान, मदत अथवा शासकीय सेवेत नोकरीही मिळाली नाही. यासाठी तिने मंत्रालयाचे उंबरे झिजवले तसेच विविध मंत्रीमहोदयांची भेट घेऊनही तिझ्या पदरी केवळ कोरड्या आश्वासनाचे दान पडले. तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच क्रीडा मंत्री यांना पत्रव्यवहार करून साधी भेटही मिळाली नाही. क्रिकेट असोसिएशन फॉर दी ब्लाईंड ऑफ महाराष्ट्र यांचेकडुन याबाबत पत्र देऊनही अद्याप कोणताही सकारात्मक प्रतिसाद शासनाकडून मिळाला नाही.

कोलंबोहुन भारतीय महिला संघ दिल्लीला आल्यावर या संघाचे गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी व लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी त्यांचे स्वागत व कौतुक केले. सोशल मीडियावरही अभिनंदनचा वर्षाव होत आहे. परंतु केंद्र व राज्य शासनाकडून अद्याप कोणतीही मदत जाहीर झाली नाही. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ७ ऑक्टोबर २०२४रोजी महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या निर्णयानुसार, जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या खेळाडू व त्यांच्या प्रशिक्षकांना रोख पारितोषिक देण्याची तरतूद स्पष्टपणे नमूद आहे. तसेच शासकीय सेवेत प्रथम श्रेणीची थेट नियुक्ती देण्याचा शासन निर्णयही अस्तित्वात आहे.

शेजारील कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री यांनी विश्वचषक विजेत्या भारतीय संघाची भेट घेत कर्नाटकातील खेळाडुंना शासकीय नोकरी दिली व त्यांना मोठ्या प्रमाणावर सन्मान निधी दिला. त्याच बरोबर या संघातील सर्व खेळाडूंना प्रत्येकी दोन लाख रुपये दिले. परंतू अद्यापपर्यंततरी महाराष्ट्र शासनाकडून अशी कोणतीही मदत अथवा सन्मानासाठी आमंत्रण नाही.

गंगाच्या कुटुंबात ८ बहिणी व १ भाऊ असा परिवार आहे. १६ मे २०२५ रोजी तिच्या वडिलांचे निधन झाले. घरात सध्या वयोवृध्द आई, शिक्षण घेणारी एक बहिण व छोटा भाऊ आहे. वडील शेतमजूर होते. आता तिच्या परिवाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. घरात ती मोठी असल्याने संपुर्ण कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर आली आहे.

घरची अतिशय हलाकीची परिस्थिती असताना ८ बहिणींमध्ये अंध असताना गंगाने परिस्थितीशी योग्य लढा देऊन हे यश प्राप्त केले. मुंबई येथील कीर्ती कॉलेजमध्ये बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर एम.ए.राज्यशास्त्र ही पदव्युत्तर पदवीही तिने पूर्ण केली. चार आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा खेळूनही ती शासकीय नोकरीच्या शोधात आहे. त्यासाठी ती एम.पी.एस.सी.ची तयारी करीत आहे. या विश्वचषक विजयानंतर तरी दिव्या कदम हिने केलेल्या मेहनतीचा व आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या यशाचा सन्मान म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व क्रीडामंत्री हे दिव्यांग या खेळाडुचा सन्मान, मदत अथवा शासकीय सेवेत नोकरी देऊन मदत करतील का?




**खेळाडू आणि खेळांमध्ये दुजाभाव नको**

नोव्हेंबर २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भारतीय महिला क्रिकेट संघातील महाराष्ट्रातील तिघीना प्रत्येकी २.२५ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर करून तत्काळ प्रदान केले. याशिवाय मुख्य प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफफलाही भरीव बक्षिसे दिली. याआधी बुद्धिबळातील विश्वविजेत्या दिव्या देशमुखलाही राज्य सरकारने ३ कोटी रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मानित केले होते. दहा महिने उलटले तरी, खो-खो विश्वविजेते ८ खेळाडू त्यांच्या बक्षिसाच्या रक्कम मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत. खोखो प्रमाणे दिव्यांग क्रिकेटपटू दिव्या कदमही यापासूनही वंचित राहू नये याची काळजी राज्य शासनाच्या क्रीडा खात्याने घ्यावी. अन्यथा 'खेळाडू आणि खेळांमध्ये सरकार दुजाभाव करत आहे का?' अशी भावना क्रीडाप्रेमीमध्ये होईल.

# अखेर ‘त्या’ १६ गावांच्या उपसा सिंचन सर्व्हेचे निघाले टेंडर

## माजी खासदार निंबाळकर यांनी शब्द खरा केला; शेतकऱ्यांतून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२८ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या १६ गावांनाही मंजूर झालेल्या उपसा सिंचन योजनेतील शिंगोर्णी, बचेरी, सुळेवाडी, जळभावी, गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, तरंगफळ, फडतरी, लोंढे मोहितेवाडी, कोथळे, काळमवाडी, कोळेगाव, पिलीव व चांदापुरी या १६ गावांना लाभ मिळवून देण्यासाठी प्लॅन व इस्टिमेट तयार करण्यासाठीच्या त्या सर्वेसाठी शासनाने ७५ लाख ७४ हजार रुपयाची मंजुरी दिली आहे. त्याप्रमाणे दि. २४ नोव्हेंबरला टेंडर प्रसिद्ध करण्यात आले आहे. दि. २० नोव्हेंबर २०२५ च्या कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग व महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळाच्या लेखी पत्रानुसार प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सदरची मंजुरी महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग कार्यकारी अभियंता निरादेवधर प्रकल्प विभाग व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ जलसंपदा विभागाकडून सदरचे टेंडर प्रसिद्ध करण्यात आले आहे. यामुळे माळशिरस तालुक्यातील नव्याने समाविष्ट करण्यात





आलेल्या शिंगोर्णी ते चांदापुरी पर्यंतच्या या वंचित सोळा गावांना ‘संकल्प दुष्काळमुक्त माळशिरस तालुका’ या ध्येयधोरणाप्रमाणे प्रेरित झालेले माजी खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, जलसंपदा मंत्री,सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार रामभाऊ सातपुते व केंद्र शासनाच्या जलसंपदा विभागाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले असल्याचे भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे यांनी सांगितले. श्री. पुकळे यांनी माळशिरस तालुक्यातील या वंचित गावांना निरा देवधर प्रकल्पाचे पाणी मिळावे म्हणून विविध प्रकारे संबंधित खात्याच्या मंत्र्याकडे कृष्णा खोरे विकास महामंडळ कार्यकारी मंडळाकडे, खासदारांच्या व आमदारांच्या माध्यमातून व जनतेच्या पाठिंब्यावर व जनतेशी संपर्क साधून या गावांचा समावेश व्हावा म्हणून सातत्याने त्यांनी पाठपुरावा करून प्रयत्न केले होते. त्यांच्या या प्रयत्नाला व पाठपुराव्याला यश मिळताना दिसत असून या वंचित गावातून शेतकरी व ग्रामस्थातून समाधान व्यक्त केले जात आहे. श्री. पुकळे यांना नागरिक, शेतकरी धन्यवाद देताना दिसत आहेत. या वंचित सोळा गावांना निरा देवधर प्रकल्पाचे पाणी मिळेपर्यंत पाठपुरावा करून प्रयत्नशील राहणार असल्याचे श्री. पुकळे यांनी यावेळी ठामपणे व खात्रीपूर्वक सांगितले.

## महत्वाचे...



### श्री शंकरलिंग प्रशालेत महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी

**वळसंग, दि. २८ नोव्हेंबर -**

वळसंग ( ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी संपन्न झाला. सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य विरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. पूजनानंतर संस्कृती हंजगे व लक्ष्मी सद्दलगी यांनी आपल्या भाषणातून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याविषयी माहिती सांगितले.सदर दोन्ही विद्यार्थीनींना लेखन साहित्य देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैराम डगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी,मल्लिनाथ गौडगाव,प्रा. संतोष शिंदे, प्रा.शरणय्या मसुती, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी,कर्मचारी कट्टेप्पा कोळी , विनोद दुधगी, सुनिता कुर्ले आदींचे सहकार्य लाभले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.



### मोडनिंब येथील शिबिरात ८० जणांचे रक्तदान

**मोडनिंब, दि.२८ नोव्हेंबर-**

मोंडनिंब (ता. माढा) येथे २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ तसेच हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगलमूर्ती बहुउद्देशीय सामाजिक संस्था व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण ८० जणांनी रक्तदान करून समाजकार्यात मोलाचे योगदान दिले.सध्याच्या परिस्थितीत रक्ताची आवश्यकता ओळखून शिबिराचे आयोजन केल्याची माहिती गटप्रमुख दीपक सुर्वे यांनी दिली.थंडीच्या दिवसांत रक्ताचा तुटवडा जाणवत असताना आयोजित करण्यात आलेले हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले. स्थानिक नागरिकांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सदर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, माजी सरपंच बाबूराव सुर्वे,किरण तोडकरी, शेतकरी संघटनेचे एकनाथ सुर्वे, रोटरी क्लबचे अध्यक्ष निलेश गिड्डे, डॉ. प्रशांत कोल्हे, चंद्रकांत गिड्डे, चांगदेव वरवडे, किरण खडके, नितीन गडधरे, लक्ष्मिकांत खंदारे, भाजपाचे गणेश सुर्वे,विशाल पाटील यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, शिवसैनिक आदी उपस्थित होते.




### स्वमग्न, गतिमंद व बौध्दिक अक्षम मुलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण शिबीर

**सोलापूर, दि. २८ नोव्हेंबर-**

विशेष मुलांच्या कौशल्यांना योग्य दिशा मिळाल्यास ते समाजात समर्थपणे उभे राहू शकतात. अशा प्रशिक्षण शिबिरांमुळे मुलांच्या स्वावलंबन क्षमतेत वाढ होते, त्यांच्या सामाजिक समावेशनाला चालना मिळते, विविध कौशल्य विकसित करण्याची संधी मिळते आणि मुलांचा आत्मविश्वास दुणावतो. परिणामी पालकांचा मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक बनतो व भविष्यात रोजगार किंवा उदरनिर्वाहाच्या संधी उपलब्ध होतात. अशा शिबिरांच्या माध्यमातून सामाजिक बदल घडत असेल, तर फॅमिली प्लॅनिंग सदैव या मुलांच्या पाठीशी राहील, असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. त्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित जेंडर अँड एम्पॉवरमेंट कार्यक्रमांतर्गत आणि व्ही-एक्सेल एज्युकेशनल ट्रस्ट, सोलापूर युनिट ऑफ श्रृंगेरी शारदा पीठम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वमग्न, गतिमंद व बौद्धिक अक्षम मुलांसाठी तसेच त्यांच्या शिक्षकांसाठी चार दिवसीय व्यवसाय प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्ही-एक्सेल एज्युकेशनल ट्रस्ट, सोलापूरच्या सेंटर प्रमुख सुनीता वैद्य या होत्या. व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, प्रशिक्षिका श्रीमती लक्ष्मी कुर्लेकर, परिचारिका आशालता मस्के, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले, अशा प्रकारचे व्यवसाय प्रशिक्षण शिबिर हे केवळ चार दिवसांचे उपक्रम नसून विशेष मुलांच्या स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सामाजिक समावेशनाकडे नेणारे महत्त्वाचे पाऊल आहे. योग्य दिशादर्शन मिळाल्यास ही मुले समाजात सक्षमपणे आणि सन्मानाने जीवन जगू शकतात. विजापूर रोड, इंदिरानगर येथील स्व. सौ. शकुंतलादेवी पुरुषोत्तम बलदवा स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रात आयोजित या चार दिवसीय शिबिरात मुलांना गणपती, पर्स, कागदी व कापडी पिशव्या, उदबत्ती, मेणबत्ती, सेंट, फिनेल, कात्याच्या व कापडी पायपुसणी, इमिटेशन ज्वेलरी, फुलदाणी व शॅम्पू तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती डॉ. एन. बी. तेली यांनी दिली. अध्यक्षीय समारोप सुनीता वैद्य यांनी केला. कार्यक्रमाचे स्वागत सुगतरत्न गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. विजया महाजन यांनी केले. सूत्रसंचालन रजनी बहिरट यांनी केले तर आभार प्रदर्शन अश्विनी चिमलगी यांनी मानले.

# मतदान कक्षात मोबाईल नेण्यास बंदी : डॉ. सीमा होळकर

## मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ नोव्हेंबर -**

मतदानासाठी निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र (ईपीआयसी ) व्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून, त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येईल, अशी माहिती, निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. ज्यांच्याकडे मतदार ओळखपत्र आहे, असे मतदार मतदान केंद्रावर आपली ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करतील. मतदार ओळखपत्र नसणाऱ्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. भारतीय पारपत्र (पासपोर्ट), आधार ओळखपत्र, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), आयकर विभागाकडील पॅन कार्ड, केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहीत दिलेली ओळखपत्रे , राष्ट्रीयकृत बँक अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, राष्ट्रीयकृत बँक अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची फोटो असलेले दस्तावेज अथवा पासबुक, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड असे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक मुळ पुरावा सोबत घेवून जाणे आवश्यक आहे. तसेच मतदान कक्षात मोबाईल नेण्यास बंदी असेल.

# बार्शीत २ ते ५ डिसेंबर होणार संगीत महोत्सव

## ‘दत्त जयंती व पं. जळगावकर जन्मशताब्दीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि.२८ नोव्हेंबर-**

बाशी येथील श्री दत्त गायन समाज व पं. आप्पासाहेब जळगावकर हार्मोनियम फांउडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २,३ व ४ डिसेंबर असे तीन दिवस सायंकाळी ५.३० वाजता बार्शीच्या ढगेमळा मातृमंदिर सभागृहात श्री दत्त जयंती जन्मोत्सव व पं. आप्पासाहेब जळगावकर जन्म शताब्दी संगीत महोत्सव’ होणार आहे.



बार्शी येथील श्री दत्त गायन समाज या संगीत संस्थेस शतकाची परंपरा आहे. दरवर्षी श्री दत्त जयंतीचे औचित्य साधून अनेक दिग्गज कलावंतांनी या संस्थेत आपल्या गायन वादनाची सेवा केलेली आहे. या संगीत संस्थेचा मूळ हेतू म्हणजे बुजुर्ग कलावंतांचे गायन वादन ऐकायला मिळावे, नवोदित कलावंतांना व्यासपीठ मिळावे तसेच संगीत अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना कलावंतांचा सहवास व मार्गदर्शन मिळावे असा आहे. शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी संस्था कार्यरत आहे. यावर्षीही हा सोहळा संस्मरणीय व्हावा यासाठी विख्यात कलावतांना निमंत्रित करण्यात आले आहे. मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी बार्शी येथील स्थानिक कलाकारांचा कार्यक्रम होणार आहे.

३ डिसेंबर रोजी सायं ५.३० वाजता संजय भावे (पुणे) यांचे सॅक्सोफोन वादन, कौमुदी रास्ते-कुलकर्णी (पुणे) हार्मोनियम वादन, भाग्यश्री देशपांडे ( मुंबई) सुश्राव्य गायन, संतोष अत्रे पुणे( हार्मोनियम वादन) तर साथ संगत तबल्यावर सोमेश्वर काळगे (पुणे), हार्मोनियमवर संतोष अत्रे यांची आहे. गुरुवार ४ डिसेंबर रोजी अमृत बापट (पुणे) यांचे तबला वादन, डॉ. उपेंद्र सहस्त्रबुध्दे (पुणे) व सुरेश जाधव (बार्शी) यांचे हार्मोनियम सहवादन, पं. उमेश चौधरी (मुंबई) याचे सुश्राव्य गायन तर साथ संगत तबल्यावर पं. माधव मोडक (पुणे), हार्मोनियमवर डॉ. उपेंद्र सहस्त्रबुध्दे यांची आहे. सर्व रसिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य असणार आहे. या संगीत समारोहासाठी सर्व रसिकांसह संगीत साधकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक श्री दत्त गायन समाज बार्शी व पं.आप्पासाहेब जळगावकर हार्मोनियम फांउडेशन यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# कुर्डुवाडीत दोन भावातील लढत रंगतदार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी,दि.२८ नोव्हेंबर -**

एखाद्या चित्रपटामध्ये स्टोरी असावी अशी परिस्थीती सध्या कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूकीत पहावयास मिळत असून सख्खा भाऊ पक्का वैरी या चित्रपटाप्रमाणे प्रभाग क्रमांक चार मध्ये सर्वसाधारण जागेसाठी चक्क दोन चुलतभावात तुल्यबळ लढत होत आहे. यात अपक्ष उमेदवार दोघात तिसरा आता सगळ विसरा याप्रमाणे भाव खावून जातो की काय अशी चर्चा आहे.

कुर्डूवाडी नगरपालिकेची निवडणूक सध्या शहरात चौकचौकात चर्चेचा विषय बनली आहे.सर्वच राजकीय पक्षांनी होम टू होम व रँली काढण्यावर भर दिला असल्याचे दीसते. त्यातच प्रभाग क्रमांक चार मध्ये दोन भावातच झूंपली आहे. सुरवातीस एकला चलो रे चा नारा देत असलेले जेष्ठ नेते संजय टोनपे हे शेवटी माजी आ.संजयमामा शिंदे यांच्या बाजून जात राष्ट्रवादी कॉंग्रेस (अ.प.) पक्षाकडून प्रभाग चार अ मधून निवडणूक रींगणात आहेत. त्यांच्या विरोधात एकेकाळी







संजयमामा शिंदे यांचे कट्टर समर्थक राहीलेले आणी सध्या शिवसेना (ए.शि) पक्षाचे तालुकाप्रमुख माजी नगरसेवक आनंद टोनपे हे दंड थोपटून उभे आहेत. तसा प्रभाग चार म्हणजे टोनपेंचा बालेकील्ला मानला जातो. याच प्रभागात अपक्ष उमेदवार लक्ष्मण पवार हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. मागील निवडणूकीत संजय टोनपे यांनी आनंद टोनपे यांना निवडून आणले. त्यावेळी त्यांच्या बाजूस सध्याचे शिवसेना उबाठा पक्षाचे अजिक्य गव्हाणे हे देखील होते. मात्र यावेळी हे तीघेही वेगवेगळ्या पक्षातून लढत असल्याने या सर्वांच्या मतामध्ये नक्कीच फुट झाली आहे. याचा नेमका कोणाला फटका बसणार हे सांगणे कठीण आहे. टोणपेंच्या मतामध्ये विभागणी होवून आपल्याला याचा फायदा होवू शकतो असा लक्ष्मण पवार यांचा समज आहे. दोन सख्खे चुलत भाऊ सख्खा भाऊ पक्का वैरी प्रमाणे लढत असले तरी ही लढत अतीशय तुल्यबळ होणार यात शंका नाही. मात्र दोघात तिसरा आता सगळं विसरा असे म्हणत लक्ष्मण पवार यांच्या काहीशा आशा पल्लवीत झाल्या आहेत. मात्र आनंद टोनपे यांनाही राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाशी केलेल्या युतीचा फायदा तर आ.नारायण पाटील यांच्यामुळे धनगर समाजाची व नगराध्यक्षपदाच्या उमेदवार समिरूनिसा मुलाणी यांच्यामुळे मुस्लिम समाजाची मदत होवू शकते अशी अपेक्षा आहे. माजी आ.संजयमामा शिंदे यांच्यामुळे संजय टोनपे यांचे मनोबल वाढले असून त्यांनी माजी उपनगराध्यक्ष म्हणून चांगले काम केले आहे. प्रभाग ४ अ उबाठा कडून साळवे अनिता मच्छिंद्र तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून पल्लवी कांबळे यांच्यात जोरदार वातावरण तापले आहे.



# नाशिक येथील वृक्षतोडीच्या विरोधात बार्शीच्या वृक्ष संवर्धन समितीचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ नोव्हेंबर-**

नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या तयारी निमित्ताने तपोवन येथील अठराशे मोठी झाडे तोडली जाणार आहेत. ती झाडे तोडू नयेत यासाठी वृक्ष संवर्धन समिती बार्शीमार्फत नायब तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

ज्या वनात तपश्चर्या साधना केली जाते ते वन म्हणजे तपोवन. हिरवळ आणि शांत वातावरणात असलेल्या या तपोवनात श्रीराम आणि लक्ष्मण यांनी देखील काही काळ घालवला असे बोलले जाते. अशा या तपोवनातील झाडे साधूंच्या तात्पुरत्या राहूट्या व तंबू उभारणीसाठी तोडली जाणार आहेत. खरंतर हे साधू तप करण्यासाठी वनात जातात. पक्षांच्या निसर्गाच्या सानिध्यात तपश्चर्या करतात. ते साधू आता कुंभमेळ्यासाठी येत आहेत आणि येथील वन नष्ट करण्याचा प्रशासनाने निर्णय घेतला आहे हा खरच विरोधाभास आहे. त्यामुळे प्रशासनाने तेथील झाडे न तोडता पर्यायी मार्ग काढावा व अठराशे मोठ्या झाडांना जीवनदान द्यावे, अशी विनंती वृक्ष संवर्धन समिती बार्शीच्यावतीने करण्यात आली आहे. कारण तंत्रज्ञानाच्या साह्याने कोणतीही सुविधा आपण क्षणात उभी करु शकतो, परंतु झाडे मोठी होण्यासाठी फार काळ जावा लागतो.

ती गोष्ट सहज शक्य नाही. या मोठ्या झाडांवर असंख्य पक्षांची घरटी आहेत ती नष्ट होणार आहेत. तसेच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती' असे आपल्या संतांनीच सांगितले आहे. त्यामुळे प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन ही वृक्षतोड थांबवावी, असे आवाहन वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी केले. यावेळी राहुल तावरे, महेश बकशेट्टी, बाबासाहेब बारकुल, अभिजीत बोबडे, सचिन शिंदे, संतोष गायकवाड, आनंद धुमाळ, मोहम्मद शेख, वीरेंद्र भंडे, सचिन चव्हाण, अक्षय घोडके, योगेश गाडे, दादा गवळी आदी वृक्षप्रेमी उपस्थित होते.

# पानगावच्या खंडोबा यात्रेत ५१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, २८ दि. नोव्हेंबर -**

बार्शी तालुक्यातील पानगांव येथील खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त खंडोबा यात्रा कमिटी व ग्रामस्थ यांच्यावतीने बुधवार, दि.२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५१ जणांनी रक्तदान केले. हे रक्तदान शिबीर खंडोबा मंदिर परिसरात पार पडले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन नेत्ररोग तज्ञ डॉ. सिंधूताई पडघन व डॉ. दिलीप पडघन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी त्यांनी रक्तदात्यांना जीवनातील रक्तदानाचे महत्व पटवून सांगितले. यावेळी डॉ. संतोष काळे, मेजर आण्णा कापसे, पिंटू नाईकवाडी, आबासाहेब ताटे, दीपक खंदारे, प्रकाश कानगुडे, कपिल चव्हाण, नवनाथ खंदारे, बाबासाहेब देशमुख, बाळासाहेब खंदारे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करुन आपला सहभाग घेतला.

# झरेगावात एकता महिला मंचतर्फे निर्भया पथकाचा मेळावा

**वैराग, दि. २८ नोव्हेंबर-**

झरेगाव (ता. बार्शी) येथील जय हनुमान प्रशालेत एकता महिला मंचच्या वतीने महिलांसाठी आणि प्रशालेतील विद्यार्थीनींसाठी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना व मुलींना कायदेविषयक माहिती देऊन त्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना महिला पोलीस अधिकारी नम्रता गटकूळ यांनी मुलींना विशेष आवाहन केले. त्या म्हणाल्या की, मुलींनी Facebook, Instagram, Whatspp अशा सोशल मीडियाचा वापर कमी करून आपले लक्ष केवळ शिक्षणावर केंद्रित करावे आणि आपले उज्ज्वल करिअर घडवून आई-वडिलांचे नाव मोठे करावे. याव्यतिरिक्त, त्यांनी 'निर्भया' प्रकरणावर सविस्तर माहिती देत विविध कलमांविषयी (कायद्यातील तरतुदींविषयी) मार्गदर्शन केले आणि महिला व मुलींमध्ये प्रभावी जनजागृती निर्माण केली. निर्भया पथकाचे (युनिटचे) बाबासाहेब घाडगे यांनी उपस्थित महिला व मुलींना आत्मविश्वास दिला. त्यांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारची छेडछाड किंवा अडचण आल्यास त्यांनी त्वरित बिनधास्तपणे निर्भया पथकाला फोन करावा, कारण पथक त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे आहे. त्यांनी त्वरित मदतीसाठी ११२ या टोल-फ्री क्रमांकावर किंवा निर्भया पथकाच्या विशेष क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले.

कोणत्याही आमिषाला बळी न पडता पथकाशी संपर्क साधल्यास १००% मदत मिळेल, अशी ग्वाही देत त्यांनी सर्वांचे योग्य मार्गदर्शन केले. यावेळी एकता महिला मंच'च्या शीतल काजळे यांनी सांगितले की, महिला व मुलींवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी मंच नेहमीच अशा उपक्रमांच्या माध्यमातून महिलांना व मुलींना सक्षम करत आहे. तसेच, येत्या काळातही प्रत्येक गावामध्ये असे विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपत मंचचे कार्य सुरू ठेवणार असल्याची ग्वाही त्यांनी या वेळी बोलताना दिली. या कार्यक्रमासाठी निर्भया पथकाचे बाबासाहेब घाडगे, महिला पोलीस नम्रता गटकूळ, पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब महानोर, प्रशालेचे मुख्याध्यापक सुनील शेरखाने, कृष्णा पाटील, तसेच एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच, एकता महिला मंचच्या तालुका प्रमुख कविता दसवंत, तालुका कार्यकारणीच्या रीना गुरव, वसुधा कुंभार, सानिया सय्यद, स्वाती चव्हाण, तसेच झरेगावच्या एकता महिलांच्या प्रमुख लक्ष्मी संकपाळ, उपप्रमुख शीतल संकपाळ, शीतल काजळे, सविता काजळे, सविता दसवंत, अनिता दसवंत, मथुरा दसवंत, आश्विनी कडपे, सरस्वती संकपाळ, निलावती संकपाळ, प्रियांका जगदाळे, छाया पोटभरे, स्मिता संकपाळ, जया संकपाळ, महानंदा संकपाळ, सुनंदा संकपाळ, प्रतीक्षा संकपाळ इत्यादी सदस्य व गावातील अन्य महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार सरिता पाटील यांनी केले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शहीद दिनानिमित्त बार्शी शहर पोलिस ठाण्यात १११ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि.२७ नोव्हेंबर**

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार व सर्वसामान्य नागरिक यांना भावपूर्ण श्रद्धांजली म्हणून बुधवार दि. २६ नोव्हेंबर रोजी बार्शी शहर पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



त्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. अशोक सायकर व पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांचे मार्गदर्शन लाभले. बार्शी शहर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार, पत्रकार, बार्शी शहरातील सर्वसामान्य नागरिक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. एकूण १११ जणांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे.



### महत्त्वाचे

## बार्शी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक कारवाई

**बार्शी, दि.२८ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपालिका सार्वत्रिक निवडणुक शांततेने पार पडावी त्यामध्ये कोणताही अडथळा येऊ नये त्या अनुषंगाने ज्यांच्यावर शरीराविरुध्द गुन्हे दाखल आहेत त्यांच्यावर बार्शी शहर पोलीस ठाणेकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. बार्शी शहर पोलीस ठाणे यांनी नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जुगारबंदी अधिनियम प्रमाणे १२, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमप्रमाणे २१ केसेस करण्यात आल्या आहेत. तसेच जे सतत दारु विकतात त्यांच्याकडून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ९३ प्रमाणे २० जणांकडून उपविभागीय दंडाधिकारी यांचे समक्ष अंतिम बंधपत्र लिहून घेण्यात आले आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये शहरातील मागील पाच वर्षात ज्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत. त्या १५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच उपविभागीय दंडाधिकारी सोलापूर यांनी बार्शीतील राजेंद्र भगवान गायकवाड, (रा. लहुजी चौक, बार्शी), युन्नुस रज्जाक सय्यद (रा. मांगडे चाळ), अक्षय पप्पू भवळ (रा. लहुजी चौक, बार्शी), ओंकार उर्फ तुळ्या किशन पेठाडे (रा.टिळक चौक) यांना पुढील सहा महिन्यांकरीता सोलापूर व धाराशिव जिल्हयातून हद्दपार केले आहे. तरी बार्शी शहरातील सर्व नागरिकांनी निवडणुकच्या दरम्यान भांडणतंटा करु नये. मतदान प्रक्रिया शांततेने पार पाडावी. कोणीही कायदा हातात घेऊ नये, असे प्रशासनातर्फे आवाहन करण्यात येत आहे.



## भीमनगरमधील गणेश बनसोडे याची इंडियन आर्मीमध्ये भरती

**अक्कलकोट, दि.२८ नोव्हेंबर-**

अक्कलकोट शहरातील भिमनगरमधील गणेश बनसोडे याची इंडियन आर्मी मध्ये भरती झाल्याबद्दल अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मिलन कल्याणशेट्टी, प्रभाग क्रमांक चार चे उमेदवार अविनाश मडिखांबे, बबलू कामनूरकर, रिपाइंचे शहर अध्यक्ष अजय मुकणार, प्रणेश बनसोडे, प्रशिक बनसोडे नागेश मडिखांबे नितेश मडिखांबे, सिद्धार्थ मडिखांबे, शुभम मडिखांबे अजय मडिखांबे, बसवराज मडिखांबे आदी उपस्थित होते.



## रक्तदान हे अत्यंत महत्त्वाचे पुण्यकर्म आहे : स्वामी सौम्यानंदजी; ५१ जणांनी केले रक्तदान

**अकलूज, दि.२८ नोव्हेंबर-**

सीमेवरील जवान, शस्त्रक्रिया, अपघात अशा परिस्थितींत रक्तदानामुळे प्राण वाचतात. रक्तदान हे अत्यंत महत्त्वाचे पुण्यकर्म असल्याचे प्रतिपादन माळशिरसच्या वैदिक धर्म संस्थान आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रम चे स्वामी सौम्यानंदजी यांनी केले. शहीदांच्या स्मरणार्थ व संविधान दिनानिमित्त अकलूज पोलीस ठाणे व आर्ट ऑफ लिव्हिंग परीवार अकलूज यांच्यातर्फे अकलूज येथे रक्तदान शिबिराचे उद्घाटन स्वामी सौम्यानंदजी यांच्या हस्ते झाले. शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले. गेल्या १७ वर्षापासून सुरू असलेल्या या शिबिराचे पोलिस निरीक्षक निरज उबाळे यांनी कौतुक केले. रोटरी क्लब अकलूजतर्फे पोलीसांसाठी यावेळी मोफत संपूर्ण आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग शिक्षक हरिभाऊ माने, गोरख डांगे, हेमलता मुळीक, कृषी अधिकारी उदय साळुंखे, राजीव बनकर, विक्रम भोसले, रोटरीचे अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, बबनराव शेंडगे आदी उपस्थित होते. पोलिस शिवकुमार मधभावी, बबलू गाडे यांनी परीश्रम घेतले. प्रा.धनंजय देशमुख यांनी प्रास्ताविक केले. माऊली मुंडफणे यांनी आभार मानले.

# अकलूज नगर परिषदेच्या निवडणुकीत रंगत

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२८ नोव्हेंबर-**

अकलूज नगर परिषदेची निवडणूक अंतिम टप्प्यात आलेली असून यामध्ये प्रमुख तीन पॅनल उभे आहेत. शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी एकत्र येऊन पॅनल उभा केले आहेत.तर भारतीय जनता पार्टी व शिवसेना शिंदे गट यांनी आपले उमेदवार उभे केले आहेत. तर डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडून आपले उमेदवार उभे केले आहेत. त्यांना अकलूज शहर आर पी आय रामदास आठवले गटाची साथ मिळाली आहे.

याशिवाय वंचित बहुजन आघाडी, महाराष्ट्र विकास सेना, काँग्रेस निवडणूक रिंगणात उतरले आहे ही निवडणूक रंगतदार होणार असून कोण होणार नगर परिषदेचा पहिला नगराध्यक्ष व नगरसेवक याची उत्कृता सर्वांना लागून राहिली आहे. नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून पूजा कोतमिरे शरदचंद्र पवार राष्ट्रवादीकडून रेश्मा आडगळे राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून दिव्यांनी रास्ते वंचित बहुजन आघाडी उषा कांबळे महाराष्ट्र विकास सेना सुवर्णा साठे या उमेदवार आहेत मोहिते पाटील शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस कडून प्रचाराचा नारळ माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील खासदार धैर्यशील मोहिते पाटील आमदार उत्तम जानकर किशोर सिंह माने पाटील जयसिंह मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत पाटील वाड्यात शुभारंभ करण्यात आला या पक्षाने घर ते घर असा प्रचार चालू ठेवला आहे प्रचारामध्ये शिवतेसिंह मोहिते पाटील, स्वरुपराणी मोहिते पाटील व नुकतेच राजकारणात पदार्पण केलेले सयाजीराजे मोहिते पाटील याचबरोबर संग्रामसिंह मोहिते पाटील किशोर सिंह माने पाटील यांनीही गाठीभेटी घेऊन प्रचार सुरू ठेवला आहे, तर भाजपकडून नामदार जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला माजी आमदार रामभाऊ सातपुते, शैलेश कोथमिरे, फत्तेसिंह माने पाटील सुजयसिंह माने पाटील हे मैदानात उतरले आहेत. तर डॉक्टर धवलसिंह यांच्याबरोबर पद्मजादेवी मोहिते पाटील, उर्वशीराजे मोहिते पाटील, नंदू केंगार व त्यांचा आरपीआय गट जनसेवा संघटनेचे सर्व कार्यकर्ते प्रचारात आहेत. त्यांचे सर्व उमेदवार सुशिक्षित आहेत त्यांनीही घरोघरी जाऊन प्रचार चालू ठेवला असून कॉर्नर बैठका वर भर दिला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस प्रचारात रंगत वाढत आहे.





निवडणुकीमध्ये जयसिंह मोहिते पाटील यांचे नातू सयाजी राजे त्यांचे पुतणे शिवतेसिंह मोहिते पाटील कीर्ती सिंह माने पाटील निवडणूक लढवीत आहेत तर डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील यांच्या पत्नी उर्वशी राजे या उमेदवार आहेत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष फत्ते सिंह माने पाटील यांच्या भाऊजई ज्योतीदेवी माने पाटील तसेच पुतणे गिरीराज माने पाटील हे निवडणूक रिंगणात आहेत

## उजनी धरणग्रस्तांचे उपोषण तापले

**● नोकरी दिली नाही तर पंपहाऊस ठप्प करण्याचा ग्रामस्थांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२८ नोव्हेंबर-**

माढा तालुक्यातील उजनी (टे) येथील एनटीपीसी पंपहाऊससमोर गेल्या पाच दिवसांपासून धरणग्रस्त शेतकरी उत्तरेश्वर पाटील अमरण उपोषणावर बसले असून त्यांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. कंपनीकडून कामावरून काढून टाकल्याच्या निषेधार्थ त्यांनी सुरू केलेल्या उपोषणाला ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा मिळत असून परिस्थिती चिघळत चालली आहे.




एनटीपीसीने येत्या दोन दिवसांत पाटील यांना पुन्हा रुजू करून घेतले नाही, तर पंपहाऊसचे मुख्य गेटच कुलूपबंद करून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी जाहीरपणे दिला आहे. त्यामुळे एनटीपीसी प्रशासनावर दबाव वाढला आहे. सोलापूर जिल्ह्यातील फताटेवाडी येथे एनटीपीसीचा वीज प्रकल्प असून त्यासाठी लागणारे पाणी उजनी धरणातून उजनी (टे) पंपहाऊसमार्फत पुरवले जाते. १७ ते १९ कर्मचारी या पंपहाऊसवर कार्यरत आहेत. कंपनी सुरू झाल्यापासून उत्तरेश्वर पाटील हेल्पर पदावर काम करत होते. काही महिन्यांपूर्वी त्यांना उजनीहून फताटेवाडी प्रकल्पावर कामासाठी नेण्यात आले. तिथे तीन महिने काम करून घेतल्यानंतर त्यांना पुन्हा उजनी येथे परत बदली देण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. मात्र प्रत्यक्षात बदली न देता थेट कामावरून काढून टाकल्याचा गंभीर आरोप पाटील यांनी केला आहे.

> उजनीत सुरू झालेले हे उपोषण दिवसेंदिवस उग्र होत असून, एनटीपीसी प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास पंपहाऊस ठप्प होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सर्वात गंभीर बाब म्हणजे-पाच दिवसांपासून मुख्य गेटवर उपोषणास बसलेल्या पाटील यांची आतापर्यंत एकाही कंपनी अधिकाऱ्याने विचारपूसही केलेली नाही, अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली. यामुळे ग्रामस्थांत संतापाची लाट आहे. या आंदोलनाच्या ठिकाणी सरपंच सतीश पाटील, उपसरपंच मल्हारी गवळी, अक्षय पाटील, अमोल पाटील, आबा तनपुरे, बाळासाहेब पाटील, नानासाहेब शेळके, जीवन दास, संतोष मेटे, संतोष पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## अकलूजकरांच्या भावनेशी खेळू नका : धवलसिंह मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२८ नोव्हेंबर-**

अकलूज नगर परिषदेची निवडणूक ही जनतेच्या भावनेवर न खेळता विकासाच्या मुद्द्यावर खेळावी असे स्पष्ट आवाहन डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी केले.

अकलूज नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत डॉक्टर धवलसिंह मोहिते-पाटील बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार दिव्यानी रास्ते, उर्वशीराजे मोहिते-पाटील व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आरपीआय रामदास आठवले गटाचे नंदू केंगार, किरण डाहिंजे, नितीन मोरे, अमित मोरे, प्रवीण साळवे व अकलूजकर मतदार उपस्थित होते.



डॉ. धवलसिंह मोहिते पाटील पुढे म्हणाले, पूर्वी अकलूजचा विकास पाहण्यासाठी लोक बाहेरून येत होते. मध्यंतरी हा विकास थांबला. निवडणुकीत मोहिते-पाटलांवर आपले प्रेम आहे ते राहू द्याच पण त्याचबरोबर विकासावरही प्रेम करायला हवे. आणि विकासासाठी लागणारा निधी देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री ज्यांच्याकडे अर्थ खाते आहे ते आपल्याला सक्षम निधी देतील याची खात्री आहे. आपला थांबलेला विकास आम्ही त्यांच्या माध्यमातून करू असेही ते म्हणाले. निधी देण्याची ताकद अजित पवार यांच्यात आपल्याला दिसली असून त्यांच्या मदतीने आपण अकलूजचा कायापालट करू. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षांच्या पॅनलकडे आपल्याला हवे असतात मोहिते-पाटील तर मी स्वतः मोहिते पाटील आहे. या पॅनलच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या आज शिवापुर पेठ, सुतार नेट, रामायण चौक आदी ठिकाणी कॉर्नर सभा झाल्या.

## ढोराळेत बिबट्याचा हल्ला; वासरू ठार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २८ नोव्हेंबर-**

ढोराळे येथील विश्वनाथ भुजंग जाधव यांच्या वस्तीवर बिबट्या सदृश्य हिंस्र प्राण्याने हल्ला करून दीड वर्षाच्या वासरास ठार मारल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री घडली. घटनास्थळी वन विभागाने पाहणी केली असून सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून वैराग भागात बिबट्या किंवा वाघ हे दोन्ही हिंस्र प्राणी वावरत असावेत असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान हिंगणी, सर्जापूर, धामणगाव, इर्ले, सुर्डी या गावातील शिवेवर हिंस्र प्राण्यांचा वावर आढळून आला होता. अनेक ठिकाणी त्यांच्या पायांचे ठसे देखील आढळून आले आहेत. दरम्यान ढोराळे येथील जाधव यांची वस्ती गावापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर आहे. त्यांनी शुक्रवारी रात्री दारातील लिंबाच्या झाडाला वासरू बांधले होते. सकाळी उठल्यानंतर निपचित पडलेले वासरू जवळ जाऊन पाहिले असता मयत असलेले दिसून आले. वासराचा पार्श्वभाग अज्ञात प्राण्याने खाऊन टाकल्याचे दिसले. जाधव यांनी तात्काळ ग्रामपंचायत सदस्य राहुल खरात, अमोल शिंदे यांना फोन करून माहिती दिली. त्यांनी वन विभागाला घटना कळवली. त्यानंतर वन विभागाचे वैराग परिमंडल अधिकारी धनंजय शिदोडकर, वनपाल सचिन पुरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. दरम्यान वन विभागाने हा हल्ला बिबट्या सदृश्य प्राण्याचा असू शकतो असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला असून ग्रामस्थांनी काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. याशिवाय वन विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे वेळोवेळी पालन करावे असेही सुचवले आहे. अवघ्या तीन महिन्यांपूर्वी ढोराळे येथील नेताजी पाटील यांच्या बैलावर वाघाने हल्ला करून त्यास ठार मारले होते. त्यानंतर पुन्हा जाधव यांच्या वासरावर हल्ला करून ठार मारण्याची घटना घडली आहे. यावेळी बिबट्या सदृश्य प्राणी असावा, असा अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे.

## प्रशांत परिचारकांचे विरोधकांना चोख उत्तर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषद निवडणूक भाजपा नगरसेवक व नगराध्यक्ष उमेदवार यांच्या कॉर्नर सभेत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विरोधकांना विकासकामांचा लेखाजोखा सुनावला.

यावेळी प्रभाग १ मधील उमेदवार लखन जन्बू चौगुले, अर्चना शिंदे, प्रभाग दोन मधील उमेदवार मयूर भिंगे, प्रभाग तीन मधील उमेदवार तेजश्री पानकर, श्वेता डोंबे आदी उपस्थित होते. निवडणुक पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे विविध ठिकाणी भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना परिचारक यांनी नगरपरिषद कारभार चालवताना पाणी, घनकचरा, लाईट बिल, स्वच्छता, रस्ता डागडुजी आदी बाबींवर होणारा खर्च, असणारे उत्पन्न तसेच राज्य शासनाच्या वतीने नगरपरिषदेसाठी निधी तो मंजूर करून घेतानाच्या अडीअडचणी यातून गेल्या ४० वर्षापूर्वीचे पंढरपूरची लोकसंख्या आणि आज काय पंढरपूर शहराकडे आहे याचा लेखाजोखा त्यांनी मांडला. त्यांनी विरोधकांच्या



अपप्रचारावर खरमरीत टीका केली. देशात मोदी सरकार व राज्यात देवाभाऊचे सरकार असल्याने पंढरपूर शहराच्या विकासासाठी लागणारा निधी हक्काने वेळ प्रसंगी भांडून आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. या निवडणुकीत भाजपाचे युवा उमेदवार आहेत. त्यांना योग्य सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले. तसेच आजपर्यंत अनेक प्रकारच्या शासकीय योजनेच्या माध्यमातून किती निधी आणला कोण कोणती कामे शहरासाठी केली याची माहिती त्यांनी दिली. शहरातील झालेली व प्रस्तावित विकास कामे जनतेसमोर मांडली.

# प्रचारातील गंमती-जमतीने मतदारांची होतेय करमणूक

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२८ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपालिका निवडणूकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराच्या प्रचाराला वेग आलेला आहे. आरोप,प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. काही ठिकाणी तर मुद्यांची लढाई आता गुंद्यांवर येते की काय ? अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते आहे. तर दुसरीकडे प्रचारात काही गमंती जमंती देखील घडताना दिसता आहेत. त्यामुळे मतदारांची मात्र चांगलीच करमणूक होत आहे.

**प्रभागातील एकाऐवजी दुसऱ्याच भागात प्रचार**

येथील पालिका निवडणुकीसाठी या वर्षी प्रभागाच्या रचेनेमध्ये मोठे बदल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सर्वच उमेदवारांना आपल्या प्रभागात समाविष्ट झालेल्या प्रत्येक भागाची नेमकी माहिती अजून देखील झालेली नाही. त्यामुळे अनुभवी उमेदवार किंवा त्याचे अनुभवी कार्यकर्ते पहिल्यांदा नुसत्या प्रभागाची माहिती घेवुन पाहणी करुन नंतर प्रचार करतात. मात्र येथील एका प्रभागातून पहिल्यांदाच निवडणूक लढवित असलेला नवखा उमेदवार आपल्या मोजक्या कार्यकर्त्यांसह होम टु होम प्रचार करीत होता. प्रभागातील एक एक भाग पूर्ण करताना एका गल्ली मध्ये प्रत्येक घरातून जावून नागरिकांना नमस्कार करून मी या प्रभागातून उभा आहे असे सांगत आपले प्रचाराचे पत्रक तो वाटत होता. दिलेले पत्रक पाहून नागरिक देखील बुचकाळ्यात पडत होते. निम्मी गल्ली संपल्या नंतर एका कार्यकर्त्याच्या लक्षात आले की आपली काहीतरी गल्लत होते आहे. कारण आपल्या प्रभागातील भागा ऐवजी शेजारील प्रभागात समावेश झालेल्या बाजूस आपण प्रचार करीत आहोत. ही चुक त्यांनी आपल्या उमेदवाराच्या लक्षात आणून दिली. त्या नंतर या मंडळींनी त्या गल्लीत सुरु असलेल्या उजव्या बाजू ऐवजी डाव्या बाजुच्या घरांमधून प्रचार सुरु केला.

**पाय धरु नको बाबा, मते तुलाच देतो**

येथील एका प्रभागातील अपक्ष उमेदवाराने प्रचार सुरु झाल्या पासून सर्व प्रभागात किमान तीन ते चार वेळा भेटी दिलेल्या आहेत. या उमेदवार बहाद्दराने नुसत्या भेटी देवून नुसता नमस्कार, चमत्कार केलेला नाही तर प्रभागातील प्रत्येक घराघरातून असणाऱ्या ज्येष्ठ मंडळी, बाया बापड्यांचे नव्हे तर अगदी घरातील तरुण मंडळींचे देखील त्याने पाय धरुन मलाच



मते द्या अशी विनवणी केली आहे. येत्या २ तारखेला मतदान आहे. त्यामुळे या उमेदवाराच्या प्रभागातील वारंवारच्या भेटी आणि पाय धरुन मताच्या केलेल्या आवाहनामुळे त्याला पाहून प्रभागातील मतदार देखील आता चांगलेच धास्तावले आहेत. त्यामुळे त्या अपक्ष उमेदवाराने मतदारराजाला मतदानाचे आवाहन करण्या ऐवजी प्रभागातील मतदारराजाच त्याला पाहुन पाय धरु नको बाबा, मते तुलाच देतो असे म्हणू लागला आहे. या अपक्ष उमेदवाराच्या सततच्या मतदाराच्या पाय धरण्यामुळे इतर उमेदवारांना देखील आपल्या प्रचार फेरी मध्ये नाईलाजाने सतत खाली वाकून मतदार बंधुभगिनींचे चक्क पाय धरण्याची वेळ आल्याचे दिसत आहे.

**बिच्चारा उमेदवार, त्याचा निष्ठावंत कार्यकर्ता आणि बोकड**

येथील एका प्रभागात उभा असलेला उमेदवार आपल्या मोजक्या कार्यकर्त्यांसह रात्रीच्या वेळी फिरत होता. त्या वेळी त्या उमेदवाराचा एक निष्ठावंत कार्यकर्ता आपल्या बरोबर दुसऱ्या उमेदवारांच्या कळपातील पाच,पन्नास कार्यकर्त्यांचा मेळा देखील गोळा करुन आपल्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर करण्यासाठी तेथे आला होता. या निष्ठावंत कार्यकत्यांनी आपल्या सोबत आणलेल्या मंडळींचा व आपल्या उमेदवाराच्या भेटीगाठीचा रितसर कार्यक्रम देखील पार पडला. त्या नंतर या निष्ठावंत कार्यकत्यांने ही सर्व मंडळी आता आपलीच असून आपल्यालाच त्यांचे मतदान होणार आहे असे सांगून फक्त एक, दोन बोकडाची व्यवस्था करुन याच्या जेवणाचा बंदोबस्त करण्याचा आपल्या उमेदवाराला चक्क आदेश दिला. त्या नंतर निष्ठावंत कार्यकर्त्यांने दिलेला आदेश शिरसावंद्य मानुन बिचाऱ्या उमेदवाराने कुठलाही विचार न करता तातडीने होकार देवून आपल्या एक, दोन कार्यकर्त्यांना चक्क बोकडांची तजवीज करण्याच्या मोहिमेवर पाठविले.



## प्रचाराचा कालावधी एक दिवसाने वाढला

**सांगोला, दि.२८ नोव्हेंबर -**

राज्य निवडणूकाने दि.२७ नोव्हेंबर रोजीच्या आदेशान्वये नगरपरिषद व नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जाहीर प्रचार करण्याचा कालावधी दि १ डिसेंबर रोजी रात्री १० वाजेपर्यंत वाढवण्यात आलेला आहे. त्यानंतर ध्वनिक्षेपक याचा वापर करता येणार नाही. तसेच निवडणूक प्रचाराचे संबंधित जाहिरात प्रसिद्धी प्रसारण देखील बंद राहील याची नोंद घ्यावी असे आवाहन सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी केले आहे.